प्रस्तावना

प्रस्तावनेंत चर्चिलेले मुद्दे

१. राजवाड्यांच्या रचनेचा त्रोटक इतिहास, २. कोशाची प्रत कशी तयार केली ? ३. चिट्ठींतील २७ सदरें, ४. राजवाडे यांनीं दिलेले अनुबंध, ५. निर्वचनबीजसंख्या, ६. अनुपलब्ध धातूंबद्दल मीमांसा आणि संस्कृत धातु व इतर शब्द ह्यांचीं उदाहरणें, ७. पतंजलीचें ह्याबाबत विवेचन, ८. सिद्धप्राय सिद्धान्तांचें (Brilliant hypothesis) संशोधनांत महत्त्व, ९. वाच्यार्थ निर्वचन. राजवाड्यांचें मत, १०. धातुपाठाचें केवळ धातूंची याद म्हणून महत्त्व, ११. व्युत्पत्तिमोह. त्याचीं प्राचीन उदाहरणें, १२. धातूंची संख्या, १३. धातुपाठ व मानवशास्त्र, १४. पहिला वेदपूर्वकालीन भाषेंतील धातुपाठ-यास्काचा धातुपाठ, १५. भाषेंतील क्रिया व तद्दर्शक धातु, १६. क्रिया व तद्दर्शक संस्कृत धातु. १७. पाणिनीचा धातुपाठ. त्याविषयी निरनिराळे मतभेद, १८. पाणिनिनिर्दिष्ट गतिक्रिया व त्यासंबंधीं विवेचन, १९ पाणिनीचा धातुपाठ व वर्तमानकालीन बोली यांचा संबंध, २०. गत्यर्थास्ते ज्ञानार्थाः ह्याची उपपत्ति, २१. सौत्र धातु, २२. बोपदेवाचा धातुपाठ, २३. प्राकृत भाषांतील धातुपाठ, २४. चण्डांचा धातुपाठ, २५. वररुचीचा धातुपाठ. त्याचे धात्वादेश, २६. हेमचंद्राचे धात्वादेश, २७. शब्दबीजाचें महत्त्व, २८. धातूंचे प्रकार, २९. आर्यभाषेतील धातु, ३०. आपृक्त धातु, ३१. धातूंचें वर्गीकरण, ३२. प्राकृतमधील धात्वादेश, ३३. व्युत्पत्तिशास्त्र व त्याचे उत्सर्ग, ३४. निरनिराळे उत्सर्ग ८, ३५. दुय्यम उत्सर्ग ९-१२, ३६. वर्णप्रक्रियेचे नियम १३ व प्रकार १३, ३७. आख्यातजानि नामानि हा सिद्धांत व त्याची चर्चा, ३८. साईसचा सिद्धांत, ३९. धातूंचें आणखी एका दृष्टीनें वर्गीकरण, ४०. उपसर्ग व धातु, ४१. धातूंचें गणांवरून वर्गीकरण, ४२. मराठी धातूंचे निरनिराळे प्रकार.

१. ध्वनिधातु, २. नामधातु, ३. वर्णागम, ४. ज्ञानेश्वरींतील, ५. वैदिक, ६. सातत्यार्थक, ७. उपसर्गरहित, ८. अभ्यस्त, ९. द्विरुक्त, १०. द्विधातुसंयोग, ११. सविकरण, णिच्, सन्, यङ्लुङ् इत्यादि.

तदिदं [व्युत्पत्तिशास्त्रं] विद्यास्थानम्।
व्याकरणस्य कार्त्स्न्यम्॥ यास्क नि. १-१५

१. राजवाड्यांच्या धातुकोशाच्या रचनेचा त्रोटक इतिहास

राजवाडे यांचा मराठी धातुकोश आज रोजीं आम्ही महाराष्ट्रांतील विद्वान् लोकांना सादर करीत आहों. तो सादर करतांना आम्हांस आनंद, अभिमान व एक प्रकारची कृतकृत्यता वाटत आहे. राजवाडे ह्यांच्या हयातींत त्यांनीं ह्या ग्रंथांत निविष्ट केलेल्या साहित्याचा सतत ध्यास केला. इतर कोणत्याहि कार्यात ते गढले असतांना देखील त्यांना ह्या साहित्याचें कधीं विस्मरण झालें नाहीं. अष्टौ प्रहर हा धातूंचा विषय त्यांच्या डोक्यांत सारखा घोळत असे. फुरसतीचा वेळ मोठ्या मजेंत व करमणुकीनें घालविण्याचें त्यांचें हें उत्तम साधन असे. ते स्वतां त्यांत रंगून जातच; परंतु इतर लोकांनाहि त्यांत कधीं कधीं रंगवून टाकीत. एकांतांत असतांना स्वस्थ अंगमोजक्या लांकडाच्या फळीवर किंवा एखाद्या बांकावर उतार्णे पडून मराठी धातूंचीं मुळें ठरविणें, तीं वारंवार जिभेवर घोळविणें, तीं मनास पटलीं कीं त्यांचा पडताळा लगेच निरनिराळ्या कोशांत अथवा जुन्या धातुपाठांत पाहणें, व पडताळा मिळाला कीं त्यांचा त्या अर्थानें उपयोग जुन्या कवींनी केला आहे की नाहीं हें पाहण्यासाठी जुनींपुराणी बाडें धुंडाळणें किंवा त्याच्या उलट जुन्या बाडांतून आढळलेले चमत्कारिक धातु आधुनिक मराठींत कोणत्या रूपांत वावरतांना दिसतात हें पाहणें व नंतर त्यांना संस्कृत, प्राकृत, देशी भाषांतील त्यांच्या प्रतीकाचे दाखले देणें इत्यादि व्युत्पत्तीचे परिष्कार राजवाडे यांच्या डोक्यांत सारखे घोळत. हा ग्रंथ आपल्या नजरेखालीं आपल्या सोपस्कारांसह आपल्या हातानें तयार करून संपविण्याचा त्यांचा इरादा होता. त्याप्रमाणें ते आपल्या आयुष्याच्या शेवटचीं कांहीं वर्षें ह्या ग्रंथाच्या मागेंहि लागले होते. चिठ्ठ्या लहान मोठ्या केल्या; कार्डे तयार करविलीं; रकान्याचे फर्मे छापून घेतले; कारकून नेमले; त्यांवर देखरेख करण्यासाठीं आपल्या स्नेह्यांस सांगितलें. कच्चा खर्डा लिहून तयार केला. परिष्कारासाठीं संदर्भग्रंथ गोळा केले. इतकें करून कामाला स्वतां जों बसतात तोंच इहलोकची यात्रा संपविण्याचा त्यांना प्रसंग आला; आणि जें काम सर्व जन्मभर आपल्या हृदयाशीं बागविलें, ज्याच्यावर आपलें बुद्धिसर्वस्व वेचण्याचें ठरविलें, किंबहुना जो ग्रंथ आपल्या हाडाच्या लेखणीनें आपल्या रक्तानें लिहावयाचा निर्धार केला तोच ग्रंथ इतरांच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग आला! आणखी वीस वर्षें आपण जगणार व त्या अवधींत आपण योजिलेलीं सर्व कार्ये तडीस नेणार असें ते आपल्या परिवारांतील इष्टमित्रांजवळ नेहमीं बोलत असत व त्यांची निकोप प्रकृति, मिताहार, व्यायाम, निर्व्यसनी वर्तन ह्या गोष्टी पाहाणारास ह्या त्यांच्या निर्धारांत अवास्तव किंवा अशक्य असें कधींच कांहीं वाटत नसे. उलट त्यांच्या वीस वर्षांच्या निर्धारापेक्षांहि चार पांच वर्षें ते अधिकच जगतील असें वाटत असे. परंतु तें कांहीं व्हावयाचें नव्हतें. योगायोग कांहीं विचित्र यावयाचा होता. विधिघटना कांहीं निराळीच होणार होती. त्यांनीं योजलेलें कार्य अपुऱ्या व अर्धवट स्थितींत ठेवून त्यांना जावें लागलें.

या ग्रंथाची कल्पना राजवाडे यांना केव्हां व कशावरून सुचली याची कल्पना साक्षात् त्यांच्या इतरत्र दिलेल्या लेखांतील उताऱ्यांवरून स्पष्ट होत असल्याकारणानें याविषयी आम्ही

येथें अधिक लिहीत नाहीं.

राजवाड्यांचें मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाकडे इ.सन १८९९।१९०० सालापासून लक्ष लागलें; व जवळजवळ तेव्हांपासूनच त्यांचें लक्ष या व्युत्पत्ति या विषयाकडे वेधलें गेलें. मुंबईस महाराष्ट्र सरस्वतीमंदिर या नांवाचें मासिक शके १८२३ चैत्र शु॥ १ म्ह. सन १९०१ सालापासून छापण्यास सुरुवात झाली. त्या मासिकाच्या शके १८२६ च्या श्रावणाच्या अंकांत राजवाड्यांनीं केलेल्या शब्दांच्या व्युत्पत्त्या छापलेल्या आढळतात. त्यानंतर पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना झाल्यावर राजवाड्यांनीं अनेक शब्दांच्या व्युत्पत्तीविषयींचे लेख मंडळास सादर केले असून ते मंडळाच्या अहवालांत छापून प्रसिद्ध झाले आहेत. ह्यांमध्ये प्रसिद्ध झालेल्या राजवाड्यांच्या व्युत्पत्ति ह्या नामांच्याच बहुतेक असत. धातूंच्या फारशा नसत. नामांवरून राजवाड्यांना धातूंच्या व्युत्पत्तीची कल्पना सुचली असावी.

एखाद्या देवालयाचा जीर्णोद्धारक ज्याप्रमाणें जीर्णोद्धारास पैशांची मदत व्हावी म्हणून पैशांची पेटी देवालयाच्या दारांत ठेवतो व तींत दर्शनासाठीं येणारे भाविक लोक पै-पैसा आपापल्या कुवतीप्रमाणें व मोठ्या भाविकतेनें टाकतात व अशा रीतीनें पैपैनें पुष्कळ पैसा गोळा होऊन त्यावर मंदिराची उभारणी होते; त्याप्रमाणें आपल्या जवळच्या सांठ्यांत राजवाडे हे येतां जातां आपल्या कुवतीप्रमाणें व मोठ्या निष्ठेनें एक एक धातु चिठ्ठीवर लिहून टाकीत. ह्या रोजच्या अखंड व्यवहारानें तो चिठ्ठ्यांचा खजिना वाढत वाढत खूप वाढला आणि शेवटीं त्याची मोजदाद करतात तों तीस हजारांपर्यंत त्यांची मोजदाद गेली. ते जो धातु चिठ्ठीवर लिहीत तो प्रथम मराठी धातु लिहीत. नंतर त्याचें संस्कृत मूळ जर त्या वेळीं आठवलें तर तेंहि लिहीत. एखादें जुन्या ग्रंथांतील जर अवतरण सांपडलें तर त्याचाहि लगेंच निर्देश करीत; परंतु ह्यांपैकीं कांहींच जर हाताशीं न आलें तर निदान मराठी रूप तरी लिहून ते चिठ्ठी तयार करीत असत. मूळ चिठ्ठी चतकोर कागदाच्या चौथ्या हिश्शाएवढी असे. तिच्या डाव्या बाजूस आरंभीं मोठ्या अक्षरांत मराठी धातु लिहीत व त्याच्यापुढें जसें उपलब्ध असेल तसें त्याचें स्पष्टीकरण लिहीत. ह्या प्रकारच्या पहिल्या चिठ्ठ्या तयार झाल्यावर धातुकोश छापण्याचे दृष्टीनें त्यांनीं जाड कागदाच्या मोठ्या चिठ्ठ्या तयार केल्या आणि त्यांवर छोट्या चिठ्ठ्यांवरील मजकूर लिहवून घेतला. ह्या लहान व मोठ्या अशा दोन्ही चिठ्ठ्यांवरील मजकूर ह्या ग्रंथासाठीं तयार केलेल्या प्रतीवर उतरला आहे. पहिल्या छोट्या चिठ्ठ्या आणि नंतरचीं मोठीं जाड कार्डें ह्यांशिवाय राजवाडे ह्यांनीं आणखीहि अर्धे बंद छापून घेतले होते. जो कांहीं शेवटचा परिष्कार प्रत्येक धातूसंबंधीं करण्याचें त्यांनीं आपल्या मनाशीं योजिलें होतें तो परिष्कार करण्यासाठींच हे छापील अर्धे बंद तयार केले होते. ह्यांवर एकंदर सत्तावीस सदरें आहेत. ह्यावरून त्यांनीं योजिलेला परिष्कार किती शास्त्रशुद्ध आणि सर्वस्पर्शी होता ह्याची कल्पना येते. ह्या सत्तावीस सदरांत धातूंच्या सर्व अर्थांचीं व सर्व काळांचीं रूपें आलीं आहेत. कोणतेंहि रूप शिल्लक राहत नाहीं. मोठ्या चिठ्ठ्या लिहिण्याचें कांहीं काम प्रस्तुत लेखकानें इ.स. १९१९ सालीं केलें. नंतर कांहीं थोडें काम १९२०-२३ सालांत व पुढें १९२५-२६ सालीं केलें. छोट्या चिठ्ठ्यांवरून मोठीं कार्डें लिहिण्याचें कांहीं काम हिंगण्याचे

प्रोफेसर वासुदेव गोविंद मायदेव ह्यांनीं केलें. त्यांना फुरसत मिळेना म्हणून पुढें तें काम करण्यासाठीं कांहीं कारकून ठेविलें. तरीहि त्या कामाचा पार पडेना. राजवाड्यांच्या पश्चात् हा ग्रंथ छापण्याचें ठरून या ग्रंथाची छापखान्याकडे द्यावयाची प्रत (प्रेस कॉपी) तयार करण्याकरतां जाड कार्डावरील मोठ्या चिठ्ठ्या लिहिण्याचें काम प्रस्तुत लेखकानें १९२८-२९ सालीं केलें. तें अ पासून ग पर्यंत केलें. नंतर पुढचें काम धुळ्यास रा. पुरुषोत्तम नारायण वर्तक ह्या साक्षेपी सद्गृहस्थांनीं सुरू करून शेवटपर्यंत केलें. अव्वल पासून अखेर पर्यंत प्रेस कॉपी लिहिण्याचें काम रा. वर्तक यांनीं केलें. त्यानंतर प्रेस कॉपी शुद्ध करून कायम करण्याचें कार्य प्रस्तुत लेखकानें केलें. नंतर मुद्रितें तपासण्याचें काम रा. वर्तक व धुळ्याचे रा. विष्णु हरी निजसुरे ह्यांनीं केलें. संपादनासाठीं एक सल्लागार मंडळ नेमलें होतें; त्यांत श्री. ना. गो. चापेकर (अध्यक्ष), म. म. श्रीधरशास्त्री पाठक, श्री. भास्कर वामन भट, श्री. शंकर श्रीकृष्ण देव, श्री. निजसुरे व प्रस्तुत लेखक हे सदस्य होते. संपादनाची सर्व जबाबदारी अर्थात् प्रस्तुत लेखकावर होती. चिठ्ठ्यांचा हा संभार राजवाड्यांच्या हयातींत किती तरी ठिकाणीं हालला. स्वत: राजवाडे हे तर त्याला आपल्या जिवापाड जपत. ते जिकडे जात तिकडे आपल्या बरोबर ते त्या पेट्या नेत असत. धुळें, सातारा, अहमदाबाद, तळेगांव, पुणें, व शेवटीं पुन: धुळें इतकीं त्याचीं स्थलांतरें झालीं. राजवाडे गेल्यानंतर त्यांच्या पश्चात् हा चिठ्ठ्यांचा संभार धुळें येथें राहिला व रा. भट ह्यांनीं हा संभार स्वत:च्या प्राणाच्या पलीकडे जतन केला. हा ग्रंथ प्रकाशित होण्याचे कामीं राजवाडे संशोधन मंडळाचेच परिश्रम कारणीभूत आहेत; व हें कार्य मंडळाच्या स्थापनेच्या वेळीं संस्थेचे जे प्रमुख उद्देश ठरविण्यांत आले त्यांस अनुसरूनच करण्यांत आलें आहे. यास्तव या ग्रंथाच्या प्रकाशानानें राजवाड्यांच्या आत्म्याला समाधान होऊन तो मंडळास अक्षय्य दुवा देत राहील.

२. राजवाडे धातुकोशाची छापखान्याकडे द्यावयाची प्रत कशी तयार केली याचें दिग्दर्शन

असा ह्या ग्रंथाचा थोडक्यांत इतिहास आहे. ह्यावरून राजवाडे ह्यांनीं हा प्रस्तुतचा कोश कोणत्या अवस्थेंत सोडला याची कल्पना येईल. अशा स्थितींत असलेला कोश प्रकाशित करण्याचा ज्या वेळीं विचार सुरू झाला त्या वेळीं कांहीं वादग्रस्त मुद्द्यांचा विचार करणें जरूर झालें. एकतर ह्या कोशाची पूर्ण अशी कल्पना फार थोड्यांना होती. कित्येकांनीं हा कोश प्रत्यक्ष पाहिलेला नव्हता; त्यामुळें वाटेल तो वाटेल तें ह्याबद्दल बोलत असे. शिवाय हा कोश कोणत्या स्वरूपांत छापावयाचा ह्याबद्दलहि विचार सुरू झाला. राजवाड्यांनीं ज्या स्वरूपांत सोडला त्याच स्वरूपांत आहे तसा छापावा असें म्हणणारी कांहीं मंडळी होती तर त्याविरुद्ध त्यांत जरुर ती भर घालून योग्य दिसेल असा आणि त्याचा योग्य उपयोग होईल असा तो छापावा असें म्हणणारी दुसरी कांहीं मंडळी होती. राजवाड्यांच्या लिखाणांत काडी इतकाहि फरक करावयाचा नाहीं असें म्हणून जर का कोश छापला असता तर त्यावरून कांहींच बोध झाला नसता. कांहीं चिठ्ठ्या त्यांनीं पूर्णस्वरूपांत लिहिल्या होत्या हें जरी खरें

असलें तरी कित्येक चिठ्ठ्या अपुऱ्या होत्या आणि ह्या बहुसंख्य होत्या. शिवाय त्यांनीं कित्येक धातूंचे अर्थ इंग्रजीत दिले होते. हे सर्व होते तसे जर छापले असते तर मराठी-इंग्रजी धातुकोशाचें स्वरूप प्राप्त झालें असतें. कोश मराठी राहिला नसता. राजवाडे ह्यांनीं जें कांहीं लिहिलें होतें तें सर्व कच्च्या स्वरूपाचें होतें. तो सर्व कच्चा खर्डा होता. हें समजून त्यांत जरूर ती भर घालण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें इतर भाषांतील धातुकोशांच्या बाबतींत काय वस्तुस्थिती असते हें पाहून त्याप्रमाणें ह्याहि धातुकोशाचें स्वरूप निश्चित करण्याचें ठरविलें व खालील बाबींची भर घातली. धातूंचा परिष्कार जो निश्चित केला तो थोडक्यांत असा-

"मराठी धातु – (संस्कृत धातु; गण; संस्कृत धातूचा अर्थ, मराठी रूप सिद्ध होण्यासाठीं संस्कृत धातूचें कोणतें णिच्, अभ्यस्त, चर्करित, यङ्लुडंत घेतलें तें. कांहीं वर्णप्रक्रिया) मराठी अर्थ, उतारे (ज्ञानेश्वरी मधील)"

३. चिठ्ठ्यांतील २७ सदरें

राजवाडे ह्यांनीं धातूच्या परिष्कारासाठीं दोन प्रकारच्या चिठ्ठ्या केल्या होत्या. एक दोन बोटांइतकी रुंद आणि सहा इंच लांब अशी कागदाची पट्टी असून तिच्या डाव्या हाताच्या आरंभास मराठी धातु, त्याच्यापुढें संस्कृतचा धातु व त्याचा अर्थ एका चौकटी कंसांत देऊन नंतर कंसाबाहेर त्याचा मराठी अर्थ दिलेला असे. संस्कृत धातूचा अर्थ कधी संस्कृत, तर कधीं मराठी किंवा इंग्रजीमध्येंहि असे. तसेंच धातूचा मराठी अर्थहि ह्या तिहींपैकीं कोणत्या तरी भाषेंत असे. बऱ्याच वेळीं अर्थात्च मराठी भाषेंतच तो दिला जाई. ह्या लहान चिठ्ठ्यांखेरीज त्यांनीं अर्ध्या बंदाच्या मोठ्या चिठ्ठ्याहि तयार केल्या होत्या. ह्या मोठ्या चिठ्ठ्यांवर एकंदर २७ सदरें असून तीं सर्व छापील होतीं. छापील सदरें पुढीलप्रमाणें होतीं.

(१) मराठी धातु मूळ अर्थ
(२) संस्कृत धातु मूळ अर्थ
(३) वैदिक धातु वर्गपदरूप
(४) पाणिनीय धातु वर्गपदरूप
(५) मूळ संस्कृत धातुरूप
(६) अभ्यास
(७) आगम
(८) आदेश
(९) रूप (णिङ् णिच् सन् सिच्)
(१०) कर्तरि लट्
(११) कर्तरि लिङ्
(१२) कर्मणि लट्
(१३) भावे लट्

(१४) प्रयोजक
(१५) कर्तरि वर्तमानकृदन्त
(१६) कर्मणि वर्तमान कृदन्त
(१७) निष्ठा (तल, अल, अमागम, आमागम)
(१८) भविष्य
(१९) जुना कर्मणि लट्
(२०) जुना कर्मणि लङ्
(२१) जुना कर्मणि लोट्
(२२) जुना कर्मणि लिङ्
(२३) जुना कर्मणि लृङ्
(२४) जुना प्रयोजक कर्मणि
(२५) जुनें कर्मणिवर्तमानकृदन्त
(२६) जुनी कर्मणि निष्ठा
(२७) विशेष.

थोरल्या चिठ्ठ्यांत हे इतके २७ विशेष होते. प्रत्येक धातूच्या बाबतींत हे सर्व सत्तावीस विशेष सांगण्याचा त्यांचा मानस असावा असें दिसतें. परंतु हा इतका खटाटोप त्यांच्या हातून झाला नाहीं. त्यांनीं स्वतां परिष्कारिलेल्या धातूंत २७ विशेषांनीं परिष्कृत असा धातु एकच आहे. कदाचित् सत्तावीस सदरांपैकीं जितकीं सदरें भरतां येणें शक्य आहे तितकीं तरी भरलीं जावींत असाहि त्यांचा संकेत असण्याचा संभव असेल. प्रत्येक धातु इतक्या सत्तावीस अंगांनीं विभूषित करणें हें कठीण आहे.

याप्रमाणें दर्शविलेल्या वादग्रस्त मुद्द्यांचा विचारविनिमय होऊन राजवाड्यांनीं तयार केलेल्या कच्च्या खड्यांत ज्या संस्कृत धातूंचे गणांचे आंकडे व त्यांचे अर्थ राजवाड्यांनीं नमूद केले नव्हते ते आंकडे पाणिनीच्या धातुपाठावरून नमूद करण्यांत आले. त्याचप्रमाणें राजवाड्यांच्या कच्च्या खड्यांत ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि ग्रंथांतील संदर्भाच्या ओव्यांच्या आंकड्यांवरून त्या ओव्या पूर्णपणें देण्यांत आल्या. धातूंचा मराठी अर्थ देण्यांत आला. याशिवाय राजवाड्यांच्या कच्च्या खड्यांत कांहीं मराठी धातूंचे अर्थ विशद करण्याकरितां इंग्रजी अर्थ दिले होते त्यांचे मराठी अर्थ नमूद करण्यांत आले. कोशाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीनें आतां दर्शविलेली भर प्रस्तुत लेखकानें सल्लागार मंडळाच्या संमतीनें घातली आहे.

४. राजवाडे यांनीं दिलेले अनुबंध

राजवाडे यांनीं लिहिलेल्या मोठ्या चिठ्ठ्यांवर कित्येक धातूंच्या मागें इ, ई, ए इत्यादि अक्षरें घातलीं आहेत. हीं अक्षरें त्या त्या धातूंचा अनुबंध दाखविण्यासाठीं घातलेलीं आहेत, असें आम्हांस वाटतें. शास्त्रशुद्ध चर्चा म्हणून अनुबंधाची आवश्यकता धातुपाठांत विशेष आहे.

'अनुबंध' म्हणजे इत्संज्ञक वर्ण व त्यांचीं विशेष कार्यें असतात. धातूंचा उच्चार सोप्या रीतीनें करतां यावा म्हणून आणि संधिकार्यादि होऊन धातूंच्या शेवटच्या व्यंजनाची भ्रांति न पडावी म्हणून अनुबंध योजलेला असतो. संस्कृतमध्यें धातूंच्या बाबतींत बावीस अनुबंध आहेत व त्यांची वेगवेगळालीं कार्यें आहेत. अ, आ (आदितश्च), इ (इदितो नुम् धातोः), इर् इ (श्वीदितो निष्ठायाम्), उ (उदितोवा), ऊ, ॠ, ॡ, ए, ओ, क, ङ, ञ, त्रि, ट, टु, डु, ण, प, म, ष् इत्यादि अनुबंध आहेत. ह्या अनुबंधांशिवाय-। ह्या दोन खुणाहि अनुबंधांच्या बाबतीत वापरतात. आडव्या रेघेनें त्याचें अनुदात्तत्व दाखविलें जातें आणि उभ्या रेघेनें स्वरितत्व दाखविलें जातें.

ह्या अनुबंधांशिवाय आणखीहि कांहीं पारिभाषिक संज्ञा राजवाड्यांनीं ह्या कोशांत कोठें कोठें वापरलेल्या आढळतात. दश लकारांपैकीं कांहीं लकारांचा उल्लेख ह्या कोशांत कांहीं धातूंच्या बाबतींत केला आहे. लट्, लिट्, लुट्, लृट्, लोट ह्यांच्या ट् ह्या वर्णास इत्संज्ञा होते म्हणून ह्यांस टित् लकार म्हणतात आणि लङ्, लिङ्, लुङ्, लृङ् यांच्या ङ् ह्या वर्णास इत्संज्ञा होते म्हणून त्यास ङित् लकार म्हणतात. मराठीमधील कांही धातु संस्कृतमधील प्रत्यक्ष धातूंपासून सिद्ध न होतां त्या धातूंच्या लकार रूपांपासून सिद्ध झालेले आहेत. धातूंच्या लेट्, लङ्, लुङ्, लिङ्, यङ्लिङ् ह्या लकारांच्या रूपांपासून सिद्ध झालेले मराठी धातु पुष्कळ आहेत. त्या त्या लकारांचे अवशेष मराठी धातुरूपामध्यें " अभ्यास, द्विरुक्ति, स्, अ " इत्यादि चिन्हांवरून राहिलेले त्या त्या ठिकाणीं दाखविले आहेत.

ह्या लकाराच्या चिन्हांखेरीज संस्कृतमधील धातूंच्या गणांची विकरणचिन्हेंहि मराठींत कांहीं कांहीं धातूंच्या रूपांत उतरलेलीं दिसतात. अ, य, नु, अ, न्, उ, ना, अय इत्यादि विकरणांचीं चिन्हें कांहीं मराठी धातूंच्या रूपांत आढळलेली त्या त्या ठिकाणीं दिलीं आहेत. कांहीं संस्कृत धातु प्राकृतमध्यें व प्राकृतमधून मराठीमध्यें जे उतरले ते आपापल्या गणविकरणासह उतरले. गणविकरणें हीं धातूंशी एकरूप होऊन गेलीं होतीं. ह्या दहा गणांच्या विकरणांशिवाय जे नामधातु म्हणून समजले त्यांचा एक अकरावा गण मानिला आहे. त्याचेंहि 'अय' हें चिन्ह मराठींत उतरलें आहे. प्रयोजक किंवा णिच्, इच्छार्थाचे सन्, यङ्लुङ्ताची चिन्हें हींहि मराठींत उतरलीं आहेत. णिच् रूपाच्या 'अय' खेरीज 'आव, आय, आप्' इत्यादि चिन्हें कांहीं धातूंच्या रूपांत मराठींत आढळतात.

५. निर्वचनबीजसंख्या

राजवाडे ह्यांनीं व्युत्पादिलेल्या मराठी धातूंतील कांहीं धातूंना एक निर्वचनबीज, तर कांहींना दोन, कांहींना तीन अशी संख्या वाढत वाढत सत्तावीस पर्यंत निर्वचनबीजें त्यांनीं दिलीं आहेत. बहुसंख्य अर्थातच् एक निर्वचनबीज धातूंची असणार. दोन निर्वचनबीज धातूंचीहि संख्या कांहीं कमी नाहीं. सहज कोश चाळला तरी असले धातु तेव्हांच डोळ्यांपुढें येतात. याप्रमाणें राजवाड्यांनीं निरनिराळ्या धातूंचीं एक पासून २७ पर्यंत निर्वचनबीजें दिली आहेत. कांहीं धातु येथें नमूद करतों. पच, टोपस, टांग, उफळ इत्यादि धातूंचीं तीन बीजेंदाखविलीं

आहेत. उफळ, टांक, टोल, ठेव, ठिव, ठेचळ, पडप, पटक इत्यादि धातूंचीं चार बीजें; उधव, जुप, झोल, टोंच, टाक, परिवस, पघळ इत्यादि धातूंचीं पांच बीजें; उभळ, उमट; ओप, टपक, पछाड इत्यादि धातूंचीं सहा बीजें; आवळ, उगाळ, कुट, खुड, कुसकर, किट कुरड, गाव, छिल, ठोक, ढास, ताव, भार, वेत, रुस, रड, रंज, मुरड इत्यादि धातूंचीं सात बीजें; आंफळ, कडस, जाच, ठेव, वठ, सांग, वास यांची आठ बीजें; उठ, ओरप, आवग, खोड, चाप, चोप, फास, पाह, मोड, सार इत्यादि धातूंचीं नऊ बीजें दिलीं आहेत.

पुढें धातु व त्यांची संस्कृत बीजसंख्या क्रमानें मांडतों.

दहा– झोंब, झुक, दडप, दाव, खप, निसट, परवड, बुड, बुचाड.
अकरा– भिड उडाव इत्यादि
बारा– काढ, चुक, झळंब, निरव, फाड इत्यादि
तेरा– झड, पुस, राह
चौदा– भर, घाल
पंधरा– चढ, परत
सोळा– नेट
सतरा– उड, झोड
अठरा– पाव
वीस– झाड, पाड, मार
एकवीस– फोड
बावीस– उडव
तेवीस– सुट, लाग
सव्वीस– लाव
सत्तावीस– ओढ

अशा रीतीनें पंचविसांपेक्षां अधिक ज्यांचीं निर्वचनबीजें सांपडतात असे धातु फक्त लाव व ओढ हे दोनच आहेत. ह्या दोन धातूंचीं इतकीं सव्वीस किंवा सत्तावीस बीजें माना किंवा न माना; एक गोष्ट मात्र खरी कीं ह्या दोन मराठी धातूंना प्रत्येकीं अनुक्रमें तितके सव्वीस व सत्तावीस अर्थ आहेत व कोणत्याहि अर्थाच्या बाबतींत जर लक्षणाशक्ति किंवा लाक्षणिक अर्थ मानावयाचा नाहीं असें म्हटलें तर तितकीं सव्वीस किंवा सत्तावीस त्याचीं निर्वचनबीजें असणारच व तितकीं मानावींहि पण लागणारच.

६. अनुपलब्ध धातूंबद्दल मीमांसा व संस्कृत उदाहरणें

राजवाडे यांच्या ह्या प्रस्तुत कोशांत थोडे धातु असे आहेत कीं ते संध्यांच्या मराठी भाषेंत वापरांत नाहींत असा कित्येकांकडून आक्षेप येण्याचा संभव आहे. ह्याबाबत आम्हास ह्या आक्षेपकांच्या नजरेस एकच गोष्ट आणावयाची आहे. युरोपमध्ये वेदाचा अभ्यास जसजसा मूलगामी होऊं लागला तसतशी त्यांना वेदांतील शब्दांच्या कोशाची जरूरी भासूं लागली.

हा प्रचंड कोश करण्याचें काम कोणीं एका पण्डितानें शिरावर न घेतां पुष्कळ वैदिक पंडितांनीं मिळून शिरावर घेतलें व तें रोथ आणि बोटलिंग ह्या दोघां नामांकित वेदपण्डितांनीं पार पाडलें. ह्या कामाच्या प्रीत्यर्थ वेदांतील कांहीं भागांतील शब्दांच्या कोशाचें काम प्रो. व्हिटने ह्या पंडिताकडे आलें व त्यानें तें मोठ्या आस्थेनें आणि परिश्रमानें पार पाडलें. हें काम करीत असतांना व्हिटनेस इतर संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करावा लागला व त्या परिशीलनाच्या जोरावर व खऱ्या अभ्यासाच्या जोरावरच त्यानें पाणिनीच्या धातुपाठासंबंधीं एक सिद्धान्त प्रस्थापित केला व तो त्या काळीं उपलब्ध असलेल्या सर्व भरपूर पुराव्यावर आधारलेला असल्यामुळें सर्वमान्यहि झाला. तो सिद्धांत असा. ज्याअर्थी पाणिनीच्या धातुपाठांतील कित्येक धातु वेदांत किंवा उत्तरकालीन संस्कृत भाषेंत (च्छंदसि किंवा भाषायाम्) वापरलेले आढळत नाहींत, ज्या अर्थी त्यांचा प्रत्यक्ष उपयोग कोठेंच आढळत नाहीं, त्या अर्थी पाणिनीनें धातुपाठांत गोवलेले बरेच धातु कृत्रिम असले पाहिजेत. धातुपाठ हा बोलींचा आरसा नसून त्यांत बराचसा कृत्रिमतेचा भाग आहे असा सिद्धांत प्रस्थापित केला. पाणिनि म्हणजे मोठा साक्षेपी व्याकरणकार, भाषेंत जें सापडलें तेंच त्यानें मोठ्या कुशलतेनें व एका विशिष्ट पद्धतीनें सूत्रबद्ध करून ठेविलें असा जो त्यानें लौकिक मिळविला त्याला धातुपाठाच्या ह्या कृत्रिमतेनें त्यांनीं कलंकित केलें. परंतु पुढें संस्कृतचें संशोधन व त्यांतल्या त्यांत वैदिक संशोधन वाढूं लागलें, वैदिक वाङ्मयातील शब्दांचे व त्याबरोबर वैदिक धातूंचे कोश तयार होऊं लागले. हे नवे शब्दकोश जसे तयार झाले तसे त्यांत निरनिराळे धातु व त्यांचे प्रयोग वापरलेले आढळूं लागले. ह्या नव्या धातूंचा भाषिक अभ्यास जसजसा अधिक झाला तसतसा त्यामध्ये पाणिनीय धातुपाठांतील कित्येक धातूंचीं प्रतीकें आढळूं लागलीं. जे धातु व्हिटने ह्या पंडितानें अव्युत्पाद्य व अनुपपुक्त कृत्रिम म्हणून प्रतिपादले तेच धातु ह्या नव्या वाङ्मयांत व त्यांच्या नव्या कोशांत सांपडूं लागले व व्हिटनेचा सिद्धांत डळमळूं लागला. इतकेंच नव्हे तर उलट पाणिनीच्या बाजूचा पुरावा मिळूं लागला, व त्याचा आस्थेवाईकपणा व साक्षेपीपणा अधिकच सिद्ध झाला.

७. पतंजलीचें ह्याबाबत विवेचन

पुष्कळांदा अशी जबर शंका येते की राजवाडे ह्यांनीं हे इतके धातु व्युत्पादिले; ह्या इतक्या मराठी धातूंची निरनिराळी संस्कृत प्रतीकें दाखविली; परंतु हीं सर्व संस्कृत प्रतीकें, हे सर्व संस्कृत धातु वापरांत आहेत काय? किंवा हे सर्व गोळा केलेले मराठी धातु प्रत्यक्ष वापरांत आहेत काय? मागें केव्हां तरी ह्यांचा उपयोग होत होता काय? कोणीं प्राचीन ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत त्यांचा उपयोग केला आहे काय? अशा निरनिराळ्या शंका येतात व शंका आल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं. अशाच प्रकारचा संभ्रम आचार्य पतंजलीच्या वेळेला कांहीं विद्वानांना कांहीं संस्कृत शब्द व धातु ह्यांबद्दल पडला होता. प्रसिद्ध आंग्ल वैदिक व्याकरणकार Whitney ह्यालाहि असाच संभ्रम झाला होता व त्याचें निराकरण कसें झालें याचा उल्लेख वर आलाच आहे. पतंजलीच्या महाभाष्यांत ह्या शब्दसंभ्रमाचा उल्लेख आला आहे. त्यानें आक्षेपवार्तिक, नंतर आक्षेपबाधकवार्तिक व त्याच्या नंतर सिद्धांतवार्तिक देऊन

हा वाद थोडक्यांत विवेचिला आहे. " अस्त्यप्रयुक्त: " हें आक्षेपवार्तिक घालून त्यावर पुढीलप्रमाणें भाष्य केलें आहे- सन्ति वै शब्दा: अप्रयुक्ता: तद्यथा ऊष, तेर, चक्र, पेचेति। किमत: यत्सन्त्यप्रयुक्ता:। प्रयोगाद्धि भवाच्छब्दानसाधुत्वमध्यवस्यति। य इदानीमप्रयुक्ता नाम साधव: स्यु: इदं तद्विप्रतिषिद्धम्। यदुच्यते सन्ति वै शब्दा अप्रयुक्ता इति॥

ह्यामध्यें मुख्य प्रश्न 'ऊष, तेर, चक्र, पेच' इत्यादि शब्दांबद्दल आला. ह्या शब्दांना काय म्हणावयाचें- रूढ का अरूढ ? ह्या आक्षेपाला बाधकवार्तिक पुढचें दिलें आहे.

अस्त्यप्रयुक्त: इति चेत् न अर्थशब्दयोगात् अप्रयोग: प्रयोगान्यत्वात्। अप्रयुक्ते दीर्घ सत्रवत्। सर्वे देशान्तरे।

सर्वे खल्वप्येते शब्दा देशान्तरेषु प्रयुज्यते। न चैवोपलभ्यन्ते उपलब्धौ यत्न: क्रियताम्। महान् शब्दस्य प्रयोगविषय: सप्तद्वीपा वसुमती त्रयोलोका इत्यादि इत्यादि.

अशा रीतीनें शब्दाच्या उपयोगाचें व विनियोगाचें क्षेत्र किती अमर्याद आहे हें सांगितलें आहे. अशा ह्या अमर्याद क्षेत्रांत कोणता शब्द कोणत्या अर्थानें असेल किंवा अमुक एक शब्द वापरांत असणेंच शक्य नाहीं असें छातीठोक सांगतां येणें अगदीं शक्य नाहीं. यास्क म्हणतो "कंबोज लोकांमध्ये शव हा दातु गत्यर्थ आहे. हम्मति सुराष्ट्रेषु रंहति प्राच्यमध्येषु। तसेंच दातिर्लवनार्थे प्राच्येषु दात्रमुदीच्येषु॥" अशा रीतीनें अनुपलब्ध म्हणून समजलेले धातु प्रांतिक भाषांत आढळूं लागले.

भाषेचें क्षेत्र, तिच्यांतील शब्दांचा विनियोग, शब्दांच्या अर्थाचा उपयोग ह्या सर्वांचे क्षेत्र किती विस्तृत आहे ह्याची कल्पना ह्या पतंजलीच्या महाभाष्यांतील चर्चेवरून येईल. पतंजलीच्या वेळेला जर ही स्थिती तर Whitney किंवा राजवाडे ह्यांच्या वेळेला तशीच स्थिति असली तर त्यांत काय नवल ? तशीच कोणी शंका प्रगट केली व तिला ह्या महाभाष्यांतील उत्तराप्रमाणें उत्तर दिलें तर त्यात बावगें काय झालें ? मराठीं जुन्या नव्या, प्रांतिक व मध्यवर्ती अशा सर्व वाङ्मयाचा, बोलींचा अभ्यास नीट होऊं द्या व तसा तो नीट झाला म्हणजे राजवाडे ह्यांनीं संग्रहिलेले सर्व धातु त्यांत आढळतील अशी खात्री आहे.

पाणिनीच्या धातुपाठाची जी गोष्ट आम्ही किंचित् विस्तारानें सांगितली तीच गोष्ट राजवाड्यांच्या प्रस्तुत धातुपाठास लागू पडते. राजवाड्यांनीं दिलेलीं मराठी धातूंचीं प्रतीकें हीं त्यांच्या जुन्या वाङ्मयाच्या परिशीलनांत त्यांना आढळलीं असतील, म्हणूनच त्यांनीं हीं कोशांत निर्देशिलीं असतील. एरव्हीं तीं सर्व निर्देशण्याचें कांहीं कारण नव्हतें. कल्पनांचें जाळें विनाकारण उभारून धातुपाठ उगाच वाढविण्याचा खटाटोप करण्याचें कारण काय असा साहजिकच प्रश्न येतो. मराठी भाषेची धातुसंपन्नता विशद करण्याची ही बाब आहे. केवळ कल्पनेचा विलास किंवा खेळ दाखविण्याची बाब नव्हे. असें मानण्याकडे साहजिक मनाची धांव जाते. राजवाड्यांनीं उल्लेखिलेले धातु आपणास वापरलेले आढळत नाहींत, वाङ्मयांत सांपडत नाहींत, ह्याचा दोष आपल्या वाङ्मयपरिशीलनाच्या कमतरतेकडे आहे, असें आपण कां म्हणू नये ? मराठीचा अधिकाधिक अभ्यास होत आहे. जुनीं जुनीं वाङ्मयाचीं बाडें हस्तगत होत आहेत. ग्रांथिक किंवा नागर भाषाच केवळ नव्हे तर निरनिराळ्या प्रांतिक भाषा,

निरनिराळ्या गणभाषा, व्यवसायभाषा मोठ्या आस्थेनें अभ्यासिल्या जात आहेत. त्या सर्वांचे कोश तयार होत आहेत. ह्या सर्वांबरोबर मराठी भाषेंतील शब्दसंपत्ति किती अपरंपार आहे ह्याची कल्पना येणार नाही का? व त्याजबरोबर मराठी धातूंच्या संख्येचाहि अपरंपारपणा नाहीं का मनास पटणार? इतक्या विस्तृत अभ्यासानंतर मराठीच्या पहिल्या कोशांत निर्देशिलेलेच फक्त धातु मराठीत आहेत, अधिक नाहींत असेंच मानण्याकडे मनाची प्रवृत्ति होईल का? ह्याबाबत "कालोह्ययम् निरवधिर्विपुलाच पृथ्वी" हाच सिद्धांत उरीकृत करणें न्याय्य आहे. मराठी भाषा ही पृथ्वीसारखी विशाल आहे. तिच्यांतील शब्दसागर हाहि कालप्रमाणें निरवधि आहे. तो अमर्यादित आहे. ह्या विशालत्वाच्या मर्यादा-सागराच्या अवधि-जसजशा आपल्या आवाक्यांत येतील तसतसें आज आपणांस जें अशक्य व असंभाव्य वाटतें आहे तेंच शक्यत्वाच्या किंवा सत्यत्वाच्या कोटींत अवश्य जाईल.

८. सिद्धप्राय सिद्धांतांचें संशोधनांत महत्त्व

शिवाय आम्ही म्हणतों "समजा, ह्यामध्यें राजवाड्यांनीं आपली बुद्धिमत्ता चालविली व नवीन कृत्रिम धातु आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तयार केले. तर त्यांत वावगें असें काय केलें? संशोधनाच्या क्षेत्रांत कधी कधीं बुद्धिमत्तेचीं भरारी अशी मारावी लागते. बुद्धिमत्तेची चमक कधीं कधीं दाखवावीं लागते. खडकासारख्या ठाम व अभेद्य अशा भरभक्कम पुराव्यावर उभें राहून सिद्धांत बांधणें हें तर अव्वल दर्जाचें संशोधन खरेंच. परंतु संशोधनाची वाट येथेंच खुंटावयाची नसते. जेथें पुरावा संपतो व त्याचा धागादोराहि पोहोंचत नाहीं तेथें व त्याच्यापुढील क्षेत्रांत केवळ दिग्दर्शन कां होईना पण तें करून ठेवण्याची व भावी संशोधनकांना मार्ग दाखविण्याची जबाबदारी त्या संशोधकावर पडते. "Brilliant Hypothesis" म्हणून ज्याला म्हणतात व ज्याची संशोधनाच्या ज्ञात क्षेत्रांतील भरभक्कम पुरावा संपला म्हणजे अज्ञात क्षेत्रांत संचार करण्याकरतां संशोधकाच्या दृष्टीनें महती सांगितली आहे तें हेंच होय. अशा प्रकारचा "Brilliant Hypothesis" प्रस्थापित करण्याचें काम राजवाड्यांनीं केलें आहे. अशा प्रकारचे सिद्धांत प्रत्येक संशोधकाग्रणीनें प्रस्थापित केले आहेत. वेदाच्या कालासंबंधी, आर्यांच्या मूळ स्थानांसंबंधीं, त्यांच्या निष्क्रमणमार्गासंबंधीं, आर्यांच्या वेदपूर्वकालीन भाषासंबंधीं, वेदपूर्व खाल्डियन इष्टिकालेखासंबंधीं, पिरॅमिडसंबंधीं, मिसर देशांतील चित्रलिपीसंबंधीं, मोहोंजदारो येथील सुमेरीसंस्कृतीसंबंधी, खोतान, अशोक वगैरे शिलालेखांसंबंधीं, अश्वघोषाच्या नाट्यावशेषांसंबंधीं, प्राकृत भाषांच्या प्रांतांसंबंधीं, मराठी भाषेची उत्पत्ति व उत्पत्तिकाल यांसंबंधीं, मानभावी संकेतांसंबंधीं, मुधोळकर घराण्याच्या फारसी फर्मानासंबंधीं- इत्यादि इत्यादि संबंधीं आजवर मोठमोठ्या नामांकित पाश्चात्य आणि पौर्व्य संशोधकांनीं अशाच प्रकारचे थक्क करून सोडणारे सिद्धांत घातले नाहींत काय? संशोधनांत असे सिद्धप्राय सिद्धांत कांहीं एका विशिष्ट मर्यादेच्यापुढें घालावे लागतात. असे आजवर संशोधकाग्रणी घालीत आले आहेत. सामान्य लोकांनाच फक्त नव्हे तर सामान्यप्रतीच्या संशोधकांना व अभ्यासकांना हे सिद्धप्राय सिद्धांत पटत नाहीत त्यामुळे त्यांची उपहास करण्याची

प्रवृत्ति होते. परंतु पुढें संशोधनक्षेत्र जसें विस्तृत होतें, जशा नव्या गोष्टी उजेडांत येतात तसे हे सिद्धप्राय सिद्धांत सिद्ध होऊन, भरभक्कम पुराव्यानें प्रस्थापित होतात व सर्वमान्य होतात. अशी ही संशोधनशास्त्रांतील विचारसरणी आहे. ह्या विचारसरणीनें पाहिलें तर राजवाडे यांनीं व्युत्पादिलेल्ले धातु, त्यांनीं सुचविलेलीं संस्कृत प्रतीकें, त्यांनीं मध्यें मध्यें दिग्दर्शित केलेल्या स्वरप्रक्रिया ह्या गोष्टी आजवरच्या व्युत्पत्तिशास्त्रानें क्वचित् स्थलीं सिद्ध जरी न झाल्या, व जरी क्वचित् स्थलीं त्या दोहोंत विरोध दिसून आला तरी त्या व्युत्पत्तीच्या प्रयत्नाकडे आपणास सिद्धप्राय सिद्धांत (Brilliant Hypothesis) म्हणूनच पाहावयाचें आहे. व्युत्पत्तीची अतिव्याप्ति ही आहे खरी परंतु ती विनाकारण केली नसून शास्त्रपरिष्कारासाठीं केली, ती मराठीचें शब्दवैभव दाखविण्यासाठीं केली आहे, ती बुद्धिप्रकर्षानें केली आहे, अतएव तिच्याकडे वरील दृष्टीनें पाहाणें न्याय्य आहे.

९. वाच्यार्थ निर्वचन

त्यांत आणखीहि शास्त्रदृष्टि आहे. शास्त्र म्हटलें म्हणजे त्यांत मतमतांतरें हीं असणार. शब्दव्युत्पादन शास्त्रांतहि निरनिराळीं मतें आहेत. शब्दव्युत्पादन करतांना त्याचें स्वरूप पहावें, त्याचा अर्थ पहावा वगैरे दंडक यास्काचार्य देतात. शब्द व त्याची व्युत्पत्ति ह्यांच्यामध्यें वर्णसाम्य पाहिजे, अर्थसाम्यहि पाहिजे. केवळ एक असून चालत नाहीं. एकाच धातूचें स्वरूप एकसारखें असून त्याला निरनिराळे अर्थ असणें शक्य आहे. ह्या निरनिराळ्या अर्थांपैकीं कोणी एकच अर्थ मुख्य मूळ वाच्यार्थ मानून दुसरे अर्थ त्या वाच्यार्थावर अवलंबिलेले लक्ष्यार्थ मानतील तर इतर कोणी हे सर्व निरनिराळे अर्थ वाच्यार्थ मानतील. लक्षणामुळी मानणारच नाहींत. निरनिराळे अर्थ असणाऱ्या धातूंची व्युत्पत्ति सांगतांना ह्या वर सांगितलेल्या दोन्हीं विचारसरणींप्रमाणें प्रत्येक वाच्य अर्थाला निराळी व्युत्पत्ति सांगतां येईल किंवा एकाच वाच्य अर्थाला एक व्युत्पत्ति सांगून बाकीचे अर्थ लक्षणार्थ म्हणून निरवचितां येतील. व्युत्पादनाची ही द्विधा पद्धत होईल आणि राजवाडे हे त्यांच्या धातुव्युत्पादनावरून जर पाहिलें तर वाच्यार्थवादी नैरुक्त होते असें म्हणणें भाग पडतें. एकाच धातूस पुष्कळ अर्थ असतात. ह्या निरनिराळ्या अर्थाप्रमाणें त्या धातूचें स्वरूप एक जरी असलें तरी ते इतके निरनिराळे धातुच होत व त्यांच्या प्रत्येक अर्थाबरोबर त्या धातूची व्युत्पत्तिहि निराळी. एकाच शब्दाच्या भिन्नार्थास लक्षणेचेंच केवळ कार्य म्हणून जर ठरविलें तर अभिधावृत्तीचा क्षय होईल. कांहीं कांहीं शास्त्रकार शब्दाची एकच अभिधावृत्तिच फक्त मानतात. लक्षणा किंवा व्यंजना ह्या दोन वृत्ति मानीतच नाहींत. ह्या शास्त्रकारांना राजवाड्यांची भूमिका मान्य होण्यासारखी आहे. राजवाडे यांनीं धातुकोशांत एकाच धातूच्या ज्या निरनिराळ्या व्युत्पत्त्या दिल्या आहेत त्यांच्या मुळाशीं ही वरील भूमिका आहे.

१०. धातूंची याद म्हणून महत्त्व

आपल्याकडे वाङ्मयीन कोशासंबंधीं ज्या प्रकारचा व ज्या प्रमाणावर प्रयत्न व्हावयास

पाहिजे तितका आजवर झाला नाही. पाश्चात्त्य देशांत प्रत्येक कवीच्या काव्याचे कोश झाले आहेत. अमुक एक शब्द अमुक कवि किती प्रमाणांत वापरतो, अमक्या शब्दांची त्याच्या काव्यांत शेकडेवारी क़ाय आहे, अमुक एक शब्द कोणत्या अर्थानें व कोणत्या काळांत प्रथम वापरांत आला ह्या संबंधींची मोजदाद त्या त्या कवीच्या काव्याच्या आधारावर केलेली तिकडे पाश्चात्त्य राष्ट्रांत पाहण्यांत येते. तशा तऱ्हेचा प्रयत्न आपल्या कवींच्या बाबत झालेला नाहीं. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास. मोरोपंत वगैरेंच्या काव्यांतील शब्दांच्या कोशाचा अद्याप पत्ता नाहीं. मग धातुकोश, नामकोश, त्यांनीं नवी सुरू केलेली परिभाषा ह्यांची गोष्ट लांबच राहिली. प्रत्येक कवीच्या काव्याचा स्वतंत्र कोश होऊन त्यांत धातुकोश, नामकोश असे निरनिराळे कोश झाले तर प्रत्येक धातूचा, शब्दाचा एक प्रकारचा इतिहास सांगता येईल. अमुक एक धातु अमुक एका कवीनें प्रथम वापरला. त्याचा अमुक एक अर्थ होता. सध्यां त्याच्या अर्थात जो बदल दिसतो तो अमुक काळांत अमुक एका कवीनें केला व तो बदल होण्यास अमुक एक कारण झालें. असा इतिहास सांगता येतो. राजवाडे ह्यांनीं ज्ञानेश्वरीचा असा एक कोश करण्याच्या हेतूनें ज्ञानेश्वरीतील सर्व शब्द वर्णानुक्रमानें लिहून काढिले होते व ते त्यांच्या संग्रहांत आहेत; परंतु पुढें त्या शब्दांसंबंधीं जो परिष्कार करावयाचा त्यांचा मानस असावा असें वाटते तशा प्रकारचा परिष्कार त्यांनीं केलेला आढळत नाहीं. इतर कवींच्या बाबत असा प्रयत्न होणें जरूर आहे. मराठी भाषेच्या विकासाच्या मापनाच्या दृष्टीनें व व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीनें असा प्रयत्न होणें अत्यंत जरूर आहे. महानुभाववाङ्मय कोश, संतवाङ्मय कोश, रामदासीवाङ्मय कोश, शाहीर वगैरे जानपदगीत कोश, इत्यादि काव्यांचे कोशांबरोबर गद्यकोशहि करण्यासारखे आहेत. वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, सहदेवभाडळीचें ज्योतिषवाङ्मय, मराठी वैद्यकवाङ्मय इत्यादि सनातनी स्वरूपाचें मराठी गद्यवाङ्मय, बखर तवारिखा इत्यादि ऐतिहासिक वाङ्मय ह्या सर्व वाङ्मयाचें वर्गीकरण होऊन त्यांचे कोश होणें भाषेच्या दृष्टीनें हितावह आहे. धातुकोशाला महत्त्व जें येईल तें हे वर सांगितलेलें कोश तयार होतील त्या वेळेस येईल. त्या वेळेसच राजवाडे ह्यांनीं सांगितलेल्या व्युत्पत्तीस प्रत्यक्ष पुरावा मिळेल. त्यांनीं सांगितलेल्या अर्थाचा वाङ्मयातील उपयोग मिळेल. असे कोश तयार होतपर्यंत त्याला महत्त्व नाहीं असें नाहीं. ह्या कोशाला स्वतंत्र महत्त्व असें आहेच. राजवाडे ह्यांनीं दिलेली व्युत्पत्ति माना अगर न माना, त्यामधील कांहीं थोड्या धातूंची व्युत्पत्ति कांहींच्या मते हठात् निर्वचनार्ची उदाहरणें असलीं तरीं, कांहीं विद्वानांना त्यांत अशास्त्रीयत्व कितीहि दिसलें तरी ह्या धातुकोशाचें महत्त्व उरतेंच . धातुकोशांतील व्युत्पत्ति व निर्वचन सर्व बाजूस सारलें, त्याला कांहीहि किंमत दिली नाहीं व धातुकोशाकडे केवळ धातुकोश म्हणून जरी बघितलें तरी त्याचें महत्त्व आहे. मराठींतील झाडून सारे यच्चयावत् धातु एकत्र करून त्याची निब्बळ यादी तयार करणें हें एवढेंच मराठी भाषेच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. ज्यांना राजवाडे ह्यांची व्युत्पत्ति मान्य नाहीं त्यांनीं ह्या कोशाकडे केवळ मराठी धातूंची एकत्रित यादी म्हणून जरी पाहिलें तरी त्यांना प्रस्तुत कोशाचें महत्त्व कबूल करावें लागेल. परंतु राजवाड्यांची व्युत्पत्ति अब्बलपासून अखेरपर्यंत एकजात बेछूट वृत्तीची आहे असें

म्हणण्याची दृष्टि ही केव्हांहि विकृत किंवा एकान्तिकच ठरणार नाहि येथें सांगणें अवश्य आहे.

११. व्युत्पत्तिमोह

शब्दांच्या व्युत्पत्ति करणें हा एक प्रकारचा मोह आहे असें मोठमोठ्या नैरुक्तांनीं व वैय्याकरणांनीं कबूल केलें आहे. हा मोह अनावर होण्याचा संभव असतो. मोह अनावर झाला म्हणजे त्या मोहांत व्युत्पत्तिशास्त्रांतील कांहीं प्रमाद व कांहीं वेळां हास्यास्पद प्रमादहि होण्याचा संभव आहे. तशा तऱ्हेचा मोह इतर प्राचीन व अर्वाचीन कित्येक नामवंत नैरुक्तसूरींना झाला असल्यामुळें त्यांच्या हातून व्युत्पत्तिप्रमाद व तेहि हास्यास्पद व्युत्पत्तिप्रमाद झाले आहेत. प्रत्येक ब्राह्मणग्रंथांत किती तरी चमत्कारिक निर्वचनार्चीं उदाहरणें आहेत. तशींच पुढील सौत्र व औपनिषदीय वाङ्मयांतहि आढळतात, नाहीं असें नाहीं. आद्य निरुक्तकार म्हणून ज्याला आपण मान देतों, ज्यानें निरुक्तास व निर्वचनास शास्त्रीय वळण दिले म्हणून सर्व विद्वान् लोक मानतात त्या यास्काचार्याच्या निरुक्तांतहि कांहीं विलक्षण निर्वचनाचीं उदाहरणें सांपडतात. तीच गोष्ट वेदावर भाष्य करणाऱ्या सायणाचार्याची व निरुक्ताकार भाष्य करणाऱ्या दुर्गाची. बरें इंग्रज निर्वक्ते तरी ह्या मोहापासून मुक्त आहेत असें म्हणावें तरी तेंहि नाहीं. त्यांचेहि नमुने दिले आहेत त्यांवरून त्यांतील वैलक्षण्य दिसून येईल. पुढें बृहदारण्यकोपनिषत्, निरुक्त, सायण, दुर्ग, इंग्रजी, ह्यांमधील निवर्चनाचीं उदाहरणें दिलीं आहेत.

१. अर्चते वै मे कमभूदिति तदेवार्कस्य अर्कत्वम्.
२. आङ्गिरसोऽङ्गानांहि रसः (बृहदारण्यक १-३-८)
   — प्राणो वा अङ्गानां रसः प्राणोहि वा अंगानां रसस्तस्मात्
३. बृहस्पतिः- वाग्वै बृहती तस्या एषः पतिस्तस्मादु बृहस्पति (१-३-२०)
४. सामन्-वाग्वै सामैष सा चामश्चेति तत्साम्न; सामत्वम् (१-३-२२)
५. विद्युत्-विदानात् विद्यत्येनं पाप्मनः
६. क्षत्रम्-क्षत्रं प्राणो वै क्षत्रं- १ त्रायते हैनं प्राणः, २ क्षणितोः
   (बृहदारण्यकोपनिषद्)
७. इंद्रः— तम् इदंन्द्रंसन्तम् इन्द्र इत्याक्षते (ऐतरेयोपनिषद्)

यास्काच्या चमत्कारिक निर्वचनांचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

१. भीष्म-बिभ्यतेः; पुरुषः— १ पुरिषादः- २ पुरिषयः, ३ पूरयते.
२. पयः- १ पिबतेः, २ प्यायतेर्वा, क्षीरः- १ क्षरतेर्वा, २ घसेवा
३. अशुः- शम् अष्टमात्रः भवति, २ अननाय शम् भवति.
४. वृक्षः- १ व्रश्चनात्, २ वृत्वा क्षां तिष्ठति
५. शृङ्गम- १ श्रयतेर्वा, २ शृणातेर्वा, ३ शाम्नातेर्वा, ३ शरणायउद्गतम्, ४ शिरसः उद्गतम्
६. हिरण्यम्- १ ह्रियते आयम्यमानम् इति वा, २ हियते जनात् जनम् इतिवा, ३ हितरमणम् भवति, ४ हृदयरमणं भवत् ५ हर्यतेर्वा स्यात् प्रेत्साकर्मणः

७. अन्तरीक्षम्- १ अन्तरा क्षान्तं भवति २ अन्तरा इमे इति वा
८. समुद्र:-१ समुद्द्रवन्ति अस्मात् आप: २ समभिद्रवन्ति एनम्, आप: ३ संमोदन्ते अस्मिन् भूतानि ४ समुदको भवति ५ समुनत्तिवा
९. वृत्र- १ यद् अवृणोत् २ यद् अवर्तत, ३ यद् अवर्धत
१०. दुहिता- १ दुहिता, २ दोहिता, ३ दोग्धेर्वा:
११. अङ्गुलि-. १ अग्रगामिनी, २ अग्रगालिनी, ३ अग्रकारिणी, ४ अग्रसारिणी
१२. विधवा- १ विधातृका २ विधवनात् ३ विधावनात् ४ धववियोगात्
१३. सिंह- १ सहनात् २ हिसेसे: ३ संपूर्वस्य हन्ते: ४ संहाय हन्ति

याशियाय कन्या-कमनीयत्वात् कम् इयम्नेतव्या कंबोज- इत्यादि शब्दांच्या चमत्कारिक व्युत्पत्या यास्कानें दिलेल्या सर्वांच्या परिचयाच्या आहेत. त्या येथें देत नाहीं.

सायणाचार्यांनीं असेच काहीं व्युत्पत्तीचे चमत्कार केलेले त्यांच्या वेदभाष्यांत आढळतात त्यांपैकीं कांहीं खालीं देतों.

१. ऋभ्वम्-उरुभासनम् उरुभूतम् वा स्वप्न्- १ स्वप् २ सु + अप् + न्
२. होता- १ जुहोतेर्वा- २ व्हयतेर्वा
३. सरमा- १ सरतें, २ सृ + अमा:
४. वृषा- १ कामानां वर्षिता २ वृष्टे:, ३ वृ + स + (भ)
५. केतु- १ कित् कतयते: २ कृणुते:
६. विष्णु- १ विस्नो, २ वि + स्नु: ३ वि + सानु: ४ वि + सानु; ५ सानवि + अधि.
७. भुरण्यु- १ भुर + नी + उ:, २ भुर – भूरिम् + अध्वानम् ३ भुरण् + यु, ४ भुर् + ण् + यु
८. वप्- १ पेरणें, २ देणें, ३ अंगावर घालणें, ४ जाळणें, ५ नाश करणें, ६ ठार मारणें १-१६४-४४

इंग्रजींतील निर्वचनार्ची चमत्कारिक उदाहरणें:-

1. Almanac A.s. Al-mon-ag. = All- moon-heed = heeding to all the moons.
2. And- A.s an-ad i.e., add a heap. As Umu-To grant, A'd = Funeral pile.
3. Apple- A corruptionn of the Teutonic ap-fel = a fall from
4. Ask- a + Scitor (Lat)
5. Cheat - A. S. ceatta - cercumvent
6. Clerk- Gael. clar = a harp (Mackey)
7. Cloak- A. S. Lach = Skinner (Somner)
8. Coarse- Fren. Cours Corps, Gross, Currish (GK) X'e poos dry

9. Craven- Crave- hen. (Ash's Dictionary)
10. Fact- Lat-Fac-eve
    A.s Feg-an, Fegan
11. Faith- A. s. Faegth (Horne Tooke's theory)
12. Girl- Lat- Garrula; Ital- Girella
13. Monkey- Fren. Manque- a creature who has fallen short.
14. Piers the Plowman- Sayings of the teacher. Celtic- Fear- l.c. Follamain.
15. River- Rives- Splits asunder two countries.

राजवाडे धातुकोशांत कांहीं असें धातु दिले आहेत कीं त्यांची व्युत्पत्ति प्रथमदर्शनीं तितकीशी पटत नाहीं. हे धातु परकी असावेत अशी शंका येते. अशा धातूंच्या व्युत्पत्तीविषयीं जेथें आम्हांस शंका आली व जेथें मुळांत दिलेला धातु पाणिनि धातुपाठ किंवा इतर वैदिक, सौत्र व लौकिक वगैरे कोशांत आढळला नाहीं तेथें त्यांच्यापुढें आम्हीं प्रश्नचिन्ह केलें आहे. अशा धातूंचीं कांहीं उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत.

टपाल, जुमान, नकस, नकल, फित, पेंग (प्र + इंग्) पुरस्तपारस्तबरस्त्, पुचक (प्युस्), पछाण (प्रत्यभिज्ञान), पिच (पिच्छ्), पळुव (प्रलुभ्), चडफड, ढोपर, तटास, डामर इत्यादि.

१२. धातूंची संख्या

राजवाड्यांच्या धातुकोशांतील धातूंच्या संख्येचा विचार ह्यापुढें ओघानेंच प्राप्त होतो. संस्कृत प्राकृत अपभ्रंश मधील धातूंची संख्या स्थूल मानानें देतां येण्यासारखी आहे. मराठीमध्यें धातु किती असावेत ह्यासंबंधीं नक्की मोजदाद अद्याप झाली नाहीं. ही मोजदाद नक्की करणें हें मोठ्या प्रयासाचें व जिकिरीचें काम आहे. नुसती ग्रंथनिविष्ट भाषा किंवा कोणत्यातरी एका विशिष्ट केंद्राची किंवा कोणातरी एकाद्या विशिष्ट जमातीची भाषा घेऊन चालावयाचें नाहीं. अशा आकुंचित क्षेत्रांत वावरणारीच फक्त भाषा जमेंत धरून मराठी धातूंची संख्या नक्की कशी होणार ? सर्व प्रांतिक, कालिक, जातिक, गण्, भाषा एकत्र पाहून त्यांतील धातूंच्या एकंदर गणनेवरूनच हा अजमास बांधतां येईल. राजवाडे ह्यांनीं ज्या वेळोवेळीं चिठ्ठ्या केल्या त्यांची संख्या जवळ जवळ तीस हजारांवर झाली. तेव्हां अर्थात्च हा सर्व काल्पनिक पसारा आहे कीं खराखुरा व्यवहार आहे अशी शंका सर्वांना येणें साहजिकच आहे. संस्कृतांत धातु जर बावीचशें तर मराठींत तीस हजार धातू कोठून आणिले ? राजवाडे यांची ही धातूंची तीस हजार संख्या असंपादित व अपरिष्कृत चिठ्ठ्यांची होती. धातूंची नव्हे. संस्कृतमधील दोन हजार धातु हे विकरणदृष्ट्या गणले गेले आहेत. त्यांना उपसर्ग लागले म्हणजे ही संख्या कितीतरी हजारांनीं फुगणार, शिवाय संस्कृतमधील धातु हे प्राथमिक (Primary) स्वरूपाचे सिद्ध धातु होत. ह्या प्राथमिक सिद्ध धातूंपासून साधित (Secondary) धातु पुष्कळ तयार होतील. सिद्ध धातूंमध्यें पुन्हा चार प्रकार होतील. एक वैदिक, दुसरे लौकिक (संस्कृतमधील

वैदिक णिच् पासून सिद्ध झालेले), तिसरे संस्कृत तत्सम किंवा अर्धतत्सम झालेले, आणि चौथे देशी. अशा ह्या चार सिद्ध धातूंपासून झालेले साधित धातुहि पांच प्रकारचे आहेत. १. प्रयोजक (णिच्) २. नामसाधित ३. संयुक्त किंवा उपसर्गघटित तद्भव. ४. नादप्रधान. ५. संशयितमूळ. ह्यांतील दुसऱ्या प्रकाराचे पुन: तीन पोटप्रकार होतात. एतद्देशीय, तत्सम आणि नामेतरसाधित हे ते तीन प्रकार होत. एतद्देशीय प्रकारांत पुन: मूळ प्राचीनकाळचे आणि दुसरे घटित बनविलेले असे दोन प्रकार पडतात. अशा रीतीनें बारा ते पंधरा प्रकार होतात. ह्यांत पुन: उपसर्गांचा विचार केलाच नाहीं. उपसर्ग अठरा ते वीस पर्यंत आहेत. उपसर्गांसारखे इतर आणखी कांहीं शब्द धातूंना चिकटतात. अशा प्रकारचा हा धातूंचा संभार वाढतो आहे. तेव्हां मूळ बावीसशें धातूंचे तत्सम, अर्धतत्सम, तद्भव, अर्धतद्भव, उपसर्गसंलग्न, असे निरनिराळे किती तरी धातु बनतील. मॉनियर विलियम्स हा उपसर्गघटित धातु निराळे समजतो. असे मराठींत आलेले सर्व धातु मोजले तर त्यांची संख्या मूळ बावीसशें पेक्षां किती तरी अधिक होईल. परंतु ती संख्या आठ हजारांच्या वर जाईल कीं नाहीं हें आम्हास सांगवत नाहीं. हेंहि आम्ही भीतभीतच म्हणतों. पुढें धातूंची प्रत्यक्ष मोजदाद करून दिली आहे. तीहि ह्या संख्येशीं पडताळा देते. राजवाडे ह्यांनीं धातूंचीं प्रतीकें जुळवितां जुळवितां जुळविलीं व शेवटीं तीं मोजून पहातात तों त्या चिठ्ठ्यांची संख्या तीस हजारांवर आढळळी. धातु गोळा करतांना कित्येक धातु दोनदां तर तीनदां येऊन गेले असण्याचा संभव अधिक. पुनरावृत्ति हमखास झाली असलीच पाहिजे. त्यांनीं स्वतां पाहिलें असतें तर असे किती तरी धातु त्यांनीं काढून टाकले असते व विनाकारण फुगलेली संख्या त्यांनीं घटविलीं असती व तीस हजार संख्येनें जे कांहीं विद्वान् बुजले ते तसे बुजले नसते. ती संख्या घटवण्याचें काम प्रस्तुत संपादकानें केलें आहे व तें साधार, शास्त्रास व वस्तुस्थितीस कोठेंहि बाध न आणितां केलें आहे. राजवाड्यांनीं धातुकोशाच्या कच्च्या खर्ड्याचें काम पुरें केल्यावर द्विरुक्ति इत्यादि कारणांमुळें प्रथम धातूंची एकंदर झालेली तीस हजार संख्या घटून (त्यांच्या धातुकोशविषयक वाङ्मयांत उपलब्ध झालेल्या त्यांच्या स्वतांच्या हातांनीं तयार केलेल्या एका टिपणावरून) ती संख्या १५२२६ भरली आहे. प्रत्यक्ष धातुकोशाच्या छपाईचें काम सुरू होऊन सर्व ग्रंथ छापून झाल्यावर या ग्रंथांत संग्रहित केलेल्या एकंदर धातूंची संख्या १६१६० भरली आहे. ज्या धातूंचें निर्वचन बीज एक आहे व ज्यांचीं भिन्नार्थामुळे एकाहून अधिक बीजें आहेत अशा सर्व धातूंच्या संख्येची तपशीलवार माहिती कोशरचना परिचयांत दिलेली आहे. तीवरून धातूंची संख्या निश्चित झाली आहे असें दिसून येईल. वर नमूद केल्याप्रमाणें धातूंची ३० हजार संख्या घटून ती १५२२६ झाल्यावर प्रत्यक्ष धातुकोश छापल्यानंतर ही संख्या १६१६० कशी झाली याचा खुलासा प्रस्तुत स्थलीं करणें जरूर आहे. धातुकोशाचा कच्चा खर्डा राजवाड्यांनी लिहून तयार केल्यावर छापखान्याकडे द्यावयाची प्रत तयार करण्याचा त्यांचा विचार चालू असतां बराच काळ लोटला. या काळांत त्यांना कित्येक नवीन धातु आढळले. त्यांच्या त्यांनीं नवीन चिठ्ठ्या तयार करून त्या तयार केलेल्या कच्च्या खर्ड्यांत सामील केल्या यामुळें ही संख्या वाढली आहे. अखेर घटवीत घटवीत

ही संख्या चौदा हजारांपर्यंत कट्टाकट्टी आली आहे असें म्हणण्यास हरकत नाही. ह्यांतूनही आणखी बाद होण्याचा संभव आहे, नाहीं असें नाहीं. एकीकडून संस्कृतमधील बावीसशें ही संख्या उपसर्गघटित, तद्भव व देशी विदेशी ह्यांसह वाढत वाढत आठ हजारांपर्यंत गेलेली तर दुसरीकडून राजवाड्यांच्या धातूंची संख्या मागें हटत हटत चौदा हजारांपर्यंत आलेली. मराठी धातूंच्या संख्येच्या ह्या दोन पूर्व व उत्तर अशा मर्यादा होत. ह्याच्या आसपास कोठें तरी ती संख्या असली पाहिजे. हेहि विसरतां कामा नये कीं ही मोजदाद अगदीं विशाल मनानें व उदार दृष्टीनें केलेली आहे. नाहीं तर मराठी धातूंची संख्या आठ हजारांच्या सुमारास आहे असें आम्हास वाटतें.

१३. धातुपाठ व मानवशास्त्र

भाषेची संपत्ति शब्दसंग्रहावरून कळते. शब्दांची संपत्ति धातुसंग्रहावरून कळते. प्रयोगाच्या उपयोगक्षमतेवरूनहि भाषेचें ऐश्वर्य अजमाविण्याचा आणखी एक प्रकार आहे. संबंधी शब्दांचें प्राचुर्य जाऊन त्याच्याऐवजी प्रत्ययप्राचुर्य येतें व तसें झालें म्हणजे ती भाषा सुधारणेच्या मार्गावर आहे असें म्हणण्यांत येतें. ह्याच्याच पुढची पायरी म्हणजे प्रत्ययप्राचुर्य नाहींसें होऊन त्याऐवजीं विभक्तिप्रययरूपक अव्ययांचें प्राचुर्य येतें. ह्या दृष्टीनें पाहिलें कीं, ह्या अव्ययांच्या प्राचुर्यावर भाषेचें ऐश्वर्य अवलंबून आहे असें मानतात. ह्यापेकीं कांहीं जरी मत मानिलें तरी साधारणपणें शब्दसमूहावरून भाषेचें ऐश्वर्य ठरविणें हें कांहीं गैर होणार नाहीं. भाषेंत जितका शब्दसमूह अधिक तितका भाषेचा विस्तार, प्रसार, व्याप अधिक हें उघड आहे. जेथें व्यापच नाहीं तेथें त्याच्या दर्शक शब्दांची जरूरी तरी काय? त्यांतहि पुन: भाषेंत जितक्या क्रिया अधिक तितक्या त्या लोकांच्या हालचाली अधिक, तितके धातु अधिक. तेव्हां शेवटीं आपणास असें म्हणावें लागणार कीं ज्या भाषेंत धातु अधिक त्या भाषेंत क्रिया अधिक. ज्या राष्ट्रांत क्रिया अधिक त्या राष्ट्राचा व्याप अधिक, त्यांच्या हालचाली अधिक, तितके त्यांचे व्यापार अधिक, आणि जितक्या क्रिया अधिक तेवढे तितकें चैतन्य अधिक. शब्दांचें, त्यांतहि क्रियापदांचे, त्यांतहि धातूंचें प्राचुर्य आणि राष्ट्राच्या हालचाली, त्याचें उदयोन्मुखत्व ह्या सर्वांचा परस्पर संबंध कसा आहे हें वरील विवेचनावरून कळेल. एखादा समाज सुधारणेच्या कोणत्या अवस्थेंत आहे हें पाहावयाचें झालें तर त्या समाजाची भाषा पाहावी. त्यांतहि पुन: तिचा शब्दसमूह पाहावा; त्यांतहि पुन: तिचा धातुपाठ पहावा. अशा रीतीनें धातुपाठाचें मानवशास्त्रांत किती महत्त्व आहे हें कळून येईल. वेदकालीन समाजाच्या क्रिया काय होत्या हें वैदिक भाषेंतील धातुरूपांवरून तेव्हांच सांगता येईल. तीच ब्राह्मण, उपनिषदें वगैरे जुन्या ग्रंथांच्या भाषेंतील धातूंची गोष्ट. नुसत्या शब्दसमूहावरून त्या त्या कालच्या समाजस्थितीचीं अनुमानें बरोबर निघणार नाहींत. त्या त्या शब्दांतील धातु हुडकून त्यांच्या क्रिया काय होत्या हें समजलें तर ह्या आद्य समाजांची स्थिति अजमावतां येईल. वेद, ब्राह्मण, उपनिषदें व इतर जुन्या वाङ्मयातील क्रियापदांची रूपें जी महत्त्वाचीं धरतात तीं ह्यामुळेंच.

१४. पहिला वेदपूर्वकालीन भाषेंतील धातुपाठ- यास्काचा धातुपाठ

'धातु' हा शब्द धात्र् ह्या संस्कृत धातूस तन् (१-७२) हा उणादि प्रत्यय लागून सिद्ध झाला आहे. यास्कानेंहि 'धातुर्दधाते:' अशी त्याची व्युत्पत्ति दिली आहे. अमरकोशांत धातूला शब्दयोनि असें म्हटलें आहे. नामें धातूंपासून निघालीं किंवा नाहीं ह्या नैरुक्तकार आणि वैय्याकरणी यांच्यामध्ये झालेल्या वादाची चर्चा शाकटायनापासून तों अमरसिंहापर्यंतच्या काळांत चाललेली दिसतें. भाषेची प्रकृति वाक्य, वाक्याचा प्रकृति शब्द, शब्दाची प्रकृति धातु (एकवर्णीधातूपर्यंत) अशी ही परात्परा परंपरा आहे, व ही उघड दिसणारी परंपरा आहे. परंतु अत्यंत सूक्ष्मतेनें पाहिलें तर असें दिसेल कीं धातु हीच भाषेची मूळ प्रकृति आहे. मूळ आद्य माणसाचें आद्य वाक्य त्याच्या जवळच्या उपलब्ध साधनांच्या आधारावर उच्चारलेलें असें कोणतें असेल तर ते धातुच होत. हीच विचारसरणी मनांत ठेवून एका भाषाकोविदानें Every root is the undeveloped sentence of Primitive man असें म्हटलें आहे. आपल्या इकडील पौर्व्य व्याकरणकारांना हा सिद्धांत मान्यच आहे. पतंजलीनें ही चर्चा करतांना 'श्रोत्रिय' शब्द एकटा असून वाक्याचा अर्थ कसा दाखवितो हें सांगून धातूच्या गर्भांत सर्व वाक्याचा अर्थ कसा निविष्ट झाला आहे हें चांगल्या रीतीनें विशद केले आहे. संस्कृतमधील कोणतेंहि क्रियापदाचें रूप घेतलें तर तें वाक्य असतें. 'अद्मि' म्हणजे च अहमद्मि हें स्पष्ट आहे. ह्यांतील अद् हा धातु क्रियास्वरूपाचा व 'मि' ह्यांतील 'म्' किंवा 'इ' हा धातु सार्वनामिक स्वरूपाचा. ह्या दोन स्वरूपांच्या धातूंत किंवा बीजांत भाषेचा सर्व पसारा एकत्रित झालेला आहे.

भाषेंतील शब्दसमूहापैकीं सर्वांच्या अगोदरचे शब्द हे धातुच असावेत असें वरील विवेचनावरून समजून येईल. असें एकदां ठरलें म्हणजे आद्य भाषेंतील धातूंचा समूह कोणता असावा, त्यांत धातु कोणते असावेत, त्यांचीं स्वरूपें काय असावींत, त्यांचीं रूपें कशीं होत असलीं पाहिजेत, त्यांपासून इतर शब्द कसे तयार होत व ह्या आद्यभाषेतील आद्य धातुसमूहापासून दुसरे धातुपाठ कसे निष्पन्न झाले इत्यादि प्रश्न उद्भवतात. हे सर्व जरी आपणास विचारांत घेता येत नसले तरी जुने धातुपाठ कोणते असावेत व होते हे कालाच्या क्रमानें व उपलब्धीच्या मानानें पुढें दिले आहेत. प्रथम वेदपूर्वकालीन आर्यभाषेंतील धातुपाठ दिला आहे.

सर्व प्राचीन भाषांचा ऐतिहासिक व तौलनिक सूक्ष्म अभ्यास करून वेदपूर्वकालीन पन्नास धातूंची एक यादं प्रसिद्ध भाषाशास्त्रविद् डॉ. स्कीट ह्यांनीं मोठ्या परिश्रमानें तयार केली आहे. ती जशीच्या तशी त्यांच्या Etymological Dictionary मधून दिली आहे.

Ag Driving, An Breathing. AR Ploughing ED eating. ES Breathing. Being. EI going or moving. EUS Burning KAP Seizing. QER making (कृ). KEL covering. QI lying downm KLI leaning

against. KLEU hearing (श्रु). GWEM (गम्). going GEUS (जन्). Producing. GER (गृ) grining. GEUS (गुस) lasting. GHER glowing, shining. QHEU (धू) pouring. TEN (तन्) stretching. TEU swelling. DO (दा) giving. DEK Taking. DEIK (दिक्) Pointing out. DHE putting, placing. DHEIGH (दिह्) smearing. DHU (धू) shaking. PA feeding. PET flying. PED (पद) walking. PLEU flowing, floating. BHA (भा) speaking. BHER (भृ) carrying. BHEU growing. ME (मा) measuring. MER (मृ) Dying Mu muttering. YEUG (युज) joinging. REUP. (रंप) breaking. WEQ (वच्) calling. WES (वस्) Dwelling. WEID (विद्) knowing. SED (सद्) sitting. SAR-SAL Springing. SERP gliding. SEK cutting. SKID cleaving. STA standing. STER (स्तृ) spreading. SREU, STREU flowing.

वेदपूर्वकालीन आर्य भाषेंतील जुना असा धातुपाठ वर दिला आहे. हा धातुपाठ सर्व आर्य व आर्योद्भव भाषांतील धातूंचा तौलनिक विचार करून दिला आहे. ग्रीक, लॅटिन, लिथ्यूनीयन, स्लव्होनिक वगैरे पाश्चात्य आणि अवेस्ता संस्कृत प्राकृत इत्यादि पौर्व्य सर्व भाषांतील धातु घेऊन त्यांच्या मधील उच्चारप्रक्रिया पाहून वेदपूर्वकालीन आर्यभाषेंतील हा धातुपाठ निश्चित केला आहे. हा धातुपाठ निश्चित करतांना ह्या तौलनिक सर्वभाषीय साहित्याखेरीज कांहीं व्युत्पत्तिशास्त्रांतील कल्पनेला अगदीच वाव मिळाली नसेल असें सांगवत नाहीं. ह्यामध्यें बुद्धीला, कल्पनेला वाव दिली असण्याचा संभव आहे.

ह्या वेदपूर्वकालीन धातुपाठाशिवाय संस्कृत भाषेंतील जुन्यांत जुने असे दोन पाठ उल्लेखनीय आहेत. एक शाकटायनाचा व दुसरा यास्काचार्याचा. यास्काचार्यांनीं आपल्या निरुक्तामध्यें आपला धातुपाठ दिला आहे. तो पुढीलप्रमाणें आहे.

यास्क धातुपाठः-

मिष्, स्त्यै, शप्, श्रोण्, लज्ज, मथ्, जस्, सस्ज्, भद्, नद्, वि + पू, सप्, शुच्, सो, रुच्, कण, नु, रध्, स्निह्, क्नूय्, ईड्, नस्, धिष्, पिश्, मद्, अभि + अश्, पन्, शिज्, बन्ध्, तिज्, जृ, विष्, मृळ्, राध्, मन्, वेन्, चन्द्, मन्द्, दाश्, कु.

खालील धातू पाणिनीच्या धातुपाठांत नाहींत. परंतु यास्काचार्यांच्या निरुक्तात आहेत.

नक्ष्, मेथ्, पीय्, वजु, गध्, लत्, ओज्, स्थिर्

प्रसिद्ध प्राचीन व्याकरणकार शाकटायन ह्याचें प्रत्यक्ष व्याकरण उपलब्ध नाहीं. सध्यां जें शाकटायनाचें व्याकरण म्हणून प्रसिद्ध आहे तें ह्या प्राचीन व्याकरणमुनीचें नव्हे. तें कोणा तरी जैनधर्मीय शाकटायनाचें आहे असें विद्वानांचें म्हणणें आहे, व तें अर्थात् उत्तरकालीन आहे. त्याचा विचार येथे केला नाहीं.

पाणिनीच्या धातुपाठापूर्वी कांहीं धातुपाठ अस्तित्वांत होते ह्याविषयीं शंका नाहीं. यास्काचार्यांच्या धातुपाठाचा निर्देश व त्यांतील धातु हे मागें उल्लेखिले आहेतच. ह्यांच्याहि

पूर्वी आपिशलि नांवाच्या वैय्याकरणाचा धातुपाठ असावा असें वाटतें. 'अस्' ह्या धातूसंबंधींच्या चर्चेंत "सकारमस्तिंधातुमापिशलिराचार्यः प्रतिजानीते" असा उल्लेख आहे. 'अस्' हा धातु नुसता 'स्' ह्या स्वरूपांत आपिशलि आचार्य ओळखत होता.

१५. भाषेंतील क्रिया व तद्दर्शक धातु

एखाद्या राष्ट्राचा किंवा समाजाचा उद्योग त्याच्या भाषेवरून कळतो. भाषा ही समाजाच्या चलनवलनाचा आरसा आहे. तिच्यामध्यें समाजांतील यच्चयावत् हालचाल प्रतिबिंबित झालेली असते. समाज जितका संपन्न तितकीच त्याची भाषा संपन्न. समाजाची हालचाल त्याच्या क्रियांमध्ये दिसून येते. आणि क्रियादर्शक भाषेंतील शब्द म्हणजे धातु होत. भाषेंतील धातु पाहून ती भाषा बोलणाऱ्या समाजाची संस्कृति अजमावितां येईल. असें इतकें भाषेंतील धातूंचें महत्त्व आहे. धातुपाठ हा त्या त्या समाजाच्या संस्कृतीचें चांगले गमक आहे. संस्कृतमध्यें अजमासें धातु दोन हजारबावीसशें आहेत. त्यांपैकी २८७ धातु एकाच गति अर्थाचे आहेत. गत्यर्थाप्रमाणें इतर कांहीं शब्दकर्मे व हिंसाकर्मे, ज्ञानकर्मे असे एकाच अर्थाचे धातु आहेत. आतां ह्यांच्या एकाच अर्थांत निरनिराळ्या सूक्ष्म छटा निघतात व त्या दृष्टीनें हे सर्व धातु निरनिराळे आहेत. परंतु ते सर्व एकाच अर्थाचे समजून सोडून दिले तर आपणास अजमासें ५०० धातु सोडावे लागतील. बाकी १५०० धातु राहातील त्यांतूनहि एकाच अर्थाचे कांहीं दोन दोन, तीन तीन असे आढळणारे धातु सोडून दिले तरी स्वतंत्र निरनिराळ्या भिन्नभिन्न क्रिया दाखविणारे धातु अजमासें अत्यंत स्थूलमानानें एक हजार तरी राहातील. पाणनीच्या आसपासच्या काळांत किंवा ज्या समाजाची भाषा पाणिनीनें सूत्रांनीं बांधिली त्या आर्यसमाजांत निरनिराळ्या एक हजार क्रिया चालत व त्या हजार निरनिराळ्या क्रिया धातूंच्याकरवीं दाखवित्या जात असें मोघम अर्थानें म्हणावयास हरकत नाहीं. त्या क्रियांत निरनिराळें पुष्कळ प्रकार होते. शारीरिक, मानसिक, वैकारिक, वैचारिक, निसर्गांतील, आकाशांतील, पृथ्वीवरील असे एक ना दोन, किती प्रकार होते. लक्षणे, नीतोगत्ये, याचने, पूजने, विशेषणे, ग्रक्षणे, कांतौ, अनादरे, उद्यमें, अभियोगे, प्राणने, संभरणे, स्तवने, तपने, प्रतियत्ने, मूल्ये, आलिंगने, दाने, स्वाम्यर्थे, अवधीरणे, समाधाते, व्याप्तौ, आंदोलने, प्रजने, ऐश्वर्ये, स्वप्ने, क्षेपणे, ईर्ष्यायां, उपवेशने, शरधारणे, तंतुसंताने, उंछे, समवाये, विवासे, चेष्टायाम्, उपघाते, परिहाणे लौल्ये, अर्जने, वितर्के, वैक्लव्ये, कृच्छ्रजीवने, वर्षायाम्, शोके, आघ्याने, गात्रविघर्षणे, मदे, बंधने, संख्याने, रोगापनयने, भूतप्रादुर्भावे, अधाष्ट्र्ये, ग्लानौ, मथे, अवदारणे, वदनैकदेशे, दर्पे, ग्रथने, वाक्यस्खलने, उपलेपने, निकेतने, सेचने, स्तेयकरणे, प्रस्रवणे, परिकल्कने, श्रद्धायाम्, उपहनने, चित्रकरणे, शाठ्ये, भर्त्सने, भावकरणे, विलसने, परिभाषणहिंसातर्जनेषु, प्रव्हत्वे, समाधौ, नृतौ, चुंबने, युद्धे, आस्कंदने, अभियोगे, आर्द्रीभावे, क्लेदने, क्षोदे, आमर्शने, तितिक्षायाम्, प्राणत्यागे, समुच्छ्राये, पूतिभावे, असर्वोपयोगे, संतानक्रियायाम्, पैशुन्ये, सांत्वप्रयोगे, विशंकने, मदने, मदनिवासयोः भषणे, अवयवे, भेदने, निशामने, व्रीडने, कौशल्ये, विडंबने, पाके, तनूकरणे, वर्णे, पुरीषोत्सर्गे, ष्टुतौ, उपतापे, परिबृंहणे, संश्लेषणे, विप्रयोगे, स्नेहच्छेदापहरणेषु, विक्रांतौ

इत्यादि इत्यादि. अशा किती तरी प्रकारच्या क्रिया आहेत.

१६. क्रिया व तद्दर्शक संस्कृत धातु

पाणिनीच्या धातुपाठांत एकंदर धातु बावीसशें आहेत असें मानण्याचा प्रघात आहे. तशी परंपरा आहे. प्रत्यक्ष परिगणन केलें तर इतके बावीसशें भरत नाहींत. कांहीं प्रतींत २००० पर्यंत भरतात. कांहींत ती संख्या १७०० च्या वर आहे. हे सर्व धातू गणाच्या क्रमानें सांगितले आहेत. भ्वादि वगैरे गणव्यवस्था पाणिनीनें लाविली आहे. प्रत्येक गणाप्रमाणें धातु लावून प्रत्येक गणांत पुन: वर्णानुक्रमानें धातूंची रचना केली आहे. प्रत्येक धातु देऊन त्याच्यापुढें त्या धातूचा अर्थ दिला आहे. तो अर्थ त्या क्रियेचें द्योतक नाम करून त्याच्या सप्तमी विभक्तींत सांगितला आहे. गाने, दाने, गमने, गतौ, शब्दे, घोरवासिते, देवशब्दे, क्रीडायाम्, हिंसायाम्, अव्यक्तायां वाचि असा प्रत्येक धातूचा अर्थ दिला आहे. कांहीं ठिकाणीं अर्थ दाखविण्यासाठीं क्रियाद्योतक नाम घेऊन त्याच्यापुढें 'अर्थ' हा शब्द लावून त्याची पुन:सप्तमी किंवा प्रथमा घातली आहे. गानार्थे, भाषार्थे, भाषार्थ:, सेवार्थ: अशी योजना आहे. एक अर्थ देतांना जी योजना तीच एकापेक्षां अधिक अर्थ देतांना योजना केली आहे. भर्त्सनदीप्त्यो:, कल्याणेसुखेच, भिक्षायां अलाभे लाभेच, वरणसंघातयो:, भूतप्रादुर्भावे इत्यादि एकापेक्षां अधिक अर्थ दिले आहेत.

१७. पाणिनीचा धातुपाठ- त्याविषयीं निरनिराळे मतभेद

पाणिनीच्या धातुपाठासंबंधी बराच मतभेद विद्वानांमध्यें आहे. हा धातुपाठ पाणिनीनें स्वत: रचिला नाहीं असें एक मत आहे. कोणी म्हणतात पाणिनीच्या मूळच्या धातुपाठांत आणखी कांहीं धातु पाठीमागून कोणी तरी घुसडून दिले आहेत. गणपाठाची व्यवस्था पाणिनीची आहे; परंतु धातुपाठाची व्यवस्था मात्र त्याची नाहीं असेंहि कांहीं विद्वान् म्हणतात.

अष्टाध्यायीच्या एकंदर रचनेंत तीन भाग आहेत व ते तिन्हीं पाणिनीचे आहेत. सूत्रपाठ, गणपाठ, धातुपाठ हे तिन्ही पाठ पाणिनीनें रचिले आहेत. ह्या तिन्ही पाठांचीं निरनिराळ्या काळीं निरानिराळीं संस्करणें झालीं असण्याचा संभव आहे व त्यामुळें मूळच्या पाणिनीच्या संहितेमध्ये पुष्कळ पाठपाठांतर घुसडले गेल्याचा संभव आहे. धातुपाठ हा मूळ अष्टाध्यायीच्या शेवटी आला असला तरी तो परिशिष्ट स्वरूपाचा नाहीं. तो मूळ ग्रंथांतील भाग आहे. पाठीमागून जोडलेला नाहीं हे दाखविणारी गमकें मूळग्रंथांत सांपडतात. पाणिनीला त्याच्या पूर्वसूरींपासून हा धातुपाठ किंवा ह्याचा कांहीं भाग उपदेश म्हणून मिळाला व तो त्यानें आपल्या ग्रंथांत निविष्ट केला. अष्टाध्यायींतील इतर बराच भाग अशाच रीतीनें उपदेश म्हणून पाणिनीस पूर्वसूरींपासून मिळाला होता.

पाणिनीच्या सूत्रांसंबंधीं तीन प्रकारची व्यवस्था असल्याचें आढळून येतें. एक मूळची खुद्द पाणिनीची. त्यानें आपल्याला विषयाचा उपन्यास करण्यास योग्य, विवेचनाच्या ओघाप्रमाणें जशीं सूत्रें त्याला योग्य वाटलीं तशीं घेऊन त्यांना एक क्रम देऊन त्यानें व्याख्यान केलें

हा एक प्रकार. दुसरा प्रकार प्रकरणाप्रमाणें त्याची व्यवस्था केली हा. सर्व सूत्रांचे वर्गीकरण करून त्या त्या सूत्रांचें प्रकरण ठरवून त्यांचे निरनिराळे वर्ग केले. तिसरा प्रकार धातूंच्या संबंधाचा. सर्व धातूंपैकीं प्रत्येक धातु निरनिराळा घेऊन त्याचीं सर्व रूपें सिद्ध करावयाचीं आणि सिद्ध करतांना निरनिराळीं सूत्रें व त्यांचा संबंध आणावयाचा. ह्या प्रकारानें सूत्रव्यवस्था काशिकाकार वामन, धातुवृत्तिकार माधव क्षीरस्वामी वगैरेंनी व्यवस्था केली. पहिला प्रकार पाणिनीचा तर दुसरा प्रकार भट्टोजी दीक्षित वगैरेंचा व तिसरा प्रकार वामन, माधव वगैरेंचा. पाणिनीनें धातु दिले परंतु त्या धातूंचे अर्थ मात्र त्यानें दिले नाहींत; ते कोणींतरी इतरानें दिले अशीहि एक विचारसरणी आहे. धातुपाठांतील धातूंचे अर्थ भीमसेन ह्यानें दिले. धातूंच्या अर्थांपैकीं कांहीं धातूंचें अर्थ फक्त पाणिनीनें दिले; सर्वांचे दिले नाहींत असेंहि आणखी एक मत आहे. अशा प्रकारचें मतवैविध्य पाणिनीच्या धातुपाठासंबंधीं आहे. ह्या सर्वांचा विचार करणें हें शक्य असलें तरी सध्यांच्या आपल्या क्षेत्रांत तें बसत नाहीं. पाणिनीचा धातुपाठ हा पाणिनीचाच, कांहीं धातूंचा अर्थ पाणिनीनें दिल्याचें इतर ठिकाणीं आलेल्या त्याच्या उल्लेखांवरून सिद्ध होतें. हा धातुपाठ आहे त्या स्वरूपांत फार प्राचीन काळापासून असल्याची ग्वाही इतर प्राचीन नामांकित वैय्याकरणी देत आहेत.

ह्याशिवाय पाणिनीनें धातूंस अनुबंध जोडले आहेत. अनुबंध म्हणजे कांहीं संज्ञा होत. त्या त्या अक्षरावरून त्या त्या धातूबाबत होणारी क्रियाप्रक्रिया सर्व त्या अनुबंधावरून जाणिली जाते. अनुबंध हीं साधीं अक्षरें होत. तीं अक्षरें त्यांनीं द्योतित होणाऱ्या क्रिया ह्या सर्व पाणिनीनें आपल्या व्याकरणाच्या सोयीसाठीं कांहीं तरी ठरविल्या आहेत. त्यासंबंधीं कांहीं एक विशेष अरा नियम नाहीं. ह्या अनुबंधांचा उल्लेख मागें केलाच आहे.

१८. पाणिनिनिर्दिष्ट गतिक्रिया व त्यांसंबंधीं विवेचन

एक गतिच पाहावयाची झाली तर तिच्यामध्यें कितीतरी प्रकार आढळतात. नुसत्या एका गतीचा उल्लेख करण्यासाठीं कांहीं तीनशें धातूंची प्रवृत्ति खास नाहीं. नुसत्या पाणिनीच्या धातुपाठांतील अर्थावरून पाहिलें तर एका गतींत वीस एकवीस प्रकार सांपडतात. पुनः त्यांचे वाङ्मयातील उपयोग पाहिले तर त्यांतील आणखीहि कांहीं प्रकार स्पष्ट होतील. त्याच्याहि पुढें जाऊन ह्या गत्यर्थ धातूंपासून निघालेले प्राकृत धातु किंवा त्यांच्यामार्फत हिंदुस्थानांतील आधुनिक भाषांत- हिंदी, बंगाली, गुजराथी, मराठी, उरिया वगैरे भाषांत उतरलेले धातु व त्यांच्या निरनिराळ्या छटा पाहिल्या तर आणखी बराच ह्या सामान्य गत्यर्थावर प्रकाश पडेल. पाणिनीनें नोंदलेल्या तीनशें धातूंच्या तीनशें निरनिराळ्या गति, मानसिक, शारीरिक, आध्यात्मिक, वाच्यार्थाच्या, लक्ष्यार्थाच्या, व्यङ्ग्यार्थाच्या अशा गति प्रतीयमान होतील. मात्र त्याला हा सर्व खटाटोप केला पाहिजे. प्राकृत व आधुनिक बोली त्यासाठी तपासल्या पाहिजेत.

पाणिनीनें निर्दिष्ट केलेले गतीचे निरनिराळे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत. १ स्पंद्- किंचिच्चलने, २ अत्-सातत्यगमने ३ त्रद्चेष्टायाम्, ३ वधिःगत्याक्षेपे, ५ मधिः गत्यारंभे, ६ फक्कनीचैर्गतौ, ७ घट्ट-चलने, ८ चुप्-मंदायांगतौ, ९ रेव्-प्लवगतौ, १० दक्ष्शीघ्रगतौ, ११ त्सर-छद्मगतौ,

१२ धौ-गतिचातुर्ये, १३ खागतिप्रतिघाते, १४ श्वल्- आशुगमने, १५ शश्- प्लुतगतौ, १६ अक्- कुटिलायांगतौ, १७ द्यु- अभिगमने, १८ डी-विहायसागतौ, १९ तुर् - त्वरणे, २० पुर् - अग्रगमने.

१९. पाणिनीचा धातुपाठ व वर्तमानकालीन बोली यांचा संबंध.

आधुनिक आर्यबोलींचा अभ्यास करून त्यांच्यांतील गत्यर्थ धातूंची तपासणी केली तर संस्कृतमधील गत्यर्थ धातूंच्या बऱ्याच छटा दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय राहाणार नाहींत. उदाहरणार्थ, फक्त मराठीच भाषा घेऊं. प्रथम संस्कृत गत्यर्थ धातु देऊन पुढें मराठी धातु दिला आहे. त्यावरून गतीच्या प्रकाराची कल्पना येईल. स्पंद-स्पंदतो (डोळा), सेक्-सेक १ शेक् (काम अंगावर शेकलें-आलें), श्वक्-सरक, श्वक्-सवक्, त्रौक-ठोक (धूम), स्वक्-सवक, वस्क्-वसकन अंगावर जाणें, मस्क- मचकणें, टिक्-टिक (कपडा टिकला), रंघ्-रांगणें, लंघ-लंगड, वंघ-वांकणें, शुक्-शुक (मांजराचें जाणें), वख्-वख्वख्, वल्-वळग, वंग्-वंगणें (तो मला वंगला), फक्क-फाकणें, फक्कड, तंग्-तगणें, त्यंग-तवंग, श्रंग्-सरंग, श्लंग्-सळंग, इंग्-इंगा (फिरणें), रिंग्-रिंगरिक, शिंख्-शिंख (माशी मध्येंच शिंकली).

एक 'गति' ही क्रिया घेतलीं तर त्या क्रियेचे किती प्रकार संभवतात व त्या क्रिया दाखविणारे धातु किती होते हें येथवर सांगितलें. 'गति' ह्या क्रियेसारख्याच आणखी पाणिनीच्या धातुपाठांत निर्देशिलेल्या एक दोन क्रिया त्यांच्या निरनिराळ्या सूक्ष्म छटांसह खालीं देऊन आम्ही वर प्रतिपादिलेला सिद्धांत अधिक सबल करतों. 'शब्दे.' म्हणजे आवाज करणें ह्या एका क्रियेचे पुढील प्रमाणें अर्थ पाणिनीनें दिले आहेत. (स्नाद्) १ शब्दे २ अव्यक्तेशब्दे ३ (पर्द) कुत्सित शब्दे ४ (मद) व्यक्तायां वाचि ५ (शभ्) भाषणे) ६ (जप्) मानसे ७ (धुष्) अविशब्दने ८ (द्राक्ष्) घोरवासिते ९ (वद्) परिभाषणे १० (कास्) शब्दकुत्सायाम् ११ भाषायाम् १२ (घुर्) भीमार्थशब्दयो: १३ (कुद्) अनृतभाषणे १४ (कृत्) संशब्दने १५ (मंन्त्र्) गुप्तपरिभाषणे १६ (घुष्) विशब्दने १७ (स्तन्) देवशब्दे इत्यादि. ह्याशिवाय आणखी कांहीं अर्थ सांपडण्याचा संभव आहे. 'हिंसार्थ' धातूंच्या अर्थाची स्थितिही अशीच आहे. त्यांच्या अर्थाच्या छटांतहि असाच निरनिराळा अर्थ आढळण्यांत येतो. हिंसा ही शारीरिक, मानसिक, आत्मिक अशा तिन्ही प्रकारची असून त्यांत पुन: शब्दानें हिंसा, शस्त्रानें हिंसा, कर्मानें हिंसा अशा निरनिराळ्या हिंसा असणें शक्य आहे. हुळहुळणें ही एक प्रकारची हिंसा तर तोडणें ही दुसरी हिंसा, रांधणें ही एक हिंसा तर द्रोहणें ही दुसरीच हिंसा, चर्चणें ही एक हिंसा तर जाचणें ही दुसरी हिंसा, रुसणें ही एक हिंसा तर तिंबणें ही दुसरी हिंसा, असे नाना प्रकारच्या हिंसेचे प्रकार असल्याचें त्या त्या धातूवरून व त्या धातूच्या अवशिष्ट स्वरूपावरून आपणास अजमावतां येतें. ह्याच क्रियांसारख्या आणखी स्थैर्य आणि क्रीडा ह्या दोन क्रिया आहेत. ह्यांच्याहि बाबत अर्थाच्या निरनिराळ्या छटा त्या त्या धातूंत असल्याचें आपणास आढळून येतें.

२०. गत्यर्थास्तेऽज्ञानार्था: ह्याची उपपत्ति

पाणिनीच्या धातु पाठांतील मुख्य क्रिया येथवर सांगितल्या. ह्या सर्व क्रियांमध्यें गति ही क्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. पाणिनीच्या धातुपाठांतील एकदंर २२०० धातूंमधील कितीतरी धातु जवळ जवळ तिसरा हिस्सा धातु हे गत्यर्थ आहेत. इतके हे गत्यर्थ धातु कां झाले ह्याचा अर्थ वर निष्पन्न करून दिला आहे. संस्कृतमध्यें धातूचा अर्थ निर्देशिण्याची रीत अगदी सामान्य व स्थूल स्वरूपाची होती. व्युत्पादक किंवा अर्थानिष्पादक हे फार खोल पाण्यांत शिरत नसत. सूक्ष्म छटांचा अर्थ न सांगता स्थूल सामान्य अर्थ असाच सांगत. एका गत्यर्थ धातूंची संख्या अजमासें २८७ किंवा जवळजवळ तीनशें आहे. एकच क्रियेचे निदर्शक इतके तीनशें धातु असणें शक्य नाहीं. भाषा ही मोठी कंजुष स्वभावाची संस्था आहे. तिला उधळेपणा माहीत नसतो. योग्य जिन्नसाचा योग्य उपयोग करण्याचा सुग्रणपणा भाषासरस्वतीच्या रोमरंध्री खिळला आहे. तेव्हां सुग्रणपणा संस्कृत भाषा तीनशें धातूंची विनाकारण उधळपट्टी कां म्हणून करील ? तेव्हां त्याच्या मुळाशीं ह्या निरनिराळ्या छटा असल्या पाहिजेत व प्रत्यक्ष धातु वापरताना त्या त्या भिन्न छटेप्रमाणें धातुहि पण निराळा निराळा वापरीत हे उघड आहे. ह्याशिवाय ह्या सामान्य अर्थाच्या धातूंच्या मुळाशीं आणखी एक प्रवृत्ति असावी असें वाटतें. आणि ती म्हणजे ही. एकाच धातूंची निरनिराळीं रूपें निरनिराळ्या प्रांतांत व निरनिराळ्या समाजघटकांत वापरांत असावीं व तीं सर्व पाणिनीनें आपल्या धातुपाठांत मोठ्या साक्षेपानें निविष्ट केली असावींत. उदाहरणार्थ- स्रक् व श्रक्, स्वक्ष् व स्वष्वक्ष्, वस्क,- मस्क्, टिक्,- टीक्, तिक्, -तीक्, तग्,-त्यग्, श्रग्,-श्लग्, रिग्-रग्, -लग्-लिग्, श्वच्-शच्, अन्च्,-वन्च, चन्च्,-त्यन्च; ध्रज्-धृज्-ध्रिज्, हुड्,-हुड्-होड्, मेप्-रेप्-लेप्, पर्प्-अर्व्-लर्व्-बर्व्-मर्व्-कर्व्-खर्व्- गर्व्-पर्व्-चर्व्, अय्-वय्-पय्-मय्-चय्-तय्-णय्-दय्-रय्-लय्, वेल-चेल्, केल्-खेल्-क्ष्वेल्-वेल्ल्-पेल्-फेल्-झेल्-षल्-श्वल्,- इत्यादि. असे कितीतरी धातु आहेत कीं त्यांच्या रूपांत किंचितसा फरक आढळतो. हीं सर्व रूपें प्राचीन काळीं निरनिराळ्या प्रांतिक बोलींत किंवा जातिक किंवा गणबोलींत रूढ असावींत व तीं सर्व पाणिनीनें नोंदली. नुसत्या अनुनासिकाच्या फरकानेंच फक्त निराळीं झालेल्री रूपें पाणिनीनें सांगितलीं आहेत. प्राचीन कालीं संस्कृतभाषा बोली म्हणून वापरणाऱ्या लोकांच्यामध्यें एक समाज सानुनासिक भाषा वापरें व दुसरा समाज निरनुनासिक भाषा वापरे. अशा प्रकारचा नासिक्यमूल उच्चारभेद पाणिनीने आपल्या धातुपाठांत नमूद केलासा दिसतो. कारण त्याच्या धातुपाठांत दोन्ही प्रकारचे धातु आढळतात. उदा. उख्-उंख्, वख्-वंख, इख्-इंख्, अग्-अंग्, त्रिख्-त्रिंख्, सस्ज्-संस्ज्, ध्रज्-ध्रंज् ध्वज्-ध्वंज्, खज्-खंज्, अट्-अंट्, रफ्-रंफ्, किट्-कंट्, लुठ्-लुंठ् इत्यादि. ह्या सर्व विवेचनावरून असें दिसून याईल कीं पाणिनीच्या धातुपाठांत त्याच्या काळच्या संस्कृत बोलींतील केवळ वरच्या सुसंस्कृत थरावरील लोकांच्या वापरांतील किंवा मध्यवर्ती नागर संस्कृत भाषेंतीलच फक्त धातु नमूद आहेत असें नाहीं तर त्याच्या काळच्या प्रांतिक, ग्रामिक, जातिक व गणभाषा इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या बोलींत प्रत्यक्ष वापरांत असलेले सुद्धां धातु नमूद

आहेत हें उघड आहे. ह्या अशा सर्वांगीण परिगणनेमुळेंच पाणिनीचा धातुपाठ इतका २२०० धातूंपर्यंत वाढलेला दिसतो. पाणिनीच्या धातुपाठांत गत्यर्थक धातु अजमासें तीनशें आहेत असें वर सांगितलें व त्यासंबंधीं आमची उपपत्तिहि वर मांडली. जी गत्यर्थ धातूंची गत तीच ज्ञानार्थ धातूंची. "येगत्यर्थास्ते ज्ञानार्था:" असा गत्यर्थ धातूंसंबंधींचा व्याकरणकारांचा सर्वमान्य सिद्धांत आहे व त्याचा पडताळा प्रत्यक्ष भाषेंतील उपयोगावरून मिळतो. ह्या सिद्धांताप्रमाणें 'ये हिंसार्थास्ते ज्ञानार्था:" असाहि पण दुसरा एक सिद्धांत आहे. भाषेच्या प्रत्यक्ष व्यवहारांत एकच धातु गति व ज्ञान ह्या दोन्ही क्रिया दाखविण्यासाठीं वापरलेला आढळल्याखेरीज व अशा धातूंची संख्या पुष्कळ आढळल्याखेरीज व्याकरणकारांनीं असा सिद्धांत केला नसावा. दोन्ही क्रियादर्शक एकच धातु असे पुष्कळ आढळल्यानंतर हा सिद्धांत रूढ झाला असावा. हिंसा व ज्ञान ह्या दोन्ही क्रिया दाखविणारे धातु एकस्वरूपी आढळल्यानंतर "ये हिंसार्थास्ते ज्ञानार्था:" असा समज रूढ झाला. व्याकरणकारांनीं जो नियम केला तो प्रत्यक्ष दाखवल्याखेरीज केला नाहीं हे उघड आहे. भाषेच्या व्यवहारांतील, वाङ्मयाच्या व्यवहारांतील एक ठोकळ स्वरूपाचा सिद्धांत आहे इतकेंच.

परंतु त्याच्याहि मुळाशीं जावयाचें म्हटलें म्हणजे बोलणाऱ्याच्या मनांत तरी अशी प्रवृत्ति कां व्हावी? एकाच धातूला एक संकेत 'गति' हा दिला. त्यानंतर त्याच धातूला 'ज्ञान' असा दुसरा संकेत कां दिला जावा? बरें, हा असला द्विविधसंकेत एका धातूवरच नाहीं तर सर्व तीनशें धातूंवर तरी कां व्हावा? ह्यावरून अनुमान हें होतें कीं गति आणि ज्ञप्ति ह्या दोन्हीं क्रियांत कांहीं तरी साम्य असलें पाहिजे आणि तें साम्य मूळ संकेत देतांना संकेत देणाऱ्यास प्रतीत झालें असावें; एरव्ही असा संकेत येताना असें साम्य ह्या दोन्हीं क्रियांत काय दिसलें! हीं सर्व अनुमानेंच आहेत. गतीमध्यें एक प्रकारची चलनक्रिया आहे. एक प्रकारचें पुर:चलन आहे. ज्ञप्तीमध्येहि एक प्रकारची चलनक्रिया आहे. तिच्यामध्येहि पुर:चलन आहे. फरक इतकाच, गतीमध्यें चलन ही प्रत्यक्ष शारीरिक क्रिया आहे व ज्ञप्तीमध्यें चलन ही मानसिक क्रिया आहे. दोन्हींमध्यें ओघ आहे. एक गतीचा ओघ आहे तर दुसरा सरस्वतीचा ओघ आहे. गतीची ही सामान्य कल्पना गति व ज्ञप्ति ह्या दोन्हींमध्ये असल्यामुळें तर 'ये गत्यर्थास्ते ज्ञानार्था:' असा सिद्धांत प्रचलित झाला नसेल ना? गत्यर्थ धातूंच्या बाबतींत असलें कांहींतरी अनुमान करतां आलें परंतु हिंसार्थ धातूंच्या बाबतींत तेंहि शक्य नाहीं. कारण गति आणि हिंसा ह्या दोन्ही क्रियांत साम्य कोणतें? कोणत्या प्रकारचें क्रियैक्य पाहून हा सिद्धांत रूढ झाला हें सांगण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पुन्हा अनुमानाचाच आश्रय करावयास हवा.

२१. सौत्रधातु

पाणिनीच्या धातुपाठांतील धातूंचा येथवर विचार केला. धातुपाठांतील धातूंशिवाय पाणिनीच्या सूत्रांत आणखी अधिक कांहीं धातु पाणिनीनें वापरलेले आहेत. ह्या धातूंना सौत्र धातु म्हणतात. असे पाणिनीचे सौत्र धातु ५२ आहेत. परंतु बोपदेव ह्यानें आपल्या कविकल्पद्रुम

ह्या ग्रंथांत जी यादी दिली आहे त्यांची संख्या चवेचाळीस आहे. दोन्ही यादींतील बहुतेक धातु सारखेच आहेत. हे धातु पाणिनि ज्या अर्थी प्रत्यक्ष सूत्रांमध्यें वापरतो त्या अर्थी ते संस्कृतमध्यें वापरांत होते ह्यांत शंका नाहीं. त्यांतील कित्येक धातु अपभ्रष्ट होऊन मराठींत वापरांत असलेले दिसतात. उदा. कर्क्-खुदुक (हसणें), चक् - चकित (भ्रांत होणें), मर्क्-मुरक् (हलणें), सिक्- शिरकाव, शिवाक (शिंपडणे), मज्-मचमच (आवाज शब्द करणें), मट्-मटकन (बसणें), कुठ्-कुटणें, (मारणें) वड्-उडणें (अंगावर चढणें), उल-हुळहुळणें (भाजणें) इत्यादि. ह्या सौत्र धातूंची याद खाली दिली आहे.

सौत्रधातव:

कर्क्-हासे, चक्-भ्रांतौ मर्क्-सर्पे सिक्-सिचि मर्च्-ग्राहे कज्-रुहे पज्-रोधे मज्-ध्वनौ मट्-सादे, वंट्-स्तेये कुठ्-छिदि उड्-संहतौ वड्-आरोहणे कुत्व्-आस्तृतौ पुत्त-गतौ ल्त्-घाते सात्क्-सुखे उड्र-आघाते क्षद्-संवृतौ सुद्-शोभे कप्-चपले क्षुप्-सादे रिफ्-कुत्सने रिभ्-रवे; स्तन्भ्-स्तुन्भ्-स्कन्भ्-स्कुन्भ्- ग्रु-रोधने, डिम्-हिंसे धम्-ध्याने पीय्-प्रीणने उर्-गतौ तंद्र्-सादे उल्-दाहे लुल्-विमदने शल्-तल्-गतौ मृश्-गतिस्मृत्यौ रश्-खने भिष्-रुग्जये युष्-भजने लुप्-हिंसने.

(कवि कल्पद्रुम-बोपदेव)

२२, २३. बोपदेवाचा धातुपाठ व प्राकृत भाषांतील धातुपाठ

ज्याप्रमाणें संस्कृतमधील पाणिनीचा धातुपाठ सांगितला तसचे इतर वैय्याकरणांचे धातुपाठ आहेत. पाणनीच्या पूर्वीचे व्याकरणकार यांचे धातूपाठ असले पाहिजेत. दुर्दैवानें ते उपलब्ध नाहींत. पहिला व्याकरणकार शाकटायन ह्यांचें व्याकरण उपलब्ध नाहीं. सध्यां शाकटायनाच्या नांवावर जें व्याकरण आहे असें समजण्यांत येतें तो शाकटायन हा यास्कपूर्वकालीन शाकटायन नसून इतर कोणी तरी उत्तरकालीन जैन ग्रंथकार आहे असा विद्वानांचा समज आहे. गार्ग्य, काशकृत्स्न, आपिशली, स्थौलाष्ठिवी वगैरेंची व्याकरणें उपलब्ध नाहींत. पूर्वसूरी म्हणून त्यांचीं नावें यास्क, पाणिनि, पतंजलि वगैरेंच्या ग्रंथांत येतात इतकाच काय तो त्यांच्या व्याकरणासंबंधींचा पुरावा. तेव्हां त्यांच्या व्याकरणांतील धातुपाठ उपलब्ध नाहींत. पाणिनीच्यानंतरचे संस्कृत व्याकरणकारांपैकीं बोपदेव व भोज ह्या दोघां वैय्याकरणांचे धातुपाठ उपलब्ध आहेत.

बोपदेवाचा कविकल्पद्रुम ह्या नांवाचा लहानसा ग्रंथ आहे. त्यामध्यें धातुकोश आहे. बोपदेवानें आपले धातु पाणिनीच्या धातुपाठाप्रमाणें रचिले नसून निराळ्या पद्धतीनें रचिले आहेत. धातूच्या अन्त्य वर्णाप्रमाणें त्यांची मांडणी आहे. पाणिनीच्या एकंदर रचनेंत बराच फरक करून स्वतंत्र रीतीनें मांडणी केल्यामुळें बोपदेवास व्रात्य वैय्याकरणी असें कांहीं विद्वान् समजतात. धातूंना गणव्यवस्था लावण्याचें काम प्रथम पाणिनीनें केलें. परंतु बोपदेवानें अन्त्यवर्णानुसार व्यवस्था केली. दान्त, कान्त, धान्त, मान्त इत्यादि त्यानें धातूंचे वर्ग केले. काशिकाकार वामन किंवा

धातुवृत्तिकार माधव किंवा क्षीरस्वामी ह्यांनीं प्रत्येक धातु घेऊन त्याचीं सर्व रूपें पाणिनीनें दिलेल्या प्रक्रियांनुसार दिलीं आहेत. पाणिनीचा धातुपाठ श्लोकबद्ध नाहीं, परंतु बोपदेवाचा धातुपाठ श्लोकबद्ध आहे.

काशिका, धातुवृत्ति, कविकल्पद्रुप ह्यांशिवाय धातूंसंबंधी आणखी उल्लेखनीय ग्रंथ म्हटले म्हणजे भट्टमल्ल याचा क्रियानिघण्टु, गणनिघण्टु, गणमंजरी; जूमरनन्दिन् पूर्णचंद्र हेमचंद्र यांचा धातुपारायण, गणरत्नमहोदधि हे होत. ह्या प्रत्येकांत धातूंचें विवेचन, त्यांचीं निरनिराळी रूपें, त्यांच्या प्रक्रिया इत्यादि गोष्टी दिल्या आहेत.

बोपदेवानें दिलेल्या धातूंची संख्या १७५४ भरते (सप्तदशत्या षट्कोनषष्ट्या- बोपदेव कविकल्पद्रुम १). त्यानें दिलेले धातु मोजून पाहिले तर १७०७ भरतात. तेव्हां संख्येसंबंधीं कांहींतरी थोडा फार घोटाळा असावा.

अशी ही संस्कृत भाषेंतील धातुपाठांची सामान्यरूपानें मांडणी आहे. पुढील पाली किंवा प्राकृत ह्या भाषांतील धातुपाठांची मांडणी त्यापेक्षां निराळी आहे. ह्यांमध्ये प्रक्रिया ही विशेष प्रामुख्यानें सांगण्यांत येते. संस्कृत ही मूळ प्रकृति व त्या भाषेंतील धातु हे मूळ धातु अशी समजूत असल्यामुळें प्रत्येक प्राकृत धातु हा कोणत्यातरी संस्कृत धातूंशीं संबद्ध करावा लागला. त्यासाठीं दोहोंचीं रूपें जवळ जवळ ठेवावीं लागलीं. त्यांचे अर्थ द्यावे लागले; त्यांचे वर्णदिश उकलावे लागले; हे सर्व प्रकार प्राकृत धातुपाठांत सांपडतात, वररुचि, हेमचंद्र, लक्ष्मीधर ह्यांचे प्राकृत धातुपाठ ह्या स्वरूपाचे आहेत. पहिला प्राकृत वैय्याकरणी चण्ड याच्या व्याकरणांत धातुपाठ नाहीं.

२४. चण्डाचा धातुपाठ

प्राकृत व्याकरणकार चण्ड ह्याच्या व्याकरणांत मात्र स्वतंत्र धातुपाठ असा दिलेला दिसत नाहीं. त्याच्या व्याकरणांत स्वरविधि, व्यंजनविधि, प्रत्ययविधि असे तीन विधि तीन प्रकरणांत देऊन सर्व प्राकृतचें व्याकरण सांगितलें आहे. हें प्राकृत व्याकरण जुन्यांतील जुनें असें समजलें जातें. ह्याचा काल अजमासें ख्रिस्तशतक पहिलें असें समजतात. ह्या व्याकरणाचें क्षेत्रच मर्यादित असल्यामुळें धातूंचा स्वतंत्र विचार केलेला त्यांत आढळत नाहीं. धातूंच्या स्वरूपांत स्वरव्यंजनांचे जे कांही फरक होतात त्यांच्यापैकीं थोडे फरक चण्ड आपल्या स्वरविधि व व्यंजनविधि ह्या प्रकरणांत सांगतो. हें सर्व धातुप्रकरण अगदीं त्रोटक किंवा दुर्लक्षितच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. स्वतंत्र धातुपाठ तर नाहींच नाहीं. चण्डाच्या व्याकरणानंतर वररुचीचें व्याकरण प्राकृतप्रकाश हेंच येतें.

२५. वररुचीचा धातुपाठ. त्याचे धात्वादेश

वररुचीनें आपल्या 'प्राकृतप्रकाश' ह्या व्याकरणाच्या सप्तम परिच्छेदांत धातुपाठ दिला आहे. त्याच्या धातुपाठांत विशेष आदेशप्रक्रिया केलेले धातु साधारणपणें ११६ आहेत. वररुचि हा आपल्या धातुपाठाला धातुविधि म्हणतो. प्रथम संस्कृत धातु देऊन त्याच्यापुढें प्राकृत

रूपें त्यानें दिलीं आहेत. धातूचें रूप देतांना संस्कृत धातूंना जे आदेश होतात, त्या आदेशांसह रूपें दिलीं आहेत. त्यांमध्यें विकरणचिन्हें लागलेलीं दिसतात. कांहीं कांहीं आदेशप्रक्रिया अगदीं चमत्कारिक स्वरूपाच्या आहेत. ह्या चमत्कारिक अर्थप्रक्रियांचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं, एकाच अर्थाचे दोन निरनिराळे धातु होते आणि ते एकत्र आणिले आहेत. अमुक एका संस्कृत धातूपासून अमुक एक प्राकृत रूप निघालेलें आहे असें आपणास स्वर व व्यंजन ह्यांच्या चमत्कारिक बदलांवरून म्हणतां येत नाहीं. चि-चिण, क्री-किण, क्ष-झिज, नृत्-नच्च, युध्-जुज्झ, गृद्-गिज्झ, सिध्-सिज्झ, क्रुध्-कुज्झ, ग्रह-गेण्ह, कृ-कुण ह्या धातूंच्या बाबत संस्कृतमधील धातु आपल्या गणविकरणासह प्राकृतमध्यें आलेले आहेत असें आपणास दिसतें. धातु आणि त्याचें गणचिन्ह हीं दोन्हीं इतकीं एकरूप झालीं कीं दोन्ही मिळून एक सगळा धातु, दोन्ही मिळून झालेलें रूप म्हणजेच तो धातु अशी समजूत रूढ झाली. धातु इतका वापरांत असला पाहिजे की, त्याच्या गणचिन्हांचे स्वतंत्रत्व नष्ट झालें असलें पाहिजे. सर्व धातूंपेक्षां ह्या धातूंचा वापर त्या काळच्या भाषेंत अधिक असला पाहिजे असें अनुमान करतां येण्यासारखें आहे. भू-हुव-हुअ, त्वर्-तुवर, घूर्ण्-घोल-घुम्म, नुद्-णोल्ल, हृ--हरि, निषद्-निसज्ज, जल्प्-जंप, कै-गाअ, ध्यै-झाय, खाद्-खा, अवगाह्-ओवाह, अवकाश्-ओवास-अवआस, ओवास्-अवआस, भिद्-भिन्द, छिद्-छिन्द, कथ,-कद्ध, वृध्-वड्ढ, हन्-हम्म-हण, स्तू-थुण, इत्यादि धातूंचीं रूपें पाहिलीं तर संस्कृत व प्राकृत ह्या दोन्हींच्या वर्णप्रक्रिया मनाला पटण्यासारख्या आहेत असें दिसतें. अमुक एका संस्कृत वर्णापासून अमुक एक प्राकृत वर्ण निघाला व तसा तो निघणे शक्य आहे असें आपणास सांगतां येतें. ही झालेली आदेशप्रक्रिया व्युत्पत्तिशास्त्राच्या नियमांना अनुसरून आहे, अशी खात्री होते.

ह्याशिवाय आणखी एक धात्वादेशाचा प्रकार वररुचीच्या धातुविधित आढळून येतो. खिद्-विसूर, क्रुध्-जूर, त्रस्-वज्ज, मृज्-लुभ्, मस्ज्-बुड्ड-खुप, दृश्-पुल्, णिअच्छ-अवक्ख-सच्चव, शक्-वअ, विलंब्-थक्क, क्षिप्-खिव, गोप्-णूम, भुज्-जेंव, अर्ज्-विढप्प इत्यादि धातूंच्या बाबीत संस्कृत धातु आणि प्राकृत धातु ह्यांमध्ये कोणतेंहि वर्णसाम्य किंवा उच्चारसाम्य आढळत नाहीं. त्यामध्यें अर्थसाम्य किंवा अर्थैक्य आहे व त्यामुळेंच ते धातु सांधले गेले आहेत. संस्कृत धातु निराळा आणि प्राकृत धातु निराळा, दोहोंची मुळें निराळीं. वररुचीच्या धातुविधींत जी परिस्थिति आहे तीच चंड, हेमचंद्र, लक्ष्मीधर इत्यादि प्राकृत व्याकणकारांच्या धातुविधींत आढळून येते. हे सर्व व्याकरणकार वर्णप्रक्रियांकडे विशेष लक्ष न देतां अर्थसाम्याकडें लक्ष देतात.

२६. हेमचंद्राचे धात्वादेश

प्राकृत व्याकरणकारांपैकी वररुचीच्या धातुपाठाची रूपरेखा वर दिली आहे. प्राकृत व्याकरणकारांमध्यें वररुचि हा जसा एक प्रमुख व्याकरणकार म्हणून समजला जातो, तसाच हेमचंद्र हाहि तितकाच प्रमुख समजला जातो. हेमचंद्राच्या व्याकरणांतील धातुपाठाची किंचित्शी

कल्पना खालीं देण्याचा प्रयत्न केला आहे. वररुचि किंवा हेमचंद्र ह्या दोघांची धातुपाठाची एकंदर मांडणी सारखीच आहे. एकंदर स्वरूप सारखेंच आहे. धातुपाठांत धात्वादेश देण्याकडेच त्या दोघांची प्रवृत्ति आहे. खालीं उदाहरणें दिलीं आहेत.

'कथ्' ह्या धातूला वज्जर, पज्जर, उप्पाल, पिसुण, सङ्घ, बोल्ल, चव, जम्प, सीस, साह हे सर्व आदेश होतात.

खरें पाहिलें तर 'कथ्' ह्या धातूला कांहींतरी वर्णप्रक्रिया होऊन त्याचीं हे सर्व धातु निरनिराळी रूपें होत असा ह्याचा अर्थ नाहीं. कारण कथ् ह्या दोन वर्णांचीं कोणत्याहि वर्णप्रक्रियेच्या नियमानें बोल्ल, पज्जर, वज्जर इत्यादि रूपें होणें शक्य नाहीं. हे सर्व एकाच अर्थाचे धातु होत इतकाच त्याचा अर्थ आपणास घेतला पाहिजे. वर दिलेल्या प्राकृत धातूंची मूळ संस्कृत रूपें काढावयाचींच म्हटलीं तर शक्य आहे. 'बल्ह्' पासून बोल्ल, 'संख्या'- पासून सांघ, 'जल्प्' पासून जंप, 'चम्' पासून चंव, 'निर्वेद' पासून णिव्वर इत्यादि.

ज्या धातूंच्या बाबतींत असें संस्कृत धातु व्युत्पत्तीच्या नियमांनीं काढतां येत नाहींत, ज्यांच्या संस्कृत छाया सहज किंवा प्रयत्नत: मिळत नाहींत त्या धातूंना कोणत्यातरी समानार्थक संस्कृत धातूंचें आदेश न समजतां उघड उघड देशी धातु समजावे हें फार चांगलें. उदाहरणार्थ, 'पिब्' धातूला पिज्ज हा आदेश होणें शक्य आहे परंतु 'डल्ल, घोट्ट' हे आदेश होणें शक्य नाहीं. तेव्हां डल्ल, घोट्ट हे निराळे स्वतंत्र देशी धातु मानणेंच सयुक्तिक होईल.

असेच धातु पुढें कांहीं देतों. अब्भुत्त (स्ना), थक्क (स्था पासून नसून स्थग् पासून अधिक शक्य), निरप्प, उक्कुर (उत्तिष्ठ), ढक्क (छद्), णिहोड्, ओलुग्ड [विरिच् (?) अवलंघ्], गुण्ठ [उध्दल (?) ग्रंथ, गुंथ], पक्खोड [विकोशयति (?) अपस्खलित], वोक्क, अवुक्क [विजाना (?)], अल्लिव, चचुप्प, पणामइ (अर्पयति (?), गुल्ल (चाटु करोति), ढिक्क, कुक्क, पोक्क (व्याह्), बुक्क (गर्ज), चोप्पड, मक्ख, दुण्दुल्ल बुड्ड.

हेमचंद्राच्या धातुपाठांत कांहीं प्राकृत धातु संस्कृतमधील त्या त्या गणचिह्नासह आलेले आहेत. संस्कृत धातु आपल्या गणविकरणासह प्राकृतमध्यें आला आहे. धातूंची गणचिह्नासह येण्याची ही प्रवृत्ति हेमचंद्रास न समजल्यामुळें त्याच्या हातून त्या त्या धातूंना संस्कृत धातूंचे आदेश म्हणून समजण्याचा प्रमाद झाला आहे. उदाहरणार्थ पुढील धातु गणविकरणासह आलेले दिसतात.

जाण, मुण, निम्माण, किण, बीहइ, सुण, कुण, चिण, जिण, सुण, हुण, थुण, लुण, पुण, धुण.

हेमचंद्राच्या धातुपाठांत असे पुन: कांहीं धातु आहेत कीं ते संस्कृतमधील धातूंपासून प्रत्यक्ष आले नसून त्यांच्या कांहीं एका विशिष्ट रूपांपासून आले आहेत.

चिट्ठ (तिष्ठ), आइध (आजिघ्र,), पिज्ज (पीय), जुज्झ (युध्य), बुज्झ (बूध्य), गिज्झ (गृध्य), कुज्झ (कुध्य), सिज्झ (सिध्य), मुज्झ (मुह्य).

एका धातूला एकच आदेश होतो असा नियम नाहीं. एकापेक्षां अधिक आदेश एकाच धातूला झालेले हेमचंद्राच्या धातुपाठांत आहेत. हेमचंद्रानें ते मोठ्या साक्षेपानें दिले आहेत.

एकच 'ओढ' धातु निरनिराळ्या संस्कृत धातूंपासून आदेश होऊन येणें शक्य आहे व तसा तो आला किंवा तसा तो येणें शक्य आहे असें कोणीं दाखविलें तर त्या व्युत्पत्तीला अगदींच बुजून चौखूर उधळून दुगाण्या झाडण्यापर्यंत मजल नेण्यांत अर्थ काय? हेमचंद्रानें एका कथ् धातूचे दहा, जुगुप्सा धातूचे तीन, पिब्चे चार, तिष्ठचे चार, छद्चे सहा, निली धातूचे सहा, स्मर् धातूचे नऊ, निस्सरचे चार, मुच् ह्या धातूचे सात, भुज् धातूचे आठ, भञ् धातूचे नऊ, तुड्चे नऊ, मण्ड्चे पांच, क्षिप्चे नऊ, मृद्चे सात, उत्क्षिप् धातूचे सहा, असे एकापेक्षां अधिक आदेश हेमचंद्रानें दिले आहेत. भ्रम् ह्या धातूचे तर अठरा आदेश दिले आहेत, व त्यांमध्ये पुढील विचित्र रूपें आहेत. नमुन्यासाठीं सर्व ओळींनें पुढें देतों :- टिरिटिल्ल, दुण्दुल्ल, ढण्ढल्ल, चंक्रम, भम्मड, भमड, भमाड, तलअण्ट, झण्ट, झम्प, भुम, गुम, फुम, दुम, दुस, परी, पर, भम् ह्या धातूच्या अठरा विचित्र आदेशांप्रमाणें गम् ह्या संस्कृत धातूचे हेमचंद्रानें दिलेले एकवीस आदेश पहाण्यासारखे आहेत. तेहि येथें देतों.

'गम'चे प्राकृत आदेश:- अइ, अइच्छ, अणुवज्ज, अवजस, उक्कुस, अक्कुस, पच्चइ, पच्छन्द, णिम्मह, णी, णीण, णीलुक्क, पदअ, रम्पइ, परिअल्ल, बोल परिअल, णिरिणास, णियह, अवरेह, अवहर.

हेमचंद्र हा गम् धातूच्या बाबतींत एकवीस संख्येवरच थांबला. त्याला पाणिनीसारख्या गत्यर्थ, हिंसार्थ, ज्ञानार्थ किंवा शब्दार्थ धातूंच्या यादीच्या यादी देतां आल्या नाहींत.

ह्या धातूंच्या आदेशांत देशी धातु पुष्कळच असले पाहिजेत हें अगदीं उघड आहे. ह्या देशी धातूंना प्राकृत भाषांत त्या त्या समानार्थक संस्कृत धातूंचे आदेश म्हणून अंतर्भूत करून घेतले, इतकाच ह्या प्राकृत आदेशप्रक्रियेचा सरळ व उघड अर्थ आहे. ह्यापेक्षा व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या त्यांना अधिक किंमत नाहीं.

येथपावेतों केलेल्या विवेचनांत संस्कृत व प्राकृत इत्यादि भाषांतील धातुपाठांचे बाबतींत पूर्वकालीन निरनिराळ्या वैय्याकरणांनीं निर्माण केलेल्या वाङ्मयाचें स्थूल दिग्दर्शन केलें. या विवेचनांतील पूर्वपरंपरेस अनुसरून मराठी भाषेंत ज्ञानेश्वरकालापासून आजतागाईत जवळजवळ सातशें वर्षांच्या काळांत मराठी धातुपाठांविषयींचें वाङ्मय निर्माण करणारा कोणीच वैय्याकरण झाला नाहीं या गोष्टीचा विस्मय वाटतो! अशा स्थितींत राजवाड्यांनीं मराठी धातुपाठाची रचना करून मराठी भाषेची अपूर्व अशी वाङ्मयविषयक कामगिरी केली ही गोष्ट नमूद करण्यास आम्हांस मोठा अभिमान वाटतो.

२७. शब्दबीजांचें महत्त्व

धातु किंवा शब्दबीजें हीं भाषेंतील आद्य प्रतीकें होत. ह्या बिजांपासून खालींवर चोहोंकडे विस्तारलेल्या अशा भाषारूपी अश्वत्थाची उत्पत्ति व वाढ होते. पशुपक्ष्यादिकांच्या एकसुरी आरटन सुरापासून मानवी भाषा जी भिन्न ठरते ती ह्या शब्दबीजांमुळेंच. भाषेंतील शब्दांचा विच्छेद करतां करतां परम सीमा जी आदळून येते तीं हीं शब्दबीजें होत. भाषेंतील उभी शब्दसृष्टि ज्या मुशींत ओतून तिला पक्केपणा आणिला जातो ती मूस म्हणजे हीं शब्दबीजें

होत. निरनिराळ्या ध्वनींचा कच्चा लादा ह्या मुशींत घालून त्यावर अर्थाच्या संकेताचा छाप अथवा ठसा उठवून कालान्तरानें त्याला पक्केपणा आणण्यांत येतो.

२८. धातूंचे प्रकार

ह्या शब्दबीजांचे प्रकारच जर पाडावयाचे झाले तर दोन प्रकार पडतात. एक सार्वनामिक बीजें व दुसरा क्रियाबीजें. पैकीं पहिल्या सार्वजनिक बीजांपासून पूर्वयोगी व परयोगी अव्ययें, उभयान्वयी अव्ययें आणि सर्व प्रत्यय इत्यादिकांची उत्पत्ति होते. दुसऱ्या क्रियावीजांपासून नामें, विशेषणें, क्रियापदें, क्रियाविशेषणें इत्यादिकांची उत्पत्ति होते. (साईस भाषाशास्त्र V. 2ch. b.) कांहीं शब्दांत दोन्ही प्रकारचीं बीजें सांपडतात. उदाहरणार्थ, अहम् हा शब्द सर्वनाम असून त्याचा अर्थ मी असा आहे. अहम् हा शब्द इतका जुना आहे कीं जुनी जुनी म्हणून समजलेली वेदांची भाषा ही सुद्धां त्याच्या मानानें काल परवांची ठरेल. ह्या अहम् शब्दांत दोन्हीं प्रकारची बीजें सांपडतात. 'अह' हें क्रियावाचक बीज व 'म्' हें सार्वनामिक बीज (भाषाशास्त्र मराठीभाषा पृ. ५८). शब्दबीजांचे जे दोन प्रकार सांगितले त्यांपैकीं भाषेंतील शब्दव्यवहार किंवा वाग्व्यापार बऱ्याच अंशीं क्रियावाचक बीजांवर अवलंबून असल्यामुळें त्या भाषेंतील क्रियावाचक बीजांचें परिगणन करणें हें महत्त्वाचें व शास्त्रीय असें कार्य ठरतें.

शब्दबीजांचें परिगणन करणें किंवा धातुपाठ तयार करणें ह्याचें महत्त्व आणखी एका दृष्टीनें आहे. धातुपाठामुळें व्युत्पत्तिशास्त्राच्या कल्पनांसंबंधीहि क्रांति झालेली आहे. शब्दाची व्युत्पत्ति सांगणें म्हणजे एक प्रकारची बुद्धीची कसरत करणें अशी समजूत होती. वाटेल त्या शब्दाची वाटेल ती व्युत्पत्ति काढणें व जितकी व्युत्पत्ति चमत्कारिक, विलक्षण तितकी बुद्धि तीक्ष्ण व चपल अशी समजूत प्रत्यक्ष विद्वान् लोकांची असे. अशा प्रकारच्या विलक्षण व्युत्पत्तीचीं उदाहरणें पौरस्त्य व पाश्चात्य ह्या दोन्ही ग्रंथांमध्ये सांपडतात. शब्दांचें निर्वचन करतांना स्वरांकडे लक्ष देण्याची जरूरी नाहीं व व्यंजनांकडे लक्ष दिलेंच तर थोडें द्यावें अशा प्रकारचा चमत्कारिक सिद्धांत जुन्या पाश्चात्य व्युत्पत्तिशास्त्रज्ञांचा होता. हटात् निर्वचन केल्याचीं उदाहरणें आपल्या इकडील ग्रंथांत कांहीं कमी नाहींत. परंतु अलीकडे व्युत्पत्तिशास्त्रांत एक प्रकारचें नवे युग सुरू झालें आहे. त्यामध्ये ऐतिह्यसिक स्वरूप आलें आहे. शब्दांची व्युत्पत्ति देतांना त्यांचे स्वरव्यंजनादि सर्व वर्ण विचारांत घेऊन त्यांचा अर्थावहलच्या संकेतांशीं संबंध बांधून त्या शब्दांच्या भोंवतीं निरनिराळ्या काळीं वावरत असलेल्या ऐतिहासिक वातावरणाच्या अनुरोधानें त्या शब्दांची व्युत्पत्ति देणें ही त्या शास्त्रांतील आधुनिक पद्धत आहे. मूळ धातूला कोणते शब्द कोणत्या काळांत चिकटले व अशा चिकट्या शब्दांचें रूपांतर प्रत्ययांत केव्हां झालें, त्यांचीं निरनिराळीं अवस्थांतरें काय झालीं, त्यांच्या अर्थांत निरनिराळ्या काळीं काय भेद झाले व ह्या सर्वांस त्या त्या काळच्या वाङ्मयांत आधार काय उपलब्ध होतो हें पाहणें हाच व्युत्पादनाचा शास्त्रशुद्ध मार्ग होय. ह्या मार्गांत केवळ कल्पनाशक्तीस कांहीं वाव सांपडत नाहीं. स्वरूपभेद व अर्थभेद ह्याबाबत ऐतिहासिक दृष्टि ठेवावी लागते. अशा प्रकारच्या शास्त्रशुद्ध व्युत्पत्तीच्या आधारानें भाषांचें पृथक्करण करण्याकडे आधुनिक भाषाशास्त्राचा रोंख आहे. संस्कृत

भाषेच्या संशोधनानें तौलनिक व्युत्पतिशास्त्रास जास्त वाव मिळाला आहे. निरनिराळ्या भाषांतील शब्दबीजें शोधून त्यांच्या तुलना करून त्यांमध्यें जे वर्णसाम्य अथवा स्वरूपसाम्य आढळून आलें त्यावरून जगांतील भाषांचे वंश ठरवितां आले. भाषांचे वंश ठरविण्याचे जे दोन प्रकार आहेत त्यांपैकीं शब्दबीजांचें स्वरूपसाम्य हा प्रकार दुसऱ्या प्रकृतिप्रत्ययांच्या संबंधापेक्षां अधिक महत्त्वाचा आहे. ह्या शब्दबीजांच्या साम्यावरून जगांतील भाषांचे आर्य, सेमिटिक [ट्यूरेणियन], द्राविडी, बांटु वगैरे वंश ठरविण्यांत आले आहेत. ग्रीक, लॅटिन, लिथूनियन, गॉथिक आर्य युरोपीय भाषा व झेन्द, पेल्हवी, संस्कृत, प्राकृत वगैरे आर्य भारतीय भाषा ह्या सर्व एकाच आर्य, भाषेच्या बुंध्यापासून निघाल्या हें जें निश्चयानें सांगतां येतें तें ह्या शब्दबीजांच्या साम्यावरून. हीच गोष्ट सेमिटिक, ट्यूरेणियन किंवा बांटु भाषांची (साईस, भाग २, प्रकरण ८)

२९. आर्यभाषेंतील धातु

धातूंचीं बीजें सर्व भाषांत सारख्या स्वरूपाचीं असतात असें नाहीं. आर्यभाषांत धातुबीजें एक प्रकारचीं तर द्राविडीभाषांत दुसऱ्या प्रकारचीं तर तिसऱ्या ट्यूरेणियनभाषांत अगदींच तिसऱ्या प्रकारचीं. सेमिटिक भाषेंतील धातु स्वरविरहित व त्रिव्यंजनात्मक असतात. उदा. क्तल् (मारणें), सल्म् (शांतता राखणें), सज्द् (प्रार्थना करणें) इत्यादि. आर्यभाषेतील धातूंत एक स्वर असतो. उदा. इ. ऋ, कर, तुद, स्पन्, इत्यादि. द्राविडी धातुहि आर्यदातूप्रमाणे एकस्वरी असतात. मुख्य आर्यभाषेच्या युरोपियन व भारतीय शाखांचें परस्परांचें एकवंशीय नातें ज्या धातूंच्या स्वरूपसाम्यावर ठरवितां आलें त्यांपैकीं कांहीं पुढें देतों. धातूपासून निघालेले संस्कृत, ग्रीक, लॅटिन, इंग्लिश, झेंद इत्यादि भाषांतील शब्दहि देतों.[१]

१ Ac अश् (to be sharp) अशन्, अश्न, अश्मन् अश्री edge. लॅटिन- Agna. Ekka.

२. A'zo (Drive) (सं) अज्रा, अहामि, अह्यु, अंहस्, (लॅ.) Ango, (angry) (इंग्लिश) Acre, Agent, Agile, Action.

३. Eimi (go) (सं.) आयु. एव (झें.) year. (इं.) Aye. (लॅ.) Imes, Ienli.

४. Era (रा-वल्हविणें) (सं.) अरितार्, अरितृ. (इं.) oar, Rudder.

५. Emo (I take) (स.) आमति, एमिवान.

६. Edo (I eat) (सं.) अद्मि (लॅ.) Edo. (इं.) Eat.

७. Eiso, Isko (I desire) (सं.) इच्छामि इष् (लिथूनियन) Jeskoti (इं.) Ask.

८. Gle'zho (I play) (सं.) ग्लाहते (इं.) Play, Pledge.

९. Glenko (I pluck) (सं.) ग्लेचामि (लॅ.) Pliuha.

१०. Gleu (to form into balls) (सं.) ग्लौ, (लॅ.) Gluere (इं.) Clue.

११. Gĕro (I swallow) (सं.) जिरति, गिरति (म.) गिळणें (लॅ.) Vorare (इं.) Crag.

१२. Gero (to sound) (सं.) जरति. (लिथूनियन) grochu, groti (इं.) Crane, crow, croon.
१३. Ǵemŏo (I come, go) (सं.) गामति, (झेन्द) जमैति, (गॉथिक) gima, (इं.) come.
१४. Ǵe (to sound) (सं.) गायति, (इं.) quoth. chitchat (गदगद)
१५. Ghadh (to grasp) (सं.) गाध् (स्लॅव्होनिक) godite (इं.) Gather, to gether.
१६. Ghedhyo (I ask) (झेन्द) Jaidhyemi. (इं.) bid.
१७. Ghe̊o (I burn) (सं.) घृणति, घृणी (लॅटिन) Furnus Formus. (इं.) Brand, Burn.
१८. Gheño (I strike) (सं.) हन्मि, घ्नन्ति (लिथ्) Ginee ginti. (ग्रीक)'o vos.

विस्तारभयास्तव हे इतकेच धातु पुरे आहेत. असे आणखी धातु पुष्कळच आहेत.

३०. पाणिनीचे आपृक्त धातु

ह्या धातूंच्या अनुरोधानें पाणिनीनें आपृक्त आणि संयोग ह्या दोन प्रकारचीं जीं बीजें दिलीं आहेत तीं पाहणें फार मनोरंजक होईल. नमुन्यासाठीं त्यांपैकीं दोन तीनच फक्त देतों व त्याबरोबर इतर युरोपीय भाषांतील त्यांचीं रूपांतरेहि देतों. व्, र्, म्, न्, भ्, ध्, ज्, ग्, द्, क्, प्, स् हीं बारा आपृक्त बीजें आणि भ्र, क्ष्, स्, स्त्, स्र् हीं ५ संयुक्त बीजें पाणिनीनें दिलीं आहेत. ह्यांपैकीं म्, भ्, ध्, द् एवढीं चारच फक्त घेतों आणि त्यांपासून निघालेल्यीं पूर्ववैदिक, वैदिक, झेन्द, लॅटिन व ग्रीक ह्या भाषांतील प्रतीकें देतो.[२]

बीज	पूर्ववैदिक स्वरूप	वैदिक	इतर भाषांतील स्वरूप
म् - [चंद्र, मनुष्य]	मयह् मायह्	मह मस्,	माह [अवे]
	मयस्	मास्,	मो [लॅ.]
	मयन् मयनव्	मन, मनुस,	Gayma, mena
	मयनाव्	मानव, प्रा.	
भ् = (प्रकाश)	भय्य, भायस्	भा, भास्	ग्रीक Phoibos
	भावस्	भास्वत	
ध् = (गृह)	धयम्, धय्,	दम जम	(L) Domus
	ध्याधमन्	(दम्पती)	(G) Demos
द् - देव, आकाश	दय्य्, दय्व्	दिव्, देव	(अवेस्ता) Daeve
	दय् वय्	देवी	(लॅटिन) Dens
			(ग्रीक) Theos

ह्या बीजांशिवाय पाणिनीनें आपल्या अष्टाध्यायीस एक धातुपाठ जोडिला आहे. धातूंची संख्या १७०० च्या वर असून ते सर्व गणाच्या अनुक्रमानें त्यांच्या अर्थासह दिले आहेत. जरी मोठ्या कळजीनें हा धातुसंग्रह पाणिनीनें एकत्रित केला आहे तरी कांहीं धातु सूत्रांत वापरलेले आढळतात. परंतु ते धातुपाठांत दिसून येत नाहींत. अशा सौत्र धातूंची संख्या मात्र थोडी आहे.

संस्कृत वैय्याकरणांनीं धातूंची संख्या १७०६ पर्यंत नेली आहे. कांहीं दुसरे व्याकरणकार हीच संख्या दोन हजारांवर नेतात.[३] शब्दांची व्युत्पत्ति जशी धातूंपर्यंत नेऊन भिडविताततशी धातूंची व्युत्पत्तिहि पुन्हा धातूंपर्यंत नेऊन भिडवितात. डॉ. मरे ह्या व्युत्पत्तिशास्त्रज्ञानें सर्व भाषांची प्रचंड इमारत नऊ धातुरूपी स्तंभावर चढविली आहे.[४] सर्व ग्रीक भाषा एकट्या 'इ' धातूपासून निघाली आहे असेहि एक मत आहे. त्याचप्रमाणें लॅटिन भाषा 'ही' ह्या धातूपासून निघाली आहे असें दुसरें एक मत आहे. असलीं एकान्तिक मतें जरी सोडून दिलीं तरी धातूंची संख्या निश्चित करणें जरूर असतें. संस्कृतमधील धातूंची संख्या २००० जरी धरली तरी ते सर्वच उपयोगांत येत नाहींत. नेहमीं वाङ्मयांत साधारणपणें ८०० धातुच फक्त वापरलेले आढळतात. ह्यापैकीं पुन्हा २०० वेद व ब्राह्मण ह्या वाङ्मयांत येतात. ५०० धातु वेद आणि पाणिनीय संस्कृत ह्यांमध्ये येतात आणि त्यापैकीं १५० च फक्त उत्तरकालीन वाङ्मयांत वापरलेले आढळतात.[५] प्राकृत वैय्याकरणांनीं प्राकृत भाषांतील धातूंची संख्या १५९० दिली आहे. (हेमचंद्र ९३० व मार्कण्डेय ६१८ ह्या दोघांचे मिळून १५४८ होतात.) मराठी भाषेंतील धातूंची संख्या अद्याप निश्चित झालेली नाहीं. संस्कृत, प्राकृत, देश्य, फारशी व इतर नामधातु मिळून मराठी धातूंची संख्या पांच हजारांजवळजवळ असावी असा माझा तर्क आहे.

३१. धातूंचें वर्गीकरण

धातूंचें वर्गीकरण दोन दृष्टींनीं करतां येण्यासारखें आहे. एक अर्थावरून व दुसरें व्युत्पत्तीवरून. अर्थावरून पहातां अकर्मक व सकर्मक असे दोन भेद पडून पुन्हा पहिल्या अकर्मकाचे सकर्तृक व अकर्तृक असे दोन पडतात. अकर्तृक धातूलाच भावकर्तृक धातु म्हणतात. ह्यापैकीं अकर्मक धातु हेच भाषेंतील आद्य धातु होत. व्युत्पत्तीवरून धातूंचे जर वर्गीकरण केलें तर धातूंचे पुढील प्रमाणें आठ वर्ग पडतात.

(१) एक स्वरी धातूंचा वर्ग; उदा.- इ, ऋ इत्यादि.
(२) एक स्वर व एक व्यंजन; उदा.- अन्, अग्, अक्, उद्.
(३) एक व्यंजन व एक स्वर; उदा.- पा, मा, भू, वा, कृ, मृ.
(४) व्यंजन + स्वर + व्यंजन; उदा. तुद्, तुप्, रुच्, वच्, युज्.
(५) व्यंजन + व्यंजन + स्वर; उदा.- घ्रु, घ्रा, ध्रा, ध्मा, श्रु.
(६) स्वर + व्यंजन + व्यंजन; उदा.- अर्च्, अर्द्, उन्द्.
(७) व्यंजन + व्यंजन + स्वर + व्यंजन; उदा. स्पश्, त्रस्, ग्रभ्, स्तर्, वर्त्, चन्द्.

(८) व्यंजन + व्यंजन + स्वर + व्यंजन + व्यंजन; उदा.- स्पन्द्, स्कन्द्, स्कल्प्.

अगदीं शेवटीं जागृ, दरिद्रा, चकास् हे धातु उत्पन्न झाले असावेत. ह्याप्रमाणें आठी प्रकारच्या धातूंचे घटक वर दिले आहेत व ह्या वर दिलेल्या क्रमानें धातूंची उत्पत्ति झाली असावी.[६]

३२. प्राकृतमधील धात्वादेश

संस्कृत धातु ज्या वेळेस प्राकृत भाषांत येतो त्या वेळेस त्याला आदेश होतो. खुद्द संस्कृतमध्यें धातूला आदेश होतो असें कांहीं विद्वानांचें मत आहे.[७] उदा. दृश् (पश्य्), पा (पिब्), प्रच्छ् (पृच्छ्), दंश् (दश्), ब्रू (आत्थ), पत् (पत्त-लुङ्), हन् (वध्-लुडि) ह्यांत कंसांत दिलेलीं रूपें ही धातूंचे आदेश होत. परंतु आम्हांस हें म्हणणें पटत नाहीं. दृश् ह्याचें पश्य् असें रूपांतर वर्णप्रक्रियेच्या कोणत्या नियमानुसार झालें हें आम्हांस समजत नाहीं. दृश् आणि पश्य् हे दोन्ही निराळे धातु आहेत. त्यांचा अर्थ मात्र एक आहे. हा ह्याचा खरा अर्थ आहे. प्राकृत वैय्याकरणांची सुद्धां हीच चूक झालेली आहे. प्राकृत व्याकरणकार म्हणतात कीं कथ् - बोल्ल; संघइ; मज्ज - बुड्ड; त्रस् - बुज्ज; क्रुध्य - जूर; क्षिप -पेल्ल; विलप- बडबड; गर्ज-वुक्क; त्रस्य-डर; पिब् - घोट्ट; भ्रंश-चुक्क- भुल्ल-फिट्ट; गवेष-ढंढोल्ल; आरोह-चड; हे असें संस्कृत धातूंना प्राकृत आदेश होतात. वर्णप्रक्रियेच्या कोणत्याहि नियमानें हे आदेश सिद्ध होणार नाहींत. ह्या आदेशांचें शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण म्हणजे हे संस्कृत धातु निराळे स्वतंत्र व पुढें आदेश म्हणून दिलेले प्राकृत धातु हे निराळे स्वतंत्र आहेत. त्यांचा परस्परांचा कांहीं एक संबंध नाहीं. कांहीं देशी धातु प्राकृत काळीं वापरांत होते. ते कांहीं संस्कृत धातूंशीं समानार्थक असल्यामुळें त्यांचा संबंध प्राकृत वैय्याकरणांनीं लावला इतकाच ह्या प्राकृत धात्वादेशाचा अर्थ आहे. हे प्राकृत व्याकरणकारांनीं दिलेले धात्वादेश पाहिले म्हणजे व्युत्पत्तिशास्त्राची जी ऐतिहासिक दृष्टि म्हणून असते तिच्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें असें निरुपायानें म्हणावें लागतें.

मराठींतील धातु साक्षात् संस्कृतमधून किंवा महाराष्ट्री वगैरे प्राकृतमधून आले असल्यामुळें प्राकृतमधील धात्वादेश हें प्रकरण मराठीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचें आहे. सर्व प्राकृत व्याकरणकारांनीं दिलेले आदेश एकत्रित केले तर १५९० भरतात. ह्यांपैकीं ४५३ धातु देशी आहेत. कारण त्यांचा संबंध कोणत्याहि संस्कृत धातूंशी आदेश-प्रकियेच्या नियमानें पोहोंचत नाहीं.[८] प्राकृत व्याकरणांत दिलेले धात्वादेश पाहिले तर पांच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. ते खाली नमूद करतों. त्याबरोबर मराठी धातु ताडून पहावे.

१ मूळ संस्कृत धातु व प्राकृत आदेश एकाच स्वरूपाचे असलेले :-

उदा :-	संस्कृत	प्राकृत	मराठी
	चलति	चलइ	चल
	चुंबति	चुंबइ	चुंब
	खादति	खाअइ	खा
	ताडयति	ताडेइ	ताड.

२ मूळ संस्कृत धातूंचीं रूपें वर्णप्रक्रियेच्या नियमानुसार प्राकृतमध्यें उतरलेली :-

उदा :-	पीडयति	पिलेइ	पिळ
	अर्पयति	अप्पइ	ओप
	खिद्यते	खिज्जइ	खिज
	घटते	घडइ	घड
	युध्यति	जुज्झइ	झुंज

३ मूळ संस्कृत धातु व त्यांचे प्राकृत आदेश ह्या दोहोंमध्ये कसलाहि संबंध नसलेले-(यांचीं उदाहरणें वर दिलीं आहेत.)

४ मूळ संस्कृत धातु आपल्या गणचिन्हासह प्राकृतमध्यें आलेले-

नृत्य -	णच्च -	नाच
चिनु -	चिण -	चिण
जाना -	जाण -	जाण

५ मूळ संस्कृत धातु व त्यांचे प्राकृत आदेश यांमध्यें अर्थभेद झालेले :- प्रेक्षते पेक्खदि.

३३. व्युपत्तिशास्त्र व त्याचे उत्सर्ग

धातूंचे प्रकार पाहूं गेलें तर कितीतरी प्रकार पडलेले आढळतात. धातूंची जी स्वरव्यंजनयुक्त अशी घटना तिच्यावरून धातूंचे प्रकार पडतील. त्याशिवाय धातूंच्या अर्थावरून प्रकार पडतील. त्यांच्या उपयोगावरून आणखी प्रकार पडतील. अकर्तृक किंवा भावकर्तृक व सकर्तृक असे दोन प्रकार मूळ पडून नंतर सकर्तृकाचे पुन: सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकार होतील. प्रयोजक, होकारनकारार्थी, साहाय्यकारी, संयुक्त, शक्य, कर्मणि, सन्नन्त, यङ्लुङन्त, द्विधातुसंयोग, अनुकरणात्मक इत्यादि प्रकार उघड उघड नजरेस येतात. एक सिद्ध आणि साधित असा प्रकार केला तर पुन: साधिताचे नामसाधित, धातुसाधित, विशेषसाधित, निष्ठासाधित, च्वीरूपें, अन्यसाधित इतके स्थूलमानानें साधित प्रकार होतील. अभ्यस्त धातूचा एक प्रकार घेतला तर त्यामध्यें पुन: निरनिराळे प्रकार आढळतात. पूर्ण अभ्यस्त, अर्थ अभ्यस्त, आद्य अभ्यस्त, मध्य अभ्यस्त, अन्त्य अभ्यस्त, द्विरुक्त असे त्याचे मुख्य प्रकार पडतील. सिद्ध धातु समजले तर त्र्यक्षरी, द्व्यक्षरी, एकाक्षरी असे प्रकार पडून एकाक्षरांत एकवर्णी, एकस्वरी, एकस्वरव्यंजनी असे फरक पडतात. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, देशी, फरकी, तत्सम, तद्भव, अपभ्रष्ट हेहि पुन: ऐतिहासिक दृष्ट्या प्रकार पडतात. रूढ, योगरूढ, वाच्य, लक्ष्य, व्यंग्य असे अर्थाच्या दृष्टीनें भाग पडतील.

एकाच प्रकारची एकाच वर्णप्रक्रियेचीं पुष्कळ उदाहरणें सांपडली म्हणजे त्यावरून उत्सर्ग तयार होतो. थोड्याथोडक्या, उदाहरणांनीं वर्णक्रियेचा उत्सर्ग मांडणें हें अत्यंत धोक्याचें आहे. पुष्कळ उदाहरणें शोधून काढिली पाहिजेत. तीं तपासलीं पाहिजेत. त्या सर्वांमधून कोणती

प्रक्रिया अनुस्यूत रीतीनें वाहात जात आहे हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिले पाहिजे. त्या प्रक्रियेला कांहीं उदाहरणांनीं बाधा येते कीं काय, येत असल्यास तिचा स्वभाव काय आहे, प्रक्रिया जी होते ती सापेक्ष आहे कां निरपेक्ष आहे, सापेक्ष असेल तर तिला अपेक्षा कशाची आहे, निरपेक्ष असेल तर ती कोणत्या परिस्थितींत निरपेक्ष आहे, एखाद्या भाषेंत जर एखादा उत्सर्ग ठरला तर तोच उत्सर्ग आणखी त्याच वंशांतील कोणकोणत्या तत्सम भाषांत पाळला गेलेला आढळतो व तसा तो पाळला गेला तर कोणत्या काळांत पाळला गेला, वर्णांच्या उच्चारांत काय काय भिन्न फरक पडले, अमुक एक फरक कोणत्या काळांत पडला इत्यादि इत्यादि प्रश्न व्युत्पत्तिशास्त्रांत उद्भवतात व त्यांचीं उत्तरें द्यावीं लागतात. अशा प्रकारच्या चौफेर तपासणीनें एखादी वर्णप्रक्रिया तावून सुलाखून निघाली म्हणजे ती वर्णप्रक्रिया वर्ण-उत्सर्गाच्या पदवीला पोहोंचते. एरव्हीं नाहीं. तशी जर तावून सुलाखून उतरली नाहीं तर ती केवळ वर्णप्रक्रियाच राहाते.

व्युत्पत्तीचे हे उत्सर्ग तावून सुलाखण्याच्या पद्धतींत सुद्धा निरनिराळ्या कालांत फरक पडले आहेत. व्युत्पत्तिशास्त्राच्या आधुनिक पद्धति आणि प्राचीन पद्धति ह्या दोहोंत फार अंतर पडलें आहे. वेद, ब्राह्मण, आरण्यकें इत्यादि प्राचीन वैदिक ग्रंथांत ज्या व्युत्पत्ति दिलेल्या आढळतात त्यांच्या बाबत एक पद्धति अवलंबिलेली आहे, तर आधुनिक इंग्रजी, जर्मन, मराठी, हिंदी वगैरे भाषांतील व्युत्पत्तींच्या बाबत दुसरीच पद्धति अवलंबिलेली आहे. सध्यांच्या आधुनिक काळांत इतर सर्व शास्त्रांत ज्याप्रमाणें एक ऐतिहासिक दृष्टि आली आहे व त्या दृष्टीनें तें सर्व पारखलें जातें तद्वत् ह्या व्युत्पत्तिशास्त्रांतहि ऐतिहासिक दृष्टि आली आहे व तिच्या साहाय्यानें हें शास्त्र पारखलें जातें. भाषाशास्त्रांत ह्या ऐतिहासिक दृष्टीपेक्षां आणखी एक दृष्टि आली आहे; आणि ती म्हणजे तौलनिक दृष्टि होय. ह्या दोन्ही ऐतिहासिक आणि तौलनिक दृष्टीनें एखादी व्युत्पत्ति किंवा एखादें निर्वचन पारखून तें जर पूर्ण निर्दोष उतरलें तर तेंच निर्वचन खरें. एखादें निर्वचन केलें तर ते निर्वचन पूर्वी त्याच अर्थानें वापरांत होतें कीं नाहीं, असल्याच कोणत्या काळांत होतें, नसल्यास तें कोणत्या अर्थानें वापरांत होतें, व त्याच्या अर्थांत बदल कां व कोणत्या काळांत झाला, ह्याचा माग लावावयाचा, व प्रत्येक विधानाला, निर्वचनाला, अर्थभेदाला, रूपभेदाला त्या त्या काळच्या वाङ्मयातील उतारा प्रत्यक्ष पुरावा म्हणून द्यावयाचा. ह्या पद्धतीला ऐतिहासिक निर्वचनपद्धति म्हणतात. अशा प्रकारची ऐतिहासिक निर्वचनपद्धति आर्यांच्या पूर्वीच्या निरुक्तपरंपरेत होती किंवा नाहीं हें सांगतां यावयाचें नाहीं. यास्काचार्य हे आपल्या निरुक्तामध्यें इतर निर्वचनकारांच्या बरोबर "इति ऐतिहासिका:" असा उल्लेख करतात. परंतु हा उल्लेख नैरुक्तांच्या पैकीं ऐतिहासिक म्हणून केलेला नाहीं.

व्युत्पत्तिशास्त्राचा इतिहास हा येथवर सांगितला. अशा रीतीनें व्युत्पत्तीचें हें शास्त्र बनत असतांना साहजिक त्याचे कांहीं ढोबळ दृष्टीनें कां होईना पण नियम बनले. शब्दाचीं मुळें शोधणें हें कांहीं कां होईना पण नियम बनले. शब्दाचीं मुळें शोधणें हें कांहीं एका ठराविक नियमाबरहुकूम होऊं लागलें. त्या नियमाप्रमाणें व्युत्पादिलेलीं मुळें ही साधारणपणें सर्व शास्त्रज्ञांस मान्य होऊं लागलीं. निरनिराळ्या पुष्कळ शब्दांचीं मुळें तपासतां तपासतांच हे नियम बांधले

गेले असल्यामुळें नियमहि सर्वमान्य झालेले आहेत. पाश्चात्य व्युत्पत्तिशास्त्रज्ञांच्या प्रयत्नानें जरी हे नियम बांधले गेले आहेत तरी त्यांच्याइतकेंच आपल्या इकडील पौर्व्य व्युत्पत्तिशास्त्रास लागू होण्यासारखें शास्त्र म्हटलें म्हणजे त्यांच्यांत पाश्चात्य व पौर्व्य असा दिग्भेद थोडाच असणार ? शास्त्र येथून तेथून सारखेंच. हे नियम क्रमानें खालीं दिले आहेत.

३४. निरनिराळे आठ उत्सर्ग

उत्सर्ग १ – एखाद्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल प्रयत्न करण्यापूर्वी त्या शब्दाचें जुन्यांत जुनें पहिलें रूप व त्याचा उपयोग, हीं कशीं होतीं हे प्रथम शोधून काढा. त्याच्या रूपांचा व कालाचा क्रम लावा.

उदा. गवसणें = (सांपडणें) हा धातु घेतला तर त्याची व्युत्पत्ति शोधण्यापूर्वी ह्या शब्दाचें पहिल्यांतील पहिले मराठी रूप कोणतें व तें रूप कोणत्या अर्थानें वापरांत होतें व त्याच्या पुढचीं रूपें कशीं झालीं, त्यांचा अर्थ कसा बदलत गेला हें आपणास पाहिलें पाहिजे. गवस ह्याचें पहिलें रूप गवेस हें असलें पाहिजे. त्याच्याहि अगोदरचें गवेश किंवा गवेष हें रूप असलें पाहिजे. गवस म्हणजे सांपडणें असा अर्थ असला तरी तोच अर्थ गवेश किंवा गवेष ह्याचा असेलच असा संभव नाहीं. गवस ह्या मराठी धातूचें प्राकृतमधील रूप गवस-गवेस हें असलें पाहिजे. प्राकृतमध्यें त्याचा सापंडणें असाच अर्थ आहे. प्राकृत रूपाच्याहि मागील रूप संस्कृतमधील. तेथें तो धातु गवेष् ह्या स्वरूपांत सांपडतो व त्याचा संस्कृतमध्ये अर्थ "गाय हुडकणें" असा आहे. लौकिक संस्कृतच्याहि मागील वैदिक संस्कृतमध्यें तों धातु ह्याच स्वरूपांत असून त्याचा अर्थ गाय शोधणें असाच आहे. वेदाच्या काळांत आर्य लोकांचें गोधन हें त्यांचे शत्रु दस्युलोक हे चोरून नेत असत. असें चोरून नेलेलें गोधन पुन: शोधून काढून आर्याचें आर्याला परत आणून देण्यासाठीं ते 'पूषन' ह्या देवतेची प्रार्थना करीत. अशा अर्थाचीं सूक्तें वेदांत आहेत. त्यामध्यें 'गवेष' हा धातु गोधन शोधणें ह्या अर्थीं वापरलेला आहे. 'गवसणें' ह्या मराठी धातूचा हा असा इतिहास आहे. अशाच प्रकारचा 'उपाध्ये' हा एक शब्द आहे. उपाध्ये ∠ उपाध्ये < उपाध्याय उपाध्यै अशा क्रमानें हा धातु आला आहे. ह्याच्याहि अलीकडील वझे किंवा ओझा किंवा झ्या (हिंदुस्थानांतील कांहीं ब्राह्मणांचीं आडनांवें). हीं रूपें त्याच 'उपाध्याय' ह्या मुळापासून त्याच मार्गानें आलीं आहेत. अशा रीतीनें शब्दाचीं मागील रूपें व त्यांचा इतिहास पाहिला म्हणजे त्या मूळ रूपांतील कोणते वर्ण कालाच्या ओघांत गळून पडले, त्यांच्याऐवजी दुसरे कोणते आले किंवा काय ह्याचाहि माग लागतो.

उत्सर्ग २ – शब्दाची व्युत्पत्ति शोधतांना इतिहास व भूगोल हे दोन्हीहि पहा. भिन्न भिन्न संस्कृतींचा संबंध आला म्हणजेच एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत शब्द ऋण म्हणून घेतले जातात.

उदाहरणार्थ चंद्रगुप्त हा शब्द घेऊं. ग्रीक लोक हे ज्या वेळीं हिंदुस्थानांत अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळेस आले त्या वेळीं हिंदुस्थानामधील कांहीं शब्द- राजांचीं नांवें वगैरे- त्यांच्या

उच्चारांत आलीं. त्यांत चंद्रगुप्त मौर्य राजाचें नांवहि आलें. ह्या नांवाचा उच्चार Sandra Cotus असा ते करूं लागले. 'च' ह्या वर्णाचा उच्चार 'स' ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत किंवा त्या सुमारास झालेला आपणास इतिहासावरून दिसून येतो. अशा रीतीनें व्युत्पत्तीच्या बाबतींत 'इतिहास' हा आपल्या उपयोगी पडून त्यावरून उच्चारांतर कां झालें ह्याचीं कारणें सांगतां येतात.

इतिहासाप्रमाणें भूगोलाचाहि उपयोग व्युत्पत्तींच्या कामीं होतो. 'बटाटा' शब्द पोर्च्युगीज शब्दावरून आला. Potato हें फळ त्या लोकांनीं आपल्याबरोबर आणिलें. 'प' ह्या वर्णाचा कर्कश उच्चार नरमावून 'ब' होणें अगदीं साहजिक आहे. पुढें स्वरांच्या उच्चारांत फरक पडणें अशक्य नाहीं. 'बटाटा' ह्या शब्दाप्रमाणें 'तमाखू' शब्द आहे. त्याचीहि उपपत्ति वरीलप्रमाणें आहे. अशा रीतीनें भूगोलाचा उपयोग आपणास व्युत्पत्तीच्या कामीं झाल्याचें दिसून येईल.

उत्सर्ग ३ – व्युत्पत्ति पाहतांना मूळ आर्य आणि आर्योद्भव ज्या भाषा आहेत त्यांच्यामधील वर्णप्रक्रियेचे नियम ध्यानांत घ्या. व्यंजनें आणि स्वर ह्यांमध्यें होणारे फरक हे विशेष बारकाईनें पाहिले पाहिजेत.

आतांपर्यंत जीं उदाहरणें दिलीं त्यांमध्यें ह्या नियमाचें स्पष्टीकरण आलेंच आहे. वर्णप्रक्रियेमध्यें दोहोंचा संबंध येतो. एक स्वरांचा आणि दुसरा व्यंजनांचा. भाषेच्या आयुष्याच्या निरनिराळ्या कालखंडांत स्वर आणि व्यंजनें ह्यांच्या उच्चारामध्ये पुष्कळ फरक झालेले आपणास आढळून येतात. 'उपाध्याय' ह्यापासून 'झ्या' होणें म्हणजे पहिल्या शब्दाच्या वर्णांत फरक झाल्याशिवाय शक्य नाहीं. 'घ्य' चा झ, 'उप' हे दोन्ही वर्णच नाहींसे झालेले दिसतात. अशा रीतीनें वर्ण प्रक्रिया जी होते तिच्यासंबंधीं कांहीं 'उत्सर्ग' बांदले आहेत. वर्ण प्रक्रियांपासून मिळणाऱ्या आधारावर जगांत सध्यां चालू असणाऱ्या भाषांचे वर्ग झाले आहेत. यौरिपितर पासून जुपीटर, दिवपासून यौस, ज्यू, ट्यूस, इत्यादि. डोमारे पासून टेम, दूर्वा, देर्वा, दार्वा, दीर्वा टेर इत्यादि शब्दांत आढळून येणाऱ्या वर्णप्रक्रियेवरून त्या त्या भाषांचा वर्ग केला आहे. कंठ्य, वर्णाचे तालव्य वर्ण होणें, तालव्याचे दन्त्य वर्ण होणें. कठोर वर्णाचे मृदु वर्ण होणें, आगम, आदेश वगैरे सर्व व्यंजनप्रक्रियेच्या बाबी होत. संधि, गुण, वृद्धि, संप्रसारण वगैरे स्वरप्रक्रियेच्या बाबी होत. वर्णप्रक्रियेच्या सर्व बाबी जर तपासल्या आणि त्या त्या कालाच्या अनुक्रमानें लावल्या तर अमुक एक काळांत अमुक एका वर्णांत अमुक एक फरक होत होता व तो अमुक एका कारणानें झाला असें सांगतां येतें. वेदाच्या कालांत आर्यांच्या भाषांत मूर्धन्य उच्चार नव्हते, आणि उत्तर कालांत ज्या अर्थी ते असल्याचें प्रत्ययास येतें, त्या अर्थी ते कोणत्या तरी इतर संस्कृतीच्या संसर्गानें आले, आणि ते द्राविडी भाषीयांच्या संसर्गानें आले असें सांगतां येतें. तसेंच मूळ संस्कृत वर्णांमध्ये तालव्य वर्ण आहेत, परंतु दन्त्यतालव्य हे वर्ण नाहींत. प्राकृत भाषांच्या अमदानींत हे नवे उच्चार आर्यभाषेच्या वर्णमालेंत आले. इतिहासाच्या दृष्टीनें ह्या नवीन उच्चारास कारणें काय झालीं हे पाहण्यासारखें आहे. कांहीं विद्वानांचें म्हणणें असें कीं हे उच्चार ग्रीक लोकांच्या संसर्गामुळें आले. कांहीं उलट असें म्हणतात कीं हे द्राविडी लोकांच्या सहवासामुळें आलें. कांहीं दुसऱ्या विद्वानांना तर ह्या उच्चारात मंगोली भाषांचा

परिणाम असावासा वाटतो. अशा रीतीनें उच्चाराचें खरें कारण जरी नक्की सांगतां आलें नाहीं तरी त्याचा काळ अजमासें सांगतां येण्यासारखा आहे. 'अ' ह्या स्वराचे निभृत व उत्तान किंवा संवृत व विवृत असे उच्चार आढळून येतात ह्याचें कारण फारशी भाषीयांशीं संबंध आला हें होय. सध्यांच्या इंग्रजी भाषेंतील उच्चाराचें वळण मराठी भाषेस कोठें कोठें लागल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. अशा रीतीनें जे निरनिराळें उच्चार येतात त्यांच्या उपपत्ति आपणास काळाच्या दृष्टीनें सांगतां येतात.

उत्सर्ग ४ – दोन शब्दांपैकीं प्राचीन कोणता व अर्वाचीन कोणता हें ओळखण्याचीं कांहीं गमकें सामान्य रीतीनें स्थूल रीतीनें ठरलेलीं आहेत. दोन शब्दांपैकीं जो शब्द कमी वर्णाचा असेल तो प्राचीन किंवा तो शब्द मूळचा असें मानतात.

'प्रत्युपकारक' हा शब्द घेतला तर उपकारक हा शब्द प्रत्युपकारक ह्याच्यापेक्षां प्राचीन; कारक हा उपकारक ह्याच्या पेक्षां प्राचीन; कर हा कारक पेक्षां प्राचीन; कृ हा शब्द कर ह्याच्यापेक्षां प्राचीन आणि त्याच्याहि पेक्षां सर्वांत प्राचीन म्हटला म्हणजे 'कृ' किंवा 'ऋ' किंवा 'अ'. अशा रीतीनें दोन शब्दांची तुलना केली असता प्राचीनतर, प्राचीनतम, अशीं त्याचीं रूपें आपणास ठरवितां येतात. आतां तुलना करावयास घ्यावयाचीं रूपें ही एकाच शब्दाचीं असतील किंवा दोन भिन्न भिन्न शब्दांचीं असतील. ह्या उत्सर्गाची उभारणी आर्य भाषांच्या एका सर्वमान्य सिद्धांतावर झाली आहे, आणि तो सिद्धांत म्हणजे यास्काचार्याच्या निरुक्तांत वर्णिलेला "आख्यातजानि नामानि- सर्व नामांची- सर्व शब्दांची उत्पत्ति धातूंच्या पासून होते"- हा होय. ह्या सिद्धांताचें विवेचन इतरत्र केलें आहे.

शब्दांचीं जुन्यांतली जुनीं रूपें हुडकण्याच्या ह्या उत्सर्गाला कांहीं मर्यादा आहेत. हा उत्सर्ग सर्व ठिकाणीं लागू पडतो असें नाहीं. वर उपाध्याय व झ्या हें उदाहरण दिलें आहे, त्यामध्यें ह्या उत्सर्गाच्या मर्यादा दिसून येतात. उपाध्याय > उवज्झाय > झ्या असा क्रम जो दिसतो तो एकापेक्षां दुसरा उत्तरकालांत घडून आलेला आहे. जसजसा काळ अधिक गेला तसतसे त्या शब्दाचे वर्ण झडून त्याला ह्रस्व, ह्रस्वतर, ह्रस्वतम अशीं रूपें प्राप्त झालीं आहेत. भाषेंत विभक्तींचे संबंध पूर्वी निरनिराळ्या स्वतंत्र शब्दांच्या साहाय्यानें दाखवीत असत. परंतु पुढें उत्तरकालांत त्या स्वतंत्र शब्दांचें प्रत्ययांत रूपांतर होतें. मूळच्या स्वतंत्र शब्दाचें दीर्घत्व नाहींसें होऊन त्या ऐवजीं प्रत्ययाचें ह्रस्वत्व येतें. अशीं आणखी उदाहरणें दाखवितां येतील. तेव्हां ह्या उत्सर्गाच्या मुळाशीं असलेल्या 'आख्यातजानि नामानि' ह्या भाषिक तत्त्वाची सिद्धता दाखविण्यासाठींच ह्या उत्सर्गाची मांडणी आहे. ह्या उत्सर्गाला अगदीं संलग्न असाच पुढील उत्सर्ग आहे.

उत्सर्ग ५ – वर्णाच्या कमीजास्त संख्येवरून ज्याप्रमाणें आपणास शब्दाचें प्राचीन स्वरूप ठरवितां आलें त्याप्रमाणें शब्दाच्या वर्णांच्या उच्चारावरूनहि आपणास ठरवितां येतें. शब्दामधील जो मुख्य प्रधान स्वर त्याच्या उच्चारावरूनहि आपणास अमुक एक रूप प्राचीन, अमुक एक अर्वाचीन असें सांगतां येतें. ह्या उत्सर्गाचें उत्तम उदाहरण आपणास स्वरांच्या उच्चारांत, त्याचप्रमाणें वेदाच्या उदात्त, अनुदात्त व स्वरित ह्या स्वरांच्या उच्चारांत, त्याचप्रमाणें आर्यभाषेच्या

'आघातांत' आढळून येतें. 'पौत्र' ह्यांतील मुख्य स्वर औ. हा स्वर (पुत्र ह्यांतील) 'उ' ह्या स्वरापेक्षां अर्वाचीन आहे, 'उ' हा स्वर (पत् ह्यांतील) 'अ' ह्या स्वरापेक्षां अर्वाचीन आहे. ह्या 'अ' स्वराच्या उच्चारामध्येंहि कालाच्या दृष्टीनें सूक्ष्म दृष्टीच्या अभ्यासकांनीं अ, इ, उ (नितराम् ह्रस्व) अशा तीन अवस्था मानिल्या आहेत.

उत्सर्ग ६ – अनियमित धातु हे भाषेंतील अगदीं प्रथमचे सर्व धातूंच्या अगोदरचे धातु असतात. ह्या धातूंपासून नंतर साधित धातु तयार होतात.

सर्व शब्दांच्या मुळाशीं धातु, सर्व धातूंच्या अगोदरचे हे अनियमित धातु अशी ह्या उत्सर्गाच्या मुळाशीं विचारसरणी आहे. नामांच्या अगोदरचे धातु, विशेषणें, क्रियाविशेषणें ह्या सर्वांच्या अगोदरचे धातु, सर्वनामांच्या अगोदरचे सार्वनामिक धातु असें मानिलें आहे. परंतु धातु-धातूंत फरक आहे. नियमित व अनियमित धातु असे त्यांचे दोन मुख्य प्रकार आहेत. ब्रू धातूचें ब्रवीषि रूप होणें हें नियमित आहे, परंतु त्याचें आत्थ रूप होणें हें मात्र अनियमित आहे; ब्रवीति हें रूप होणें नियमित आहे परंतु त्याचें आह हे रूप होणें अनियमित आहे. तीच गोष्ट इतर अनियमित रूपांची आहे. तसेचं गम ह्याचें गमामि असें नियमित रूप न होतां गच्छामि असें अनियमित रूप होतें. ह्यापैकीं गच्छ हें रूप इतर नियमित रूपांपेक्षां जुनें आहे. अशा प्रकारची विचारसरणी ह्या उत्सर्गाच्या मुळाशी आहे. इतर पाश्चात्य भाषांतही अशीं अनियमित रूपें पुष्पळ आहेत. इंग्लिश भाषेंत भूतकाळाचीं रूपें साधण्याचे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं ed हा प्रत्यय लागून भूतकाळाचीं रूपें ज्या ज्या धातूंचीं सिद्ध होतात ते सर्व नियमित होत. इतर प्रकारांनीं जर ती रूपें सिद्ध झाली तर ते धातु अनियमित होत.

आजवर ह्या धातूंना फक्त 'अनियमित' म्हणून त्याची उपपत्ति लावीत. परंतु अशा रीतीनें अनियमित म्हणून कांहीतरी मनाचें समाधान तात्पुरतें झालें तरी ही कांहीं खरी भाषाशास्त्रीय उपपत्ति नव्हे. 'अनियमित' म्हणून निरवानिरव करणें म्हणजे एक प्रकारचें भाषाशास्त्रीय सूक्ष्मतेचें दौर्बल्य दाखविण्यासारखें आहे. अशा अनियमित धातूंची उपपत्ति राजवाडे ह्यांनीं आपल्या परीनें लावण्याचा प्रयत्न केला व तो त्यासंबंधीं सांगोपांग विचार न करता बराच समर्पक आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हीं सर्व अनियमित रूपें एके काळीं भाषेंत प्रत्यक्ष वापरांत असलेल्या धातूंची त्या त्या नियमानें सिद्ध झालेलीं अशीं रूपें होत असें राजवाड्यांनीं मांडलें. भाषेच्या दीर्घ आयुष्यांत ह्या अनियमित रूपांच्या मुळाशीं असलेल्या धातूंची स्मृति पार बुजून गेली इतकेंच. आत्थ, आह, आहथुः, आहुः, घ्नान्ति, गच्छ, यच्छ इत्यादि जीं रूपें अमुक अमुक एका असंबद्ध अशा धातूंची अनियमित रूपें म्हणून समजलीं गेलीं आहेत, तीं अनियमित रूपें नसून तीं एके काळीं प्रचलित असलेल्या धातूंचीं नियमाने सिद्ध झालेलीं रूपें आहेत. व्युत्पत्ति लावतां आली नाहीं म्हणून त्यांना अनियमित म्हणणें हें योग्य होणार नाहीं. ह्या अनियमित रूपांचीच फक्त उपपत्ति राजवाडे ह्यांनीं लाविली असें नव्हे, इतर जीं कितीतरी वैकल्पिक रूपें वैदिक व लौकिक संस्कृत, प्राकृत वगैरे भाषांत रूढ असलेलीं दिसतात व जीं एका झाडाची साल दुसऱ्या एका निराळ्याच झाडाला लावण्याच्या प्रवृत्तीनें भलत्याच एखाद्या शब्दाला वैकल्पिक रूपें चिकटलीं गेलीं आहेत, तीं एके काळीं अमुक एका शब्दाचीं अगदीं शास्त्रशुद्ध नियमानें

सिद्ध झालेलीं रूपें होत, असें राजवाड्यांनीं सिद्ध केलें.

उत्सर्ग ७ – एखाद्या शब्दाची व्युत्पत्ति काढतांना तो सर्वच्या सर्व शब्द विचारांत घ्यावा. त्याचा एखादा अवशेष किंवा भाग घेऊन त्याचीच फक्त व्युत्पत्ति देण्यानें त्या सर्व शब्दाची व्युत्पत्ति मिळत नाहीं. सर्व शब्दच्या शब्द व्युत्पादावा. त्याचा अंशच फक्त व्युत्पादूं नये. अशा रीतीनें व्युत्पत्ति देताना जर एखाद्या अंगाच्या व्युत्पत्तीबद्दल संशय आला किंवा त्या व्युत्पादनानें वर्णप्रक्रियेच्या एखाद्या उत्सर्गाचा भंग झालेला आढळला तर त्याबद्दल मन साशंक होऊन पुन: त्याची व्युत्पत्ति काढावयास हवी. अशा तऱ्हेचा उत्सर्गभंग पुष्कळांच्या हातून नकळत होतो. कांहीं लेक नुसत्या प्रत्ययाची तर कांहीं उपसर्गाची व्युत्पत्ति देऊन सर्व शब्दाची व्युत्पत्ति दिल्याचें समाधान मानतात.

उत्सर्ग ८ – दोन निरनिराळ्या असंबद्ध अशा भाषेंतील दोन शब्दांचीं रूपें बाह्यत: किती जरी तंतोतंत सारखीं दिसलीं तरी त्यांची व्युत्पत्ति एकच नसते. हा एक प्रकारचा व्युत्पत्तिभ्रम आहे. असल्या साम्याचा कधींहि मनावर परिणाम होऊं देऊं नये. आर्यभाषा आणि फारशी भाषा ह्या दोहोंत पुष्कळ शब्दांचीं बाह्य स्वरूपें सारखीं आहेत. त्याचप्रमाणें आर्य व द्राविडी दोन्ही आर्यच परंतु बऱ्याच दुरावलेल्या इंग्रजी व मराठी ह्या भाषांतहि अशीं शब्दांचीं बाह्यरूपसाम्यें आढळून येतात. परंतु त्यांची व्युत्पत्ति सारखी असणें शक्य नाहीं. Aggressor हा इंग्रजी शब्द आणि अग्रेसर हा संस्कृत शब्द ह्या दोन शब्दांच्या उच्चारांत किती तरी ऐक्यरूप्य आहे व ह्या रूप्यैक्याला भुलून जाऊन दोहोंची व्युत्पत्ति एकच सांगितली तर ती शास्त्रशुद्ध ठरणार नाहीं. अग्रेसर ह्यामध्यें सृ- सर् हा धातु आहे तर Aggressor ह्यामध्यें ग्रेडिअर म्हणजे चालणें हलणें असा धातु आहे. तसेंच इंग्रजी Ettiquette आणि इतिकृत्वा हे दोन्ही शब्द बाह्यत: बरेच जवळचे दिसतात, परंतु त्या दोहोंची व्युत्पत्ति मात्र एक नाहीं (Science of Etymology Skeat ch. 2 P. 14 tt).

३५. दुय्यम उत्सर्ग

हे आठ उत्सर्ग स्थूल स्वरूपाचे आहेत. बाकीचे सर्व लहानसान उत्सर्ग ह्या आठांच्यामध्यें अंतर्भूत होतात; व अशी जरी परिस्थिति असली तरी कांहीं उत्सर्गाचा पृथक् निर्देश करणें जरूर आहे. हे वरील उत्सर्ग सामान्य भाषाशास्त्राच्या अत्यंत स्थूल दृष्टीनें दिले आहेत व ते सर्व आर्य भाषांना लागतात. ह्या स्थूल नियमांच्या शिवाय त्या त्या भाषेच्या स्वभावाप्रमाणें त्या भाषेपुरते स्वतंत्र असे व्युत्पत्तीचे उत्सर्ग आहेत. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, लिथूनियन, अल्बानियन, ग्रीक, लॅटिन, पुराणपर्शियन, संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती वगैरे भाषांतील व्युत्पत्तीचे सामान्य सिद्धांत सांगतां येण्यासारखे आहेत. यास्काचार्यांनीं संस्कृत भाषेंतील व्युत्पत्तीचें उत्सर्ग दिले आहेत ते येथें एका ठिकाणीं एकत्रित करण्यासारखे आहेत. एखाद्या शब्दाची व्युत्पत्ति कशी काढावी ह्यासंबंधीं चांगले नियम यास्काचार्यांनीं दिले आहेत. (यास्क निरुक्त अ. २. १)

निरुक्ताच्या दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या खंडांत यास्काचार्यांनीं " अथ निर्वचनम् " म्हणून

व्युत्पत्ति कशी करावी हें सांगण्यास आरंभ करून पुढें निर्वचनाचे नियम ओळीनें दिले आहेत.

उत्सर्ग ९ – तत् येषु पदेषु स्वरसंस्कारौ समर्थौ प्रादेशिकेन गुणेन अन्वितौ स्याताम् तथा तानि निर्ब्रूयात्

स्वरसंस्कार व अर्थ यांचे तदर्थवाचक जे धातु त्यांच्यापासून होणारीं जीं नामरूपें त्यांच्याशीं मेळ आहे त्यांची व्युत्पत्ति तशी करावी. उदा. गति, मति, कर्ता, कारक इत्यादि शब्दांचीं व्युत्पत्ति त्यांचा धातु आणि त्यांचा स्वरसंस्कार, अर्थ यांच्यात मेळ असल्यामुळें त्याप्रमाणें दिली पाहिजे.

परंतु अक्षि वगैरे शब्दांत तसा मेळ दिसत नाहीं. अक्षि शब्द आणि चक्ष् हा धातु ह्यांचा मेळ नाहीं, अशा वेळेस अर्थनित्य अर्थाकडे पाहून तपासून नंतर व्युत्पत्ति द्यावी, हेंच खालील शब्दांत सांगितलें आहे.

उत्सर्ग १० – अथ अनन्विते अर्थे, अप्रादेशिके विकारे अर्थनित्य: परीक्षेत

ह्या उत्सर्गात व्युत्पत्ति काढताना 'तर्काला' वाव दिला आहे.

उत्सर्ग ११ – केनचित् वृत्तिसामान्येन (परीक्षेत)

वृत्ति म्हणजे धातुरूप. असें कोणतें तरी धातुरूप घेऊन त्यामध्यें व ज्याची व्युत्पत्ति करावयाची आहे त्यामध्यें थोडेहि साम्य असलें म्हणजे झालें. उदा. अद्रि - वज्र, पर्वत. ह्यांत अद्-अदने हा धातु दिसतो. परंतु 'खाणें' आणि 'वज्र, पर्वत' ह्या दोहोंचा कांहीं संबंध दिसत नाहीं. वज्राची क्रिया आघात करून फोडणें ही आहे. फोडणें ह्या अर्थाचा दृ हा धातु आहे. ह्याचें रूप दृणाति असें होतें. उपसर्ग 'आ' लाविल्यानें आदृणाति असें रूप होईल. ह्या रूपांतील शेवटचा 'णाति' हा भाग गळून पडला आहे. अंधस्- अन् धातूशीं संबंध नाहीं. ध्ये-ध्यानम्-आध्यानम्-अन्ध: ह्या मागनि हा शब्द आला आहे. व्युत्पत्तीच्या बाबतींत तर्काला कशी वाव द्यावी लागते ह्याचें एक उत्तम उदाहरण म्हणून यास्काचा हा उत्सर्ग देण्यासारखा आहे.

उत्सर्ग १२ – अविद्यमाने सामान्ये अपि अक्षरवर्णसामान्यात् निर्ब्रूयात्

वर सांगितलेलें अर्थसामान्य जर नसेल तर अक्षरांचें, एखाद्या वर्णाचें साम्य लक्षांत घेऊन शब्दाची व्युत्पत्ति करावी. उदा. अग्नि ह्या शब्दाचे अ, ग, नि असे तुकडे करावयाचे. 'अ' हें कशापासून निष्पन्न झालें आहे? तर 'इ' धातूपासून. 'इ' ह्या धातूचें कारित रूप आययति त्यापासून आला आहे. हें स्थौलाष्ठिवि ह्या व्युत्पत्तिशास्त्रज्ञाचें मत झालें. शाकपूणि म्हणतो कीं अग्नि ह्या शब्दांत 'ग' ह्या वर्णावरून व्युत्पत्ति काढावी. व्युत्पत्तीच्या तिसऱ्या एका मताप्रमाणें 'अ' व 'ग' ह्या वर्णांच्या आधारें व्युत्पत्ति न काढतां शेवटच्या 'नि' ह्या वर्णापासून काढावी असें कांहीं म्हणतात. कोणत्याहि मागनिं व्युत्पत्ति काढावी परंतु व्युत्पत्ति

देतां येत नाहीं असें कधींहि म्हणूं नये. असें म्हणणें म्हणजे आपल्या अज्ञानाची कबुली दिल्यासारखें आहे. निरुक्तांत मान्य केलेल्या निर्वचनपरंपरेंत खालील उत्सर्ग मान्य आहे.

"नतु एव न निर्ब्रूयात"

असें करतांना शब्दाच्या रूपाकडे म्हणजे तो शब्द काय आहे, त्यामध्यें कोणतीं अक्षरें येतात, तो करता बनलेला असतो वगैरेंकडे मुळीं लक्ष देऊं नये. "न संस्कारम् आद्रियेत". अमुक एक शब्द अमक्या धातूपासून निघाला असें पुष्कळ वेळां दिसतें. परंतु त्या धातूचा अर्थ व शब्दाचा रूढ अर्थ ह्या दोहोंत मेळ नसेल तर संस्कार म्हणजे शब्दरूप लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. कारण धातूपासून निघालेल्या नामरूपांविषयीं पुष्कळदां मनांत घोटाळा उत्पन्न होतो; कारण धातूपासून नामरूप बनवीत असतांना विलक्षण बदल घडून येतो. (यास्काचे निरुक्ताचें भाषांतर- राजवाडे पा. ७५०)

३६. वर्णप्रक्रियेचे नियम १३ व प्रकार १३

यास्काचार्यांनीं व्युत्पत्तीसंबंधीं इतका सामान्यस्वरूपाचा उपन्यास केल्यानंतर पुढें व्युत्पत्तीचें कांहीं ठोकळ नियम किंवा वर्णप्रक्रियेचे ठोकळ नियम दिले आहेत.

१ आदिलोप-अस् सारख्या धातूंच्या प्रथमच्या 'अ' चा निवृत्तिस्थानाच्या वेळीं लोप होतो. उदा. स्तः, सन्ति.

२ अन्तलोप- उदा. गत्वा, गतम्.

३ उपधालोप उदा.- जग्मतुः जग्मुः

४ वर्णलोप उदा. यामि (याचामि)

५ द्विवर्णलोप उदा.- तिस्रः त् ('इस्र' ह्याचा लोप)

६ आदिविपर्ययः- उदा.- ज्योतिः (द्योतिः), घन (हन्), विंदु (भिद्)

७ आद्यन्तविपर्ययः- उदा. स्तोका (श्रुत्), रज्जु (सृज्), सिकता (कस्-विकसने)

८ अन्तव्यापत्तिः उदा.- ओघः (वह्), नाधः (नह्), वधु (वह्), मेघः (मिह्), गाधः (गाह्), मधु (मद्).

९. वर्णोपजनः उदा.- आस्थत् (अस्-क्षेपणे), द्वारः (वार्), भरुजा (भ्रस्ज्-दहने),

१०. तत्र सिद्धायाम् अनुपपद्य मानायाम् इतरया उपपिपादयिषेत्.

जेव्हां एखाद्या शब्दांत मूळ धातु (सिद्धायाम् प्रकृतौ) लागू पडत नसेल म्हणजे त्या शब्दाची उपपत्ति मूळ धातूपासून होत नसेल (अनुपपद्यमानायाम्) तेव्हां दुसऱ्या प्रकृतीनें त्या शब्दाची उपपत्ति करावी. यास्काचार्यांनीं हे असे शब्दांच्या उपपत्तीचे दहा प्रकार देऊन नंतर आणखी सामान्य प्रकार (वेदशब्दाच्या निष्पत्तीचा) सांगितले आहेत.

११. अथापि भाषिकेभ्यः धातुभ्यः नैगमाः कृताः भाष्यन्ते. कधीं कधीं वेदांत येणाऱ्या कृदन्तांची व्युत्पत्ति हल्लींच्या संस्कृतांत असलेल्या धातूंपासून करितां येते.

१२. अथ तद्धितसमासेषु एकपर्वसुच अनेकपर्वसुच पूर्वं पूर्वं अपरम् अपरम् प्रविभज्य

निर्ब्रूयात्।

जेव्हां तद्धित व सामाजिक शब्दांची व्युत्पत्ति द्यावयाची असेल तेव्हां ते शब्द एक पेऱ्याचे असोत किंवा अनेक पेऱ्यांचे असोत त्यांचा उलगडा केल्यानंतर त्यांच्या अवयवांची व्युत्पत्ति द्यावी.

१३. न एकपदानि निर्ब्रूयात्.

एकपदांची म्हणजे ज्यांचा संदर्भ माहीत नाहीं अशांची व्युत्पत्ति करूं नये.

अशा रीतीनें व्युत्पत्तिसंबंधाचे उत्सर्ग देऊन नंतर व्युत्पत्ति कोणासाठीं करावी, कोणासाठीं करूं नये, कोणाला सांगावीं, कोणाला सांगू नये अशा संबंधीं कांहीं निषेध सांगितले आहेत. ह्या निषेधांचें महत्त्व विशेष आहे आणि त्यांतल्या त्यांत राजवाडे यांच्या धातुकोशाच्या बाबतींततर विशेषच आहे. म्हणून ते पुढें दिले आहेत.

(न निर्ब्रूयात्) अवैय्याकरणाय। न अनुपसन्नाय। अनिदंविदेवा। नित्यं हि अविज्ञातुः विज्ञाने असूया। उपसन्नाय तु निर्ब्रूयात्। यः वा अलं विज्ञातुं स्यात्। मेधाविने। तपस्विने वा।

ज्याला व्याकरण येत नाहीं, जो आपण होऊन ज्ञानप्राप्तीसाठीं गुरूकडे येत नाहीं, जो निरुक्तशास्त्राची महती जाणत नाहीं, त्याला व्युत्पत्ति सांगूं नये. अज्ञ मनुष्याला ज्ञानी मनुष्यावद्दल असूया वाटते. परंतु जो नम्रपणें येईल, जो शास्त्र जाणण्याला समर्थ असेल, जो बुद्धिवान् असेल, ज्यानें तपश्चर्या किंवा परिश्रम केले असतील त्याला व्युत्पत्ति सांगावीं, अशी यास्काचार्यांची व्युत्पत्तिशास्त्रावद्दल महती आहे.

वर्णप्रक्रियेचे सर्व प्रकार एकत्रित केले तर खालीलप्रमाणें भरतील :–

१ तालव्यीकरण क् > च्, ग् > ज्

२ अस्पर्शव्यंजनांचें स्पर्श करणें कठोर वर्णांचें मृदतूकरण
क् > ग्, त् > द्
ग् > य्, ज् > य्
राग = राय, राज = राय.

३ स्पर्श व्यंजनांचें स्वर करणें.

४ स्पर्श, अस्पर्श व दित्त वर्णाचें एकीभवन क्त = त्त; क्क.

५ वर्णदिश.

६ वर्णव्यत्यास स्क > क्स > क्ष. प्स > स्प.

७ वर्णसंक्षेप अथवा वर्णलोप उपाध्याय > झ्या.

८ वर्णागम वानर > वान्दर.

९ गुण कोपय. भू भव्.

१० वृद्धि पौत्र, भौम, वार्ष्णायणी

११ स्वरप्रक्रियेचा क्रम (जर्मन भाषेंतील उम्लाउट)

१२ मूर्धन्यीकरण

१३ संप्रसारण

ह्याशिवाय पुन्हा प्रत्येकाचे पोटभेद आहेतच. प्रत्येकांत पुन्हा आदि, मध्य व अन्त्य असे प्रकार पडतात. उदाहरणार्थ एक वर्णलोप हा प्रकार घेतला तर त्यांत आदिलोप, मध्यलोप व अन्त्यलोप असे तीन प्रकार पडतात.

३७. आख्यातजानि नामानि हा सिद्धांत व त्याची चर्चा

व्याकरणामध्यें धातुपाठाचें जें इतकें महत्त्व आहे त्याचें कारण काय हा साहजिकच एक प्रश्न उद्भवतो. 'व्याकरण' हें खरें पाहिलें तर भाषेचा व्याकार होय. भाषेंतील सर्व शाब्दिक व्यवहारांचें स्पष्टीकरण व्याकरणानें केलें पाहिजे अशी व्याकरणासंबंधीं अपेक्षा असते. सर्व शब्दांचें, शब्दसंबंधाचें, वाक्यांचें, वाक्यसंबंधाचें स्पष्टीकरण व्याकरणानें केलें पाहिजे. भाषेमध्यें शब्दांचे जे निरनिराळे प्रकार दिसून येतात त्यांचें एकत्रीकरण, कांहीं एका विशिष्ट पद्धतिअनुसार त्यांचें वर्गीकरण व त्यांचें स्पष्टीकरण हें व्याकरण करतें. शब्दांच्या इतर बाह्य व परस्पर संबंधांवरोबर त्याच्या आतंर रचनेचा किंवा त्यांच्या घटनेचा विचार करावा लागतो. हा जो आंतररचनेचा किंवा घटनेचा विचार, त्याच्यामध्येंच धातूंचा संबंध येतो. सर्व भाषेचा व्याकर ज्याप्रमाणें व्याकरण करतें, त्याप्रमाणें भाषेंतील सर्व शब्दांचा व्याकार धातुपाठ करतो. भाषेच्या बाबतींत व्याकरणास जें महत्त्व तेंच व्याकरणाच्या बाबतींत धातुपाठास महत्त्व. व्याकरणाच्या मुळाशीं व्युत्पत्ति आहे आणि व्युत्पत्तीचा पृष्ठवंश- मुख्य आधार धातुपाठ आहे. म्हणूनच व्याकरणांत धातुपाठांचें महत्त्व आहे. व्याकरणापेक्षां निर्वृत्तीचें महत्त्व अधिक आहे हें यास्काचार्यांनासुद्धां मान्य आहे. तदिदं विद्यास्थानम् व्याकरणस्य कार्त्स्न्यम् (निरुक्त २-१५) असें त्यानें म्हणून व्याकरणापेक्षां श्रेष्ठ व्युत्पत्तिशास्त्र ठरविलें. जेथें व्याकरणाची व्याप्ती संपली, जेथें व्याकरणाचें क्षेत्र संपलें, किंवा जेथें व्याकरणानें हात टेकलें, तेथें व्युत्पत्तीचे क्षेत्र सुरू होतें. व्युत्पत्तीनें मार्ग नीट सुधारून व्यवस्थित करून ठेविला म्हणजे व्याकरणाचें कार्य सुकर होतें आणि अशा महत्त्वाचा जो विषय व्युत्पत्ति, त्याचा जो मुख्य आधार धातुपाठ, त्याचें महत्त्व अर्थात्च अधिक असणार.

भाषेंतील यच्चयावत् शब्द हे धातूंपासून उत्पन्न झाले किंवा नाहींत ह्याबद्दल मतभेद आहे. हा मतभेद फार जुन्या काळापासूनचा आहे. यास्काच्या वेळीं हा मतभेद नैरुक्तांच्यामध्यें रूढ होता. सर्व शब्द आख्यातांपासून सिद्ध होतात असें म्हणणारा एक पक्ष आणि सर्व शब्द आख्यातज नसून असेलच तर कांही थोडे शब्द आख्यातज असून बाकीचे स्वतंत्र आहेत असें म्हणणारा दुसरा पक्ष, " तत्र नामानि आख्यातजानि इति शाकटायन: नैरुक्तसमय:श्च " (निरुक्त १-१२) हें एक मत आणि "न सर्वाणि इति गार्ग्य: वैय्याकरणानांच एके" हें दुसरें मत. शाकटायन आणि निरुक्तकार ह्यांचें मत सर्व शब्द धातूंपासून उत्पन्न झाले आहेत असें होतें आणि कांहीं शब्द धातूंपासून उत्पन्न झाले असें गार्ग्य व शाकटायनाशिवाय इतर व्याकरणकारांचें मत होतें. शब्दांचे प्रकार चार- १ नाम, २ आख्यात, ३ उपसर्ग, ४ निपात. ह्यांतील उपसर्ग व निपात ह्या दोहोंबद्दल प्रश्नच नाहीं. हे प्रकार स्वतंत्रच आहेत. प्रश्न आहे तो नामाबद्दलचा आहे आणि त्याबद्दल हें असें वरील प्रमाणें मतवैविध्य आहे. गार्ग्याचें थोडक्यांत

म्हणणें असें :- सर्व नामें कांहीं धातूंपासून उत्पन्न झालीं नाहींत. कांहीं थोडींशीं तशीं आहेत. नामें दोन प्रकारचीं आहेत. संविज्ञात व असंविज्ञात. प्रत्येक नामाला अर्थ असतो. त्या अर्थाचा धातु जर त्या नामांत असेल म्हणजे त्या धातूपासून जर तें नाम तयार होत असेल व त्या नामाचा स्वरहि जर व्याकरणाला धरून असेल तर तें नाम प्रादेशिक होय. गति, कर्म, करण, कृति, क्रिया, मन्म, मनन, मति, मन्ता, रङ्ग, रजन, इत्यादि शब्द हे प्रादेशिक होत. ह्या नामांचा अर्थ त्या त्या धातूमध्ये आहे. तेव्हां हीं सर्व नामें धातुज किंवा आख्यातज होत. परंतु गार्ग्य म्हणतो असलीं नामें फार थोडी आहेत. वेडेवांकडे बनलेले अपभ्रष्ट झालेले शब्द असेच भाषेंत फार आहेत. त्यांत धातु कोणता असावा हें समजत नाहीं. त्या दोहोंच्या अर्थांत फार अंतर असल्याचें आढळतें. जो धातु आहे असें म्हणावें त्यापासून तीं नामें बनवितां येत नाहींत. गो आणि अश्व हे दोन शब्द गम् आणि अश् ह्या दोन धातूंपासून अनुक्रमे झाले असण्याचा संभव आहे. पण 'हस्त' वगैरेसारख्या शब्दांची वाट काय? ह्यांत कोणता धातु मानावयाचा? ह्यांतील प्रदेश म्हणजे तदर्थवाचक धातु जर माहीत नाहीं तर तो अमुक एका धातूचा विकार म्हणजे विशिष्ट एका धातूला प्रत्यय लावून तयार झाला असें कसें म्हणतां येईल? इतक्यावरच हा मुद्दा संपत नाहीं. ह्या बाबत संपूर्ण विचारसरणी पुढीलप्रमाणें आहे-

अथ चेत् सर्वाणि आख्यातजानि स्युः। यःकश्च तत् कर्म कुर्यात्। सर्वं तत् सत्त्वं तथा आचक्षीरन्।

अथापि चेत् सर्वाणि आख्यातजानि नामानि स्युः यावद्भिः भावैः सम्प्रयुज्येत। तावद्भ्यः नामधेयप्रतिलम्भः स्यात्।

गार्ग्याचें मत पुढें असें आहे. पण जर सर्वच नामें धातूंपासून उत्पन्न झालीं आहेत असें मानिलें तर जो कोणी प्राणी तें काम करीत असेल त्या सर्व प्राण्यांना तेंच एक नांव लोकांनीं म्हटलें पाहिजे. जो कोणी वाट व्यापील त्याला त्याला 'अश्व' म्हणावें लागेल. जें कांहीं टोंचेल बोंचेल तें तृण ह्या नांवाला प्राप्त होईल. सर्व नामें धातूंपासून उत्पन्न झालीं आहेत असें मानिलें तर प्राणिमात्राचा ज्या ज्या भावांशीं म्हणजे क्रियांशीं संबंध येईल म्हणजे ज्या ज्या क्रिया एखादा प्राणी करील त्या त्या कृत्यांवरून त्याला तीं तीं नांवें मिळालीं पाहिजेत. ह्याशिवाय गार्ग्याचा आणखी एक आक्षेप असा कीं, क्रियावाचक धातूंपासून जीं नामें निघतात तीं बनविण्यास जे प्रत्यय लागावयास पाहिजेत ते लावावेत आणि नामांना तें नांव द्यावें. आणखी जेव्हां नामाचा अर्थ आणि धातूपासून तयार होणाऱ्या शब्दाचा अर्थ ह्यांत मेळ नसतो तेव्हां ही अडचण उत्पन्न होते. अशा नामांची व्युत्पत्ति शाकटायन तुकडे पाडून लावतो. 'सत्य' याचें 'अस्' पासून पहिला तुकडा सत् व 'आययति' पासून दुसरा तुकडा 'य'.

ह्या सर्व आक्षेपांना यास्काचार्यांनीं क्रमानें उत्तरें देऊन पुनः आपला सिद्धांत "आख्यातजानि नामानि" प्रस्थापित केला आहे. यास्काचें म्हणणें पुढीलप्रमाणें आहे. "यथोनु वै एतत् तत्

यत्र स्वरसंस्कारौ समर्थौ प्रादेशिकेन गुणेनान्वितौ स्याताम्। सर्वं प्रादेशिकम् इति एवं सति अनुपालंभ एष भवति। त्याचें म्हणणें असे :- तुमच्या ह्या आक्षेपानें आम्हांला दोष अगदीं लागत नाहीं. तुमचा हा अगोदर आक्षेपच नव्हे. आम्हीहि तेंच म्हणतों. तुमच्या आमच्यांत फरक हाच कीं तुम्ही कांहीं नामें प्रादेशिक म्हणतां, आम्ही सर्व तशीं आहेत असें म्हणतों. एकच क्रिया केल्यानें एकच नांव पुष्कळ पदार्थांना लागलें पाहिजे असें जें तुमचें म्हणणें आहे तें बरोबर आहे. परंतु तें नाम सर्व जणांना तें काम करीत असतांनाहि पडत नाहीं. तें कांहींनाच पडतें. ह्या एका उत्तरानें तुमचे सर्व आक्षेप नाहींसे होतात. शाकटायन सर्व नामें धातूत्पन्न आहेत हें सिद्ध करण्याकरतां शब्दांचे अवयव पाडून प्रत्येक अवयवाची स्वतंत्र व्युत्पत्ति देतो. हें करणें शास्त्रशुद्ध नाहीं. ह्याला शास्त्रविरोध आहे. परंतु हा शाकटायनाचा वैयक्तिक दोष आहे. शास्त्राचा दोष नाहीं. ही व्यक्तिगर्हा आहे, शास्त्रगर्हा नव्हे. शिवाय तसेंच क्रिया करण्याच्या अगोदर उत्पन्न झालेल्या कांहीं वस्तूंना जन्मानंतर त्या जी क्रिया करतात त्यावरून नांव पडतें. कांहींना तसें नांव पडत नाहीं. ह्या सर्व विचारसरणीवरून सर्व नामें आख्यातज आहेत असें सिद्ध होतें.

सर्व नामें धातूंपासून उत्पन्न झालीं आहेत किंवा नाहींत हा वाद शाकटायन व गार्ग्य ह्या दोघांमध्यें पूर्वी झालेला असला तरी व त्याचा निकाल यास्काचार्यांनीं दिला असला तरी त्याचा कायमचा निकाल लागला असें मात्र झालें नाहीं. व्युत्पत्तिशास्त्रज्ञांमध्यें अद्यापहि हा वाद कधीं कधीं डोकें काढतो. गार्ग्याच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें वाटतें. परंतु त्यानें जे मुद्दे स्वमतसमर्थनार्थ पुढें आणिलें ते मात्र मान्य होण्यासारखे नाहींत. सर्व नामें कांहीं धातूंपासून निघणें शक्य नाहीं. कांहीं नामें अशीं आढळणारच कीं तीं साम्यसंबंधाच्या जोरावर (Analogy) अस्तित्वांत येतात. कांहीं नामें धातूंपासून निघून भाषेंत रूढ झालीं म्हणजे त्यांच्या घटनेसारखी एकदम घटना होऊन कांहीं नामें भाषेंत कोणत्याहि धातूचा आधार न घेतां रूढ होऊन बसतात. शाकटायनाचें मत इतकें एकान्तिक घेऊन चालावयाचें नाहीं. धातूंच्या कक्षेच्या बाहेर वावरणारीं स्वतंत्र वृत्तीचीं अशीं कांहीं नामें सांपडणारच. त्याच्या सिद्धान्ताचा मथितार्थ फक्त ध्यानांत घेतला तर त्याचें म्हणणें ठीक आहे असें वाटतें. बहुतेक नामें हीं व्युत्पाद्य असतात. यांची व्युत्पत्ति काढिली कीं, तिच्या मुळाशीं धातु हा असणारच. व्याकरण हें शब्दांच्या घटनेचें शास्त्र आहे. शब्दाची घटना उकलणें म्हणजे व्युत्पत्ति सांगणें होय. ह्या दृष्टीनें व्याकरणाचा सर्व अंतर्भाव व्युत्पत्तिशास्त्रांत होतो. 'व्याकरणस्य कात्स्न्र्यम्' असें यास्काचार्य त्यासंबंधीं म्हणतो. धातु व त्याचे संस्कार हा व्याकरणाचा विषय आहे. म्हणून व्याकरणांत धातुपाठाचें महत्त्व आहे. प्रत्येक व्याकरणाच्या शेवटीं व्याकरणकार धातुपाठ जो देतो तो ह्यामुळेंच. निघण्टूमध्यें इतर शब्दांबरोबर क्रियाशब्द येणें हें साहजिक आहे. निघण्टु हा कोश आहे. त्यांत स्थलनामानि, देवनामानि, पर्वतनामानि, निपाता:, उपसर्गा: इत्यादि जसे शब्द आहेत तसे क्रियाशब्दहि दिले आहेत. कोशामध्यें सर्व शब्दांचा अंतर्भाव केला पाहिजे. व्याकरणाची स्थिति तशी नाहीं. त्यामध्यें प्रकृति, प्रत्यय ह्यांचाच विचार असतो. मग तें वर्णांचें असो शब्दांचें किंवा शब्दसमूहांचें असो. त्या प्रकृतीचीहि प्रकृति सांगणें किंवा

प्रत्ययांचीहि प्रकृति सांगणें ह्यासाठींच धातूंची व धातुपाठाची जरूरी लागते. म्हणूनच प्रत्येक व्याकरणकार आपल्या व्याकरणामध्यें धातुपाठ देतो.

"आख्यातजानि नामानि न वा" हा वाद सामान्य रीतीनें बोलावयाचें म्हटलें तर गार्ग्य शाकटायन ह्या दोघांमध्यें नसून नैरुक्त वैय्याकरण ह्यांच्यामध्यें आहे. शाकटायन हाहि व्याकरणकारच होय, परंतु ह्या व्युत्पत्तीच्या बाबतींत त्यानें नैरुक्तांचा सिद्धांत अवलंबिलेला दिसतो. गार्ग्य हा मात्र पक्का व्याकरणकार आहे. त्याच्या विरोधांत बराच तथ्यांश आहे हें वर सांगितलेंच आहे. उपसर्गांना स्वत:चे अर्थ आहेत (या. १०४) व उपमेचें लक्षण (१९३-१८) ह्या त्याच्या मतावरून तो चांगला विचारवंत वैय्याकरणी होता असें दिसतें. हा वाद पुढें उणादि सूत्रांतहि आढळून येतो. शब्दांचे निरनिराळे अर्थ लक्षांत घेऊन व्युत्पत्ति देणें हें उणादिसूत्रांत दिसून येत नाहीं. शब्दांत दिसणारा धातु घेऊन व अवश्य वाटल्यास त्यांत फरक करून त्याला प्रत्यय लावलेला आपणांस उणादिसूत्रांत दिसून येतो. वेदांतील शब्द व रूढ शब्द हे व्याकरणाला धरून नसले तरी ते शुद्धच आहेत असें उणादिसूत्रकारांचें मत आहे. उणादिसूत्रें हीं निरुक्तांच्या व्युत्पत्तींवर आधारलेलीं नाहींत. "नामच धातुजमाह निरुक्ते व्याकरणे शकटस्य च तोकं" अशा रीतीनें वैय्याकरणांनीं नैरुक्तांची आणि शाकटायनाची त्यांच्या ह्या वरील सिद्धांताबद्दल टवाळी केली आहे.

आम्ही हीं दोन्हींही मतें सविस्तर रीतीनें मांडलीं आहेत. सध्यांच्या आधुनिक दृष्टीनें पाहिलें तर गार्ग्याचेंच मत मानण्याकडे व्युत्पत्तिशास्त्रज्ञांची प्रवृत्ति होईल. सर्व नामें धातूंपासून काढणें हें कांहीं कांहीं बाबतींत हठात् व्युत्पादन होईल.

३८. साईसचा सिद्धांत

भाषेची प्रकृति दोन प्रकारची आहे हें पुढील विधानावरून सिद्ध आहे. "निरुक्ता प्रकृतिर्द्वेधा नामधातुप्रभेदत:" हे दोन प्रकार म्हणजे नाम आणि धातु हे होत. ह्यांच्या पूर्वीची स्थिति म्हटली म्हणजे सर्व शब्द नामेंच असणें ही होय अशी कांहीं विद्वानांचीं विचारसरणी आहे. आर्यभाषेंतील क्रियापद हें प्रथम नाम होतें, असें साईस याचें म्हणणें आहे (Science of Lang. Vol. I Preface) अशा स्थितींत पुष्कळ काळ भाषेंत व्यवहार झाल्यानंतर क्रियापदांना स्वतंत्र अस्तित्व आलें. त्याचें म्हणणें असें कीं, कोणतेंहि क्रियापद घ्या, त्यांत नामाचा अंश कांहींतरी असलाच पाहिजे. 'गच्छति' हें रूप घेतलें व त्यांतील गच्छ अथवा गम् हें अंग घेतलें तर तें गम, गमी, गामी अशा कोणत्यातरी नामापासून निघालें असावें.

साइसचें हें वर दिलेलें मत सध्यांच्या काळांत व विशेषत: संस्कृत भाषेचें शास्त्रीय पृथक्करण करणाऱ्यांना तरी पटावयाचें नाहीं. सर्व यच्चयावत् नामेंतर धातुव्युत्पाद्य आहेतच असें शाकटायनानें प्रतिपादिलें आहे. हा तर साइसच्या विधानाच्या विरुद्ध सबल पुरावा आहेच. शिवाय आम्ही म्हणतों की, पुष्कळ नामांमध्यें क्रियापदाचें किंवा धातूचें रूप आढळतें. नुसत्या केवळ धातूमध्यें नामाची शक्ति असल्याचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील.

लिह् ह (मधुलिह्), दृक्-दृश्, दुह्, दुद् (कामदुह्), (अनु) हुह्, (उपा) नह् (भू) भृत्

(वारि) मुच्, (पंके) रुह्, (तुरा) साह्, (परि) षद्, (अधि) रुह्, द्विष्, इत्यादि इत्यादि. अशीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. ह्या सर्व उदाहरणांवरून साईसच्या सिद्धांताच्या विरुद्ध सिद्धांत प्रस्थापित होतो-कीं नामाचेंच मूळ आद्य रूप म्हणजे धातु होय; किंवा मूळ धातूचेंच रूप नामाप्रमाणें उपयोजीत असत. धातु नामाप्रमाणें वापरण्याची ही पद्धत पाहिल्री. नंतर पुढें कालान्तरानें निरनिराळे प्रत्यय लावून मूळ धातूपासून निरनिराळ्या प्रकारानें नामें सिद्ध करण्यांत येऊं लागलीं व अशा रीतीनें प्रत्ययांच्या साहाय्यानें नामें तयार झाल्यावर पुन्हा त्यांच्यापासून धातु बनवूं लागले. धन, जन, वध, मान, काल, गवेष, कुमार इत्यादि शब्द नामें असून त्यांपासून धनय, जनय, वध, मानय, कालय, गवेषय, कुमारय इत्यादि प्रकारानें जीं क्रियापदें किंवा धातु बनविण्यांत येऊं लागले, ही तऱ्हा फार पुढील काळांतील आहे. साईसला ही प्रक्रिया अभिप्रेत नसेल ना अशी जबर शंका येते. हा जर त्याचा अर्थ असेल तर आम्ही त्याच्या कितीतरी पूर्वीची स्थिति वर निर्देशिली आहे. तो नामधातु म्हणतो तर आम्ही धातुनाम म्हणतों.

३९. धातूंचें आणखी एका दृष्टीनें वर्गीकरण

संस्कृतमधील धातूंचे निरनिराळ्या धोरणानें निरनिराळे वर्ग केले आहेत. धातूंमध्यें स्वर किती आहेत, ह्यावर धातूंचे एक स्वर असणारे (एकाच्), अनेक स्वर असणारे (अनेकाच्) असे दोन वर्ग पडतात. धातूने दाखविलेल्री क्रिया कोणाकडे जाते ह्यावर आत्मानेपदी व परस्मैपदी असे दोन वर्ग कांहीं पाडतात. गणांची विकरणें कोणतीं कोणतीं एखादा धातु घेतो ह्यावर एकंदर धातूंचे १ आद्य, मूल, २ सौत्र, व ३ प्रत्ययान्त असे तीन वर्ग कांहीं विद्वान् पाडतात. भाषेच्या स्वभावाच्या दृष्टीनें हें वर्गीकरण किंचित अधिक महत्त्वाचें आहे. ह्या दृष्टीनें शब्दशक्तिप्रकाशिकेमधील पुढील श्लोक महत्त्वाचा आहे.

मूलधातुर्गणोक्तोऽसौ सौत्रः सूत्रैकदर्शितः।
योगलभ्यार्थको धातुः प्रत्ययान्तः प्रकीर्तितः॥

धातुपाठांत सांगितलेले ते मूळ धातु, जे धातुपाठांत नाहींत परंतु सूत्रपाठांत वापरलेले आढळतात ते सौत्र धातु व ज्यांना निराळे प्रत्यय लावून तयार होतात ते प्रत्ययान्त धातु होत. ह्या वर्गात णिच् (प्रयोजक), यङन्त, नामधातु, सन्नत हे येतात. प्रत्ययान्त धातु हे अर्थातच् दुय्यम दर्जाचे किंवा साधित धातु होत; सिद्ध नव्हत. ह्या सर्वांत नामधातूंचा प्रकार हा तर विशेष उल्लेखनीय आहे. प्रातिपदिकाला क्रियात्व किंवा धातुत्व कसें येतें हें सांगण्यासाठीं पाणिनीला गणसूत्रें बांधावीं लागलीं. पटुपासून पाटयति, अश्वपासून अश्वयति, अशीं क्रियापदें बनतात. पुत्रकामयति, जिगमिषति इत्यादीसारखीं 'सन्' व 'क्यच्' प्रकारचीं क्रियापदें संस्कृतमध्यें बनतात.

मागें पाणिनीच्या धातुपाठांत न आढळणारे परंतु सूत्रामध्यें वापरलेले किंवा निर्देशिलेले असे कांहीं धातु आहेत असें सांगितलें ह्यांना सौत्र धातु म्हणतात. हे सौत्र धातु एकंदर

वीसच आहेत असेंहि कोणी म्हणतात. बोपदेवानें पाणिनीच्या ह्या वीस धातूंत आणखी चार धातूंची भर घालून त्यांची संख्या चोवीस केली. बोपदेवाचे चार धातु स्तंभ्, स्तुंभ्, स्कंभ्, स्कुंभ् हे होत. पाणिनीचे किंवा बोपदेवाचे सौत्र म्हणून निर्देशिलेले धातु प्रत्यक्ष मोजले तर चोविसांपेक्षा पुष्कळ अधिक भरतात. बोपदेवानें सांगितलेल्या सौत्र धातूंची संख्या पन्नासांच्यावर आहे. हे धातु इतरत्र दिले आहेत. सौत्र धातूंचा अर्थ काय? हे मागाहून तरी कसे आले, धातुपाठांत त्यांची गणना कां नाहीं, इत्यादि प्रश्न ह्या सौत्रधातूंसंबंधीं उद्भवणें शक्य आहे. आमच्या मतें ह्यांची उपपत्ति अशी आहे. पाणिनीचा धातुपाठ हा पूर्वाचार्यांच्यापासून उपदेश म्हणून प्राप्त झाला. तो सर्व आख्खाच्या आख्खा मिळाला असा अर्थ नव्हे. काहीं थोडा कां होईना, केंद्रवर्ती धातुपाठाचा अंश होता. तो पाणिनीचें साफसूफ करून त्याला एकत्रित केला. ह्या कालानंतर जे धातु त्याला आढळले किंवा जे धातु त्यानें सूत्रांत वापरले त्यांना सौत्र धातु अशी संज्ञा मिळाली. कालाच्या दृष्टीनें धातुपाठांतील धातु आणि सूत्रपाठांतील धातु ह्या दोन्ही धातूंच्या काळांत फार अंतर असावें. धातुपाठांतील धातु फार पूर्वीपासून वापरांत होते. त्या काळाच्या नंतर पुष्कळ काळानंतर सूत्रनिर्दिष्ट धातु वापरांत येऊं लागले. ह्या उपपत्तीतशवाय त्यांच्या प्रवृत्तींत जो अर्वाचीनपणा दिसतो तो दिसूं शकणार नाहीं.

बोपदेवानेंहि धातूंचे चार वर्ग केले आहेत. आगम आणि लौकिक असे दोन त्यांपैकीं मुख्य होत. हिंदोळा, अदोळा, प्रेंखोला ह्यांसारखे धातु तयार होतात. साधित धातूंमध्यें अभ्यस्त किंवा द्विरुक्त धातूंचा समावेश होतो. अभ्यस्त धातूंत पूर्ण अभ्यस्त, अर्ध अभ्यस्त, आद्य अभ्यास, मध्य अभ्यास, अन्त्य अभ्यास इत्यादि प्रकार येतात. तसेंच द्विरुक्त ह्या प्रकारांत एकावृत्त, अर्धावृत्त, द्विधातुसंयोग इत्यादि प्रकारांचा अन्तर्भाव होतो. ह्याशिवाय "दरिद्रा, दिधी, वेवी" इत्यादि धातु हे अभ्यस्त म्हणावे का द्विरुक्त म्हणावे याजबद्दल संशय आहे. लिट्, सन्, यङ् वगैरे आख्यातांमध्यें धातूस अभ्यास करतात. हे सर्व अभ्यस्त धातु होत. आवाजावरून सिद्ध होणारे ध्वनिधातु म्हणून कांहीं धातु आहेत. गद्, गर्ज्, कर्द्, कल्, भर्ज् इत्यादि धातु हे ध्वनिधातु होत. ह्यांचेहि पुनः अधिक सूक्ष्मावलोकन शक्य आहे व त्यांच्या मुळाशीं जाणें शक्य आहे. 'युध्' ह्या धातूचें पृथक्करण करून (यू- to join) 'ध' अथवा 'धा' म्हणजे ठेविणें असे दोन धातु त्यांतून निघणें शक्य आहे. अशा रीतीनें जे धातु आपणास सिद्ध म्हणून वाटतात, त्यांचें विश्लेषण करून त्यांतील पुनः अत्यंत सूक्ष्म असा सिद्ध धातु हुडकून काढणें शक्य आहे.

४०. उपसर्ग व धातु

ह्याच संबंधांत आणखी एका सिद्धांताचा आपणास विचारकर्तव्य आहे. तो उपसर्ग व धातु यांच्या मिलाफासंबंधींचा होय. उपसर्गांना स्वतंत्र अर्थ आहे किंवा नाहीं, उपसर्ग हे द्योतक आहेत का वाचक आहेत, ते कर्मप्रवचनीय म्हणून वापरले म्हणजे त्यांच्या अर्थांत काय फरक पडतो वगैरे बरेचसे प्रश्न आपण सध्यां बाजूस ठेविलें तरी उपसर्गाच्या सान्निध्यानें धातूच्या मूळ अर्थांत बराच जाणवणारा असा फरक पडतो हें खास. भर्तृहरीनें तर उपसर्गांना

द्योतकत्व दिलें आहे; इतकेंच नव्हे तर प्रतिष्ठते वगैरे रूपांत आंढळणाऱ्या 'प्र' सारख्या उपसर्गांना वाचकत्व आहे असें प्रतिपादिलें आहे. कांहीं इतर व्याकरणकार उपसर्गांना 'सहकारी' असें म्हणतात. कारण त्यांच्यायोगें धातूंच्या अर्थांत फरक पडतो. ह्याच अर्थाचें वाक्यपदीयांत पुढील वाक्य आहे. "शक्त्याधानाय धातोर्वा सहकारी प्रयुज्यते". पुण्यराज ह्या टीकाकारानें उपसर्गाचें हें त्रिविध कार्य १ द्योतकत्व, २ वाचकत्व, ३ सहकारित्व- निर्देशिलें आहे. हा वाद बाजूस जरी सारला तरी वर सांगितल्याप्रमाणें उपसर्ग व धातु ह्यांचा बेमालूम मिलाफ झाल्यानेंच धातूचा मूळ अर्थ नाहींसा होऊन दुसरा अर्थ तेथें प्राप्त होतो. हा निराळा अर्थ एकट्या धातूनेंच होत नाहीं, किंवा एकट्या उपसर्गानिंच होत नाहीं. उपसर्ग व धातु हे दोन्ही एकरूप बनतात, व नंतरच निराळा स्वतंत्र अर्थ निष्पन्न होतो.

उपसर्ग व धातु ह्या दोहोंचें एकरूप इतकें होतें कीं, कधीं कधीं त्यांतील धातु कोणता व उपसर्ग कोणता हें काढणें कठीण होतें. 'संग्राम' हा धातु त्यापैकीं आहे. 'आस्' हा धातु मूळ अकर्मक परंतु 'उप' हा उपसर्ग लागून त्या दोहोंचा एकजीव होऊन 'उपास्' हा सकर्मक धातु बनला आहे. धातु व उपसर्ग ह्या दोहोंचा एकजीव होणें ही गोष्ट पूर्वीच्या वैय्याकरणांना माहीत होती. तेहि ह्या दोहोंकडे अपृथक भावानें पहात असत. ह्याचें प्रत्यंतर *"सोपसर्गाणाम् एव धातुत्वम्"* हें पुण्यराज (वाक्य २-१८२) ह्या टीकाकाराच्या विधानांत दिसून येतें. विकरणाच्या सोयीसाठींच फक्त उपसर्ग निराळा व धातु निराळा असा पृथग्भावाचा व्यवहार आपणास मानावा लागतो. नाहींतर अर्थाच्या दृष्टीनें पाहिलें तर त्या दोहोंना एकच म्हटलें पाहिजे हें उघड आहे. ह्याला आधार वाक्यपदीयांत आपणास पुढीलप्रमाणें आढळतो. *धातूपसर्गयोः शास्त्रे धातुरेव तु तादृशः*(वा. प. २-१८२)

मराठीमध्यें पुष्कळ धातु असे आहेत कीं त्यांच्यामध्ये धातु आणि उपसर्ग ह्यांचा एकजीव झालेला व तोहि अत्यंत बेमालूम रीतीनें झालेला दिसून येतो. इतकेंच नव्हे, त्या दोहोंना मिळून स्वतंत्र धातुत्व प्राप्त होतें. ये (आ + या), चव (आ+चम्), उसल (उत्+शल्), उचल (उत्+चल्), उतर (अव+तृ), उठ (उत् + तिष्ठ), उपट (उत्+पट्), निरख (निस्+ईक्ष्), पारखड (प्र+क्षल्), पारख (परी+ईक्ष्), पुस (पृच्छ, प्र + उञ्छ), भिज् (अभि+अञ्च) इत्यादि.

ह्या धातूंमधील उपसर्ग निराळा व धातु निराळा असें सांगणें हें व्युत्पत्तिज्ञान असल्याखेरीज सांगतां येणार नाहीं. नुसत्या मराठी धातूकडे पाहिलें तर त्यांत उपसर्ग निराळा आहे असें मानण्याकडे प्रवृत्ति नाहीं. दोन्ही मिळून आखा एकच धातु मानतात. तेव्हां मराठी भाषेंत उपसर्गांना (धातूशीं एकरूप झाल्यानंतर) निराळें अस्तित्व नाहीं, उपसर्ग हा धातूंत विरून जातो व त्या दोहोंच्या मिश्रणानें एक निराळाच स्वतंत्र धातु बनतो. मराठींत उपसर्ग द्योतक नाहींत व वाचकहि नाहींत. उपसर्गांना स्वतंत्र शक्ति मानण्याचा प्रकार मराठींत जरी नसला तरी तो संस्कृत सारख्या भाषेंत आहे. मराठींत जसा दोहोंचा एकजीव होतो तसा संग्राम वगैरे शब्दांत संस्कृतमध्यें होतो, परंतु अशीं उदाहरणें तुरळक आहेत. पाश्चिमात्य भाषांतहि हा प्रकार दृष्टीस पडतो व त्यासंबंधीं पॉट (Pott) ह्या भाषावेत्त्यानें एक नियम बांधिला. ह्या नियमाला Pott's theory असें नांव आहे. पॉटचा हा नियम तंतोतंत मराठीमध्यें

लागू पडतो. धातु आणि उपसर्ग एक होतात.

धातु शब्दाचा अर्थ वर दिलाच आहे. धात्वर्थ म्हणजे साधारणपणें क्रिया होय. धातु क्रिया दाखवितों का क्रियाजन्य फल दाखवितो? मीमांसाकारांच्या मतें *फलमात्रं धात्वर्थः, व्यापरः प्रत्ययार्थः (मंजूषा).* तसेंच *धात्वर्थः फलमिति मण्डनाचार्य्याः* (तत्त्वचिन्तामणि, धातवाद); परंतु हें मत गंगेशाला मान्य नसल्यामुळें तो *फलानुकूलो व्यापार एव धात्वर्थः* असें म्हणून धातु म्हणजे क्रिया, व्यापार व तौहि फलानुकूल हीच त्याची व्याख्या खरी ठरते. नैयायिकांचें म्हणणें जरा निराळें आहे. धातूला प्रत्यय वगैरे लाविल्यानें त्याला वाक्यांत वापरलें जाण्याची शक्ति प्राप्त होते. नुसत्या धातूचा अर्थ कांहींच नाहीं. नुसत्या धातूच्या अर्थापासून कांहीं व्यवहार उत्पन्न व्हावयाचा नाहीं. पतंजलीनें धातूची व्याख्या "क्रियावचनो धातुः" अशी केली आहे. "भाव वचनो धातुः" अशीहि पण त्यानें धातूची व्याख्या केली आहे. 'क्रिया' म्हणजे काय असें विचारलें म्हणजे पुढीलप्रमाणें पतंजलीच्या महाभाष्यांत सांपडतें "का पुनः क्रिया ईहा। का पुनः ईहा-चेष्टा। का पुनश्चेष्टा? व्यापारः।

४१. धातूंचें गणांवरून वर्गीकरण

संस्कृतमध्यें धातूंचें वर्गीकरण किती निरनिराळ्या प्रकारांनीं करतात ह्याचें दिग्दर्शन वर केलें. ह्या प्रकारांत गणांवरून वर्गीकरण करण्याचा एक प्रकार आहे. गणांच्या निरनिराळ्या चिह्नांवरून धातूंचे दहा प्रकार पडतात. त्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ अशी संख्येच्या क्रमानें दशम गणापर्यंत नांवें आहेत. ह्यांनाच त्या त्या वर्गातील पहिल्या धातूवरून नांवें देण्याचा दुसराहि एक प्रघात आहे. भ्वादि, अदादि, जुहोत्यादि, दिवादि, स्वादि, तुदादि, रुधादि, तनादि, क्रयादि, चुरादि हीं दहागणांचीं स्थूल नांवें आहेत. पाणिनीनें ही व्यवस्था आपल्या व्याकरणाच्या सोयीसाठीं किंवा रूपसिद्धि एका ठराविक पद्धतीनें सांगतां यावी म्हणून केलेली दिसते. धातूंचीं रूपें बनवितांना आदौ, मध्ये किंवा अन्ते फरक करावा लागण्याच्या वेळचें हें वर्गीकरण आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

धातूंच्या आरंभी, मध्यें अथवा शेवटी फरक करावा लागण्याच्या वेळेच्या पूर्वीची संस्कृत भाषेची अगदी जुनाट अशी अवस्था कल्पिणें शक्य आहे. ती वेदाच्या पूर्वीची-वेदपूर्वकालीन इतकी जुनी असूं शकेल. ह्या काळांत त्या भाषेंतील धातु कांहींहि विकार न होतां प्रत्यय घेई. ह्या प्रकाराचें कांहीं अवशेष संस्कृतमधील कांहीं धातूंच्या रूपांत असलेले अद्याप आढळतात. अद् + मि – अद्मि, हन्मि, इत्यादि.

धातूंचीं रूपें तपासलीं म्हणजे आपणांस धातूंचा आणखी एक प्रकार दृष्टीस पडतो.

१ साधे धातु- उदा. अद, हन्.

२ दुहेरी जोडधातु- उदा. तोदय, तोदिष, नेष, हन्ता इ.

३ अभ्यस्त धातु- जुहू, वीवद इ.

४ तिहेरी धातु- रमयांचकृ, चोरयांबभूव इ.

५ सोपसर्ग धातु-

विकरणाच्या दृष्टीनें पुन: धातूंचे दोन मुख्य वर्ग पडतात. एक विकरण घेणारे धातु व दुसरे विकरण न घेणारे धातु. ह्यांनाच सर्वधातु व अर्धधातु असें म्हणतां येईल. सर्वेण-अनुदर्शगिकविकरणेन वर्तमान: धातु: सर्वधातु: असा पाणिनीचा अभिप्राय दिसतो. ह्या सार्वधातु व आर्धधातु संज्ञा पाणिनीनें प्रत्ययांना लाविल्या आहेत, त्याहि धातूंच्या प्रकारावरूनच लाविलेल्या दिसतात. जे प्रत्यय पुढें असतां धातु सर्वधातूंचें रूप धारण करतो त्या प्रत्ययांना सार्वधातुक व ज्या प्रत्ययांच्या पाठीमागें धातु जसाच्या तसा राहतो त्या प्रत्ययांना अविकृत म्हणतात.

प्रत्येक गणाचे धातु पाहिले तर त्यांत कांहीं कांहीं रूपें अभ्यस्त किंवा यङ्लुक् सनन्त ह्यांचे अवशेष असावींत अशी कल्पना झाल्यावांचून राहात नाहीं. भू, नी. सिध् इत्यादि धातूंचीं भो, ने, सेध् अशीं जीं रूपें होतात व जीं गुणप्रक्रियेनें होतात म्हणून म्हणतात, तीं अभ्यासाचीं किंवा यङ्लुङ्ची उदाहरणें आहेतशीं वाटतात. बोभो, नेने, सेसेध् अशीं त्यांचीं रूपें होऊन नंतर पहिल्या अवयवाचा लोप झालेला दिसतो; व हीं रूपें काही तरी भृशार्थ दर्शविण्याच्या कामीं वापरीत असत असें वाटतें. ह्या रूपांची प्रक्रिया विशद करण्यासाठीं पाणिनीनें गुण किंवा वृद्धि ह्यासारखी प्रक्रिया शोधून काढून त्यांना तीं नांवें देऊन रूढ केलीं असा ह्या प्रक्रियेचा थोडक्यांत इतिहास दिसतो. कित्त-चिकित्स, गुप्-जुगुप्स, तिज-तितिक्ष, बध्-बीभत्स, दान-दीदांस, मान-मीमांस हीं रूपें उघड उघड दुसऱ्या गणांत गेलेलीं दिसतात. केवळ पहिल्या गणाचे आणखी कांहीं धातु घेतले तर त्यांत रजति (रंज्), सजति (संज्), दशति (दंश्), स्वजते (स्वंज्) इत्यादि धातूंत अनुनासिकत्याग, वन्द, मन्द इत्यादि धातूंत अनुनासिक स्वीकार केलेला आहे.

दुसऱ्या गणांतहि द्रु, अस्, वच्, चक्ष्, शी, स्तु इत्यादि धातूंच्या रूपांत अभ्यास किंवा यङ्लुङ् किंवा सन्नन्ताचे अवशेष दिसतात. अशा रीतीनें प्रत्येक गणांतील कांहीं धातूंच्या रूपांतील प्राचीन काळच्या पूर्ववैदिक भाषेंतील सातत्य, भृशार्थ किंवा इच्छार्थ वगैरे अर्थ दाखविण्यासाठीं उपयोगिलेल्या रूपांचे अवशेष दडून राहिलेले आढळतात. पूर्ववैदिक भाषेंतील अवशेष हे अशा रीतीनें सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास नजरेस पडण्यासारखे आहेत. हीच पद्धति जर कांहीं मराठी धातूंच्या रूपांस लावून पाहिली तर त्यांच्या रूपांतहि आपणास कांहीं जुने अवशेष सांपडल्याखेरीज राहणार नाहींत.

जुहोत्यादि तिसऱ्या गणांतील धातु सर्वच अभ्यास घेतात. ह्या गणांत अर्थातच साधे धातु नाहींत. ह्यांना श्लुविकरण अशी संज्ञा पाणिनि देतो.

चौथ्या गणांतील धातूंची छाननी केली तर असें दिसून येईल कीं, ह्या गणांतील धातुहि भृशार्थक यङ्पासून आले आहेत. देदीव्यति, सेसीव्यति, लेलिख्यति, शाशाम्य, तातान्य, शोश्य, छोछ्य इ. अशीं रूपें मूळचीं होत असावींत व नंतर त्यांचा पहिला अवयव गळून गेला असावा.

सुन्यादि व तन्यादि म्हणजे पांच व आठ ह्या गणांतील धातूंचीं रूपें बरींच जुन्या धातूंच्या रूपांचीं अवशिष्ट रूपें असावींत असें वाटतें. 'सु' ह्या धातूचें सवति किंवा 'तन्' ह्या

धातूचें 'तनति' असें रूप होणें साहजिक व योग्य आहे. त्याचीं सुन्व् व तन्व् अशीं अंगें फार प्राचीन काळीं होत असावींत व त्यांपासून सुनो व तनो अशीं बनलीं असलीं पाहिजेत. सुन्व् व तन्व् हीं रूपें पूर्ववैदिक यङ्लुङ्च्या अनुनासिक रूपांचे संक्षेप असावेत.

तुदादि वर्गांतील इच्छ्, विछ्, पृच्छ् हीं अंगें इष्, विद्, पृच् या धातूंच्या पूर्ववैदिक सनन्त रूपांपासून निघालीं असावींत.

रुधादि व क्रयादि धातूंच्यापैकीं बरेच धातु पूर्ववैदिक भाषांतील यङ् व यङ्लुक् यांचीं रूपें अवशिष्ट रूपांत राहिलेली दिसतात. रुध्-रोरुणध्मि-रुणध्मि, भिद्-बेभिनद्मि-भिनद्मि, प्री-पेप्रीणामि-प्रीणामि, ग्रह्-जगृह्णामि-गृह्णामि.

चुरादि गणांतील धातूंचीं रूपें अय् किंवा आपय् हा जोड धातु लागून होतात. पहिल्या गणांत ज्याप्रमाणें बोभो, नेने अशीं रूपें होत असत म्हणून वर सांगितलें, तद्वत् ह्याहि गणांत चोचोर, ताताड् आर्थ्, चाकथ् अशीं रूपें होऊन नंतर त्याचे पहिले अवयव नाहीसे होऊन बाकीचें अवशिष्ट रूप राहिलें व तेंच गणांतील त्या त्या धातूंचें रूप म्हणून शिल्लक राहिलें.

४२. मराठी धातूंचे निरनिराळे प्रकार

अशा रितीनें दहा गणांतील धातूंच्या रूपांची तपासणी केल्यानंतर असें दिसून येईल कीं, पूर्ववैदिक भाषेमध्यें अभ्यस्त, सन्नन्त, यङ्, यङ्लुक् त्यामधील निरनिराळ्या धातूंचीं रूपें तयार झालेलीं अशीं पुढील पाणिनीय काळांतील भाषेंत उतरलीं. पूर्वीची आठवण नाहींशी झाल्यामुळें गुण, वृद्धि, अभ्यास, संप्रसारण अशा प्रक्रिया त्यांच्याबद्दल सांगाव्या लागल्या. खरें पाहिलें तर सातत्य, भृशार्थ, इच्छा, पौन:पुन्य इत्यादि अर्थ दाखविण्यासाठीं धातूच्या रूपांत होणाऱ्या विकृति होत. अशा प्रकारच्या विकृति मराठी भाषेंतहि होत आहेत. संस्कृतमधील धातूच्या सन्नन्त, अभ्यस्त, यङ्, यङ्लुङ्न्त, णिच् वगैरे रूपांपासून उतरलेलीं कितीतरी रूपें मराठींत आढळतात; तीं त्या त्या ठिकाणीं दाखविलीं आहेत.

१ ध्वनिधातु – ध्वनिधातु मराठींत पुष्कळ आहेत. धातूच्या उच्चाराच्या ध्वनीवरून त्याच्या अर्थाची कल्पना येते, अशा धातूंना ध्वनिधातु म्हटलें आहे. भाषेंत जसे ध्वनिशब्द आहेत, तसेच ध्वनिधातु आहेत. ध्वनिधातूंवरूनच ध्वनिशब्द सिद्ध झालेले आहेत. धातू-धातूमध्यें ध्वनिधातु हे बरेचसे अगोदरचे असावेत. ज्याप्रमाणें एकस्वरी धातु हे आद्यधातु असावेत हें एक अनुमान आहे, त्याप्रमाणें ध्वनिधातु हेहि आद्यधातु असावेत, असेंहि अनुमान करण्यासारखें आहे.

राजवाडे ह्यांच्या धातुकोशांतील ध्वनिधातूंची पुढील उदाहरणें उल्लेखनीय आहेत.

खरखर, खळखळ, चणचण, चुचकार, झिमझिम, झुळझुळ, ठंठण, टंबल, ठोठाव, डबडब, तणतण, दुडदुड, दुमदुम, धडधड, धुत्कार, धुसफुस, पटपट, फणफण, फिरक, फुसफुस, फूत्कार, फोफाव, बोंबल, सरक, हिडिस.

२ नामधातु – नामें हीं आख्यातांपासून सिद्ध झालेलीं आहेत, अशा प्रकारचें एक मत मागें सांगितलें आहे. प्रवृत्ति अशी असते कीं नामाचें पृथक्करण करून आंतील धातु दाखवावयाचा.

पुढें पुढें प्रवृत्ति अशी होते. नामापासून धातु सिद्ध होतात. शब्दसिद्धि ह्या उत्पत्तीच्या प्रकारांतसुद्धां पुनर्जन्माचा किंवा आत्मा वै पुत्रनामासि हा सिद्धांत मानिला जातो. धातूंपासून नामें सिद्ध होतात व पुनष नामापासून धातु सिद्ध झालेलीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं राजवाडे यांच्या कोशांत आढळणारीं आणि त्यांतहि पुन: महत्त्वाची अशीं रूपें खालीं दिलीं आहेत. प्रथम धातु देऊन त्यापुढें कंसात त्याचें संस्कृत नामरूप दिलें आहे. उदाहरणें हीं कांहीं थोडीं आहेत- आर्जव (ऋजु), आवळ (आवल्न), आशाव (आशा), उचमळ, उडाळ, उडाव (उद्राव), उधव (ऊर्ध्व), उष्टाव, ताठ (तस्थु), ताठर (दृढतर), तानगाभ (स्तन्यगर्भ), तानमोठ (तृष्णामोट), तान्हेज (तृष्णाय), तांबार (ताम्र), तिसर (तिम्र), त्रहाण (ताराहननं), थरकाप (तरल्कंप), थेंब (स्तिंव), थोडाव (स्तोकट), थेंबड (सिंभिष्ट), धुंकर (अस्तुंकरणम्), दड्स (दृढीय), दंडीर (दंड), दणकाव (धृष्ण), इत्यादि इत्यादि.

३ वर्णागम – संस्कृतमधील धातु मराठींत येतांना कित्येक वेळां त्यांच्यामध्यें एखादा वर्ण घुसतो. ह्या प्रकारास वर्णागम म्हणतों. असा वर्ण येण्याचें कारण बहुधा उच्चारसौकर्य हेंच होय. पुढें कांहीं आगमाचीं उदाहरणें दिलीं आहेत.

अनुस्वारागम- खंकार, खंगळ, खंगाळ, खंट, म्हंट.

सुडागम-ह्यांतील 'स' हा तृतीय भूतकाळांतील 'स' चा अवशेष आहे असें म्हणतात. उदा. कळास, घुस (गुध् ४ परिवेष्टने), घुसड, घुसमट, घुसावि, खडस इ.

४ ज्ञानेश्वरींतील – ज्ञानेश्वरींत धातु निरनिराळे आढळतात. जे धातु मराठीमध्यें कधीं काळीं वापरांत असतील ह्याची कल्पनाहि आपणास येत नाहीं. असले कितीतरी धातु ज्ञानेश्वरी, अमृतानुभव (जुनी पोथी) ह्या ग्रंथांत आढळतात. राजवाडे ह्यांनीं व्युत्पादिलेले धातु हे काल्पनिक आहेत असें म्हणणाऱ्यांनीं ह्या कोशांत दिलेल्या ज्ञानेश्वरीतील उताऱ्यांतील धातूंकडे लक्ष द्यावें म्हणजे त्यांची खात्री होईल. जुनें वाङ्मय म्हणून हे दोन दाखले घेतले आहेत. आणखी इतर जुनें वाङ्मय तपासलें तर आणखी कितीतरी धातूंचा योग्य तलास लागून त्यांचा योग्य उपयोगहि समजेल. पुढें केवळ स्वरांतील धातु दिले आहेत. खालीं कोशांतील ज्ञानेश्वरींत आढळणारे कांहीं धातु देतों. सर्व धातु देणें अर्थातच शक्य नाहीं.

आवांक (अ. १३-ओं. ४०३), आवग (१४-२७९), आवड (१८-३२८), आलाब, आव (अमृतानुभव), आल (९-५२४), आल्व (५-५८), आहा, आसंस, आळुक (५-११०), इघ (४-१४९), बेंबळ, उगल (१६-२०९), उगण (९-४००), उगव (९-२२३), उट (११-१५७), उध (१४-४९), उदज (१५-१५२), उधळ (अमृतानुभव), उद, उपल्व (अमृता.) उफल, उमच (१३-५४०), उभग, उभ, (९-५०७), उमठ, उमाण (१७-३०४), उमुच, उसंत, एकवंक (१८-१३२८), ओगर (९-४३६, ओंक (अमृतानुभव), ओड (९-१५), जव (अमृता.), तिमिरेज, तिम, तूकर, थाव, थिन, दडप, दह, दाघ, दाडुग, दाव, देंदे, दुणावट, गोंगाव.

५ वैदिक – वैदिक धातूंपैकीं कांहीं मराठींत उतरले आहेत. हे धातु पाणिनीय धातुपाठांत

किंवा मधील प्राकृत भाषांत आढळत नाहींत. ज्या अर्थानें ते वैदिक वाङ्मयांत वापरले आहेत, त्याच अर्थानें त्यांचीं अपभ्रष्ट रूपें मराठींत वापरलेलीं दिसतात. त्यांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

कांकर, खाकर - कृ

खणकाव - कणुकय (निन्दायाम्)

खांडक - खंडीकृ.

गांठदेणें - दा (बन्धने)

खा - स्कु (भेदने)

आवांक (आ + वच्, वै), उजाव (ओजाव्), उताण (उत्तन्), उभार (भृ + ह्), उसल (उत् + शल्), उरक (उरुष्य), करकर (करीकृ), गोंगाव (ङु), चोंभ (चुभ् सुभ्), चोल (चुल्-तैत्तीरीय संहिता), चेत (चेष्ट्), चेच (चि), चिथव (चित्), तवक (तु-वृद्धौ), जुळ (जे), ताण (तन्द), तुडाव (तुदाय), थाल (स्तृ), हकाक (आ + कै), तान्द्र (तंन्द्र-संभ्रमे), हलकल (शल्य). ह्या वैदिक धातूंशिवाय Whitney, Macdonald, Monier Williams, Pischel इत्यादि वैय्याकरणांनीं आपल्या व्याकरणांच्या ग्रंथांत दिलेल्या धातुपाठांत पुढील धातु सांपडतात. हे धातु पाणिनिधातुपाठांत आढळत नाहींत. चात (चृत्), चढ (स्यद्) (सध्); जप् (सप्), तवकं (तु), ठेव (स्तै), डब (मृम्), फिर (विहरणम्-मानभावी), पोत (प्रोत वैजयन्ती), पात (पद् वैदिक), ध्रज्, गपकन् (ग्रभ्), सताव (सत्त्वनाम), शेव (सेव, शिम्), शेरंडाव (स्निग्ध्), विवळ (वल्ह्), लघ (लवंघ), पोपुड (पोपुड्), पांजर (पचतितराम्), न्हा (राज्), रूज् (रुध्), म्यस् (म्यक्ष्), मुरमुर (मृच्), बिलगा (ब्लंग्), बिलबिल (ब्ली), फेट (स्फिट्), फोल (उल्-दाहे), फुरफुर (प्रोथ्), पोहं (प्लु).

हे सर्व धातु वैदिकच असून मराठी भाषेंत त्या त्या रूपांत अवतरले आहेत.

झांब (जंभ्-नाशने), वठ (वत्) इत्यादि धातूंत कांहीं थोड्या अवेस्तन भाषेंतील धातूंचा माग लागलेला दिसतो.

६ सातत्यार्थक – सातत्यार्थक मराठी धातु.

ताडकळ (तंक्-तातक्य), ताडंगळ (तंग्), ताटस (तंच् तातंच्), ताठ (तास्था), ताठर (तास्तर) ताठस (तास्थास्), तातरावि (तत्त्वरापय्), तातावं (तम्तातम्), ताथंम् (तास्तम्य), हडप (दृभ्).

७ उपसर्गरहित – खालीं कांहीं नमुन्यादाखल मराठी धातूंचीं उदाहरणें देतों.

१ उपसर्ग न लागलेले सिद्ध धातु.

आच, इच, कर, कंद, खन, गण, जिल, चर, चेव, चु, [च्यव], चुण [सविकरण], तूट, दह, डस [दंश], दे [दा], धस [ध्वंस], नाह [स्ना], ने [नी], पी [पिव्], पुस [पृच्छ्], बोल [वल्ह् किंवा ब्रू], पिंज, वांच [वंच्], विंध [व्यध्], बुझ [बुध्य], माख,

याच, झुज [युध्य].

२ उपसर्गासहित मराठीत आलेले कांहीं धातु.

ये [आ + या], आचव [आचम्], उसल, उचल, उतर, उठ, उपट, उपेक्ष, निरख, निवर्त, पाखड [प्रक्षाल्], पारख, पुस [प्र + उच्च्], विक, भिज्, [अभि + अज्ज्], तिठ (अतिस्था), तिड, तिडक (तिष्ठ).

३ खालीं दिलेले धातु द्राविडीभाषांतून आले असावेत. कारण त्यांच्या व्युत्पत्तीबद्दल शंका आहे.

आट [कापड आटलें], कस [कंबर कसली], घेर [भोंवती वेढणें], चाट [चिकटून जाणें], चाट [तूप चाटणें], चाप [दाबणें], जोख [मापणें], झेल [चेंडू झेलणें], झुक [बाहेर झुकणें], टिक [कापड टिकणें], टिप [नेम मारणें], पट [कबूल होणें], राह, लढ इत्यादि.

४ अन्य भाषांतून आलेले धातु.

फारशी – चिमट, खिमट, गुजर, जम, खत, तपास, डाग, नरम, गरम, फसक, बदल इ.

इंग्लिश – एडिट, मॅनेज, कोट, नीट, ॲग्री इ.

ह्या धातूंपुढें मराठी "करणें" हें क्रियापद घालतात. पुढें दिलेलीं साधित धातूंचीं उदाहरणे आहेत.

१ कांहीं धातूंना खालीं दिलेले क, ट, र, ल, ड हे प्रत्यय लावून साधित धातु तयार करतात. ह्या प्रत्ययाचा अर्थ त्वरा किंवा सातत्य हा आहे.

१ क = अटक, आलुक, ऐक, कचक, चल्क, चिरक, चुळुक, चमक, चुमुक, टपक, टसक, ठमक, दुल्क, तरक, थबक, थक, धडक, दबक, दमक, धडक, धमक, नरक, भरक, भुरक, मचक, पुचक, लचक, लटक, सटक, हरक, हिंसक [आकृष्], हेचक.

२ ट = कचट, खचट, खसट, चिमट, झपट, थापट, दापट, त्रोट, दमट, थावट, हिसकट.

३ र, ल, ड, = उचल, कोसळ, चोवळ, झाकळ, डुकर, ठेचल, दादल, लंगड, अवटाळ, डावळ, हजळ, चोटळ, दुधाळ.

८, ९ अभ्यस्त, द्विरुक्त – अभ्यस्त धातूंत साधे, द्विरुक्त व द्विधातुसंयोग असे तीन प्रकार आहेत. त्यांचीं उदाहरणें अनुक्रमें खालीं दिलीं आहेत.

१ साधे = ढेंढाल, धुंडाल, जाग, चकव, भांबाव, केंकाट, बोंबल, गाग, तातड, चाचप, पोफार, गांगर, लोलंब, रोरव.

२ द्विरुक्त = खोखो, खटखट, काटकाट, दगदग, चटचट, चरचर, झळझळ, तणतण, तुडतुड, थरथर, थरार, थातंब, थिलथिल, चोख, थबथब, भडभड, घरघर, चरचर, छाटाछाट, हरहर, भिरभिर, दडदड, दंडल, ददात, दयदयकर, दलदल.

३ द्विधातुसंयोग = गटपट, घालमिल, धडपड, चुळबुळ, चिळबिळ, धरपकड, चुकभूल, देखमार- इ.

साधितधातूंमध्यें प्रयोजक, शक्य, नकारार्थी धातु, त्याचप्रमाणें नामें, विशेषणें, धातु व निपात ह्यांपासून साधलेले धातु; तसेंच अर्थभेदाचे वगैरे धातु येतात. परंतु स्थलसंकोचास्तव त्यांचीं उदाहरणें देत नाहीं. त्याचप्रमाणें मराठी धातूंचें रूप, त्यांचे गण, त्यांचे लकार, संयुक्त धातु इत्यादि बाबींचा ऊहापोह मुद्दाम टाळला आहे.

राजवाडे ह्यांनीं व्युत्पादिलेले धातु त्यांच्या विवरणासह खालीं देतों. असें पूर्ण विवरण केलेले धातु मात्र संख्येनें थोडे आहेत. व ते जाड्या टाईपांत छापले आहेत.

१ उडवणें [उर्व् = हिंसायाम्] उदा- त्याला उडवा, त्याचें डोकें उडवा. उडी ह्या धातूपासून निघालेल्या णिजर्थक उडवणें म्हणजे वरती उड्डाण करवणें ह्या धातूहून हा हिंसार्थक 'उडवणें' धातु निराळा. हा धातु णिजर्थक नाहीं.

२ खराडणें [क्षरादान = खराडण] खरडणें हा उच्चार मागाहून आला. अशिष्ट उच्चार खराड.

३ बेंवटणे [बेबिट्यते; बिट् आक्रोशे] - अतिशय आक्रोश करणें.

४ चळो का पळो करणें [चलीकल्प्य; 'कृलृप्' धातूचें पौन:पुन्यदर्शक रूप चलीकल्प्य किंवा चल्कल्प्य. कृलृप् = कल्पना करणें. चलीकल्प्य = नाना संकल्पविकल्प प्रकर्षानें करणें. चळणें व पळणें ह्या क्रियापदांचा येथें कांहीं संबंध नाहीं.

५ मिरवणें = १ [मिहिरायते; मिहिर = सूर्य] सूर्याप्रमाणें चमकतो.
२ [मील् - प्रकाशे] मील्य > मिरव].
६ भरभराटणें [वृह् वृद्धौ बर्बीर्टि] अतिशय वाढ होणें.
७ ठोकणें [धूम] [त्वंगति = प्लुतौ] उड्या मारीत जाणें, धूम ठोकणें. [लाकूड] [त्वक्षति] सुतार लाकूड ठोकतो (सूत्रकार: लकुटं त्वक्षति].

८ चिमळणें [श्मीलनं = शिमळ = चिमळ (वर्णविपर्यय) मिचळणें = चिमळणें].

९ हेटाळणें (हेडनं - यद्देवा देवहेडनं देवासश्चकृमाववयं - शुक्लयजुर्वेद) धातु हेड + आळ [प्रत्यय] हेड = अपराध.

१० गवस – [गवेष् १० मार्गणे; गवेष् > गिंवस > गवस] हुडकणें.

१० द्विधातुसंयोग – मराठीमध्यें कांहीं शब्दसंयोगाच्या योगानें धातु सिद्ध झालेल्यार्ची उदाहरणें. कधीं दोन धातु मिळून, कधीं भिन्न अर्थाचे दोन धातु तर कधीं एक अर्थाचे दोन धातु, कधीं दोन्हीं नामें, कधीं एक विशेषण व दुसरें नाम मिळून, असे निरनिराळ्या प्रकारचे धातु मराठींत सिद्ध झाले आहेत.

(१) गळपट, घालमिल, धडपड, चुळबुळ, चिळबिळ, धरपकड, देखमार असे दोन्हीं किंचित निराळे धातु मिळून एक धातुसाधित तयार झाला आहे. खडतर, खुडबुड, खरचट, खलबल, कासावीद, कुडतुड, किचकट, कचकर.

(२) ताटकळ (तास्था + कला), ताठाळ (तास्था + तल), (दृद् + ह्रु), दुचमळ (द्रह् + म्हल), तारकट (तार + कट), तारवत (तन्द्रा + वट), तिटकर (तिरस्कृ), तासड (त्रस् + पट), तिरपिड (त्रप् + पीड्), तिरमिर (तिमिर + मूर्च्छ), थलथल

(तल् + त्रक्; स्थल् + त्रक्).

(३) दणगार (धृण + गृ), दणदण (ध्वन् + ग्रण्), दपट (दम् + पट).

(४) दांताळ (दन्त + लु), दामाट (द्रम् + अट्), दुडप (द्विधा + कृ), (द्वि + धा), दुणार (द्वि + गुण + आकार), दुणावट (द्विगुण + आवृत), दिरंग (दिन + रंग; दीर्घ + रंग्), खचाट, खचळ, खरप, खोचट.

मराठीमध्यें संस्कृत 'णिच्' पासून कांहीं धातु आले आहेत त्यांचीं कांहीं उदाहरणें नमुन्यासाठीं खाली दिलीं आहेत.

आल (अल्), आवर्तवि (वृत्), आहट (घट्), उकरव (कृ), उकाड (उष्), उखाट, उडव, कचाव (कषापय्), कडकड (कटकटापय्), जमक (यमकाय्), दटाव, धमकाव.

ह्यांमध्यें असे कांहीं धातु आहेत कीं ते संस्कृतमधील 'अय' ह्या प्रत्ययाचीं 'अप, अव, अज' इत्यादि निरनिराळीं रूपें घेऊन मराठींत उतरलेले दिसतात.

११ णिच्, सन्, यङ्लुङ् इत्यादि- णिच् धातूंप्रमाणेंच संस्कृत यङ्लुङ्तापासून मराठींत पुढील कांहीं धातु आले आहेत.

चिकार (कृ), चिघळ (जिघृ), चापस (स्पश्), चाचर (चर्), गरगळ (गृ), गम् (नग्), चेकल (केल्, खेल्), चुण् (कुण्), चिलस (क्लिश्), तटाट (तंट्), तणाण (तन्), ठणाण (स्तन), ठंठण (स्तन्), ठिव (स्ता), टवटव (तु), टरार (तृ), धांडुळ, धोधाट, धादर, धाधर, धांदुळ, झंझर (झृ), झोंब (यभ्), झिंझाड (छद्), जग (गम्), नाणाव (नु).

वरीलप्रमाणें मराठी धातुपाठासंबंधीं कित्येक मुद्दयांची मांडणी करून त्यांतील कांहीं धातूंचा उलगडा संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश वगैरे भाषांच्या व्याकरणांतील आधार घेऊन करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. ह्या प्रस्तावनेत कोणकोणते विषय ऊहापोहासाठी घेतले आहेत त्यांची यादी आरंभीच दिली आहे. परिष्कार होतां होईल तों संपूर्ण व सांग करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या विवेचनांत आणखी आधुनिक बोलभाषांतील उदा. गुजराती, हिंदी, बंगाली इत्यादि भाषांतील धातुपाठांचें विवेचन देण्याचा इरादा होता, परंतु पृष्टमर्यादा उल्लंघिली जाईल म्हणून हात आखडता घेतला.

मराठीमध्यें असल्या स्वरूपाचा हा ग्रंथ पहिलाच आहे व त्याची मर्यादा व क्षेत्रहि राजवाडे ह्यांनीं आपल्या नेहमींच्या बुद्धीच्या भरारीप्रमाणें अत्यंत विस्तृत धरिलें आहे. क्षेत्र विस्तृत धरिलें म्हणजे काहीं बारीक सारीक गोष्टींकडे कधीं कधीं दुर्लक्ष होतें, नाहीं असें नाहीं. गरुडाची भरारी उंच गेली म्हणजे त्याच्या दृष्टीच्या क्षेपाचा विस्तार ह्यामध्येंच गांभीर्य, उदात्तत्त्व असतें. त्याला जमिनीवरील क्षुद्र खबदाडें दिसलीं नाहींत तर त्यांत आश्चर्य नाहीं. त्याचा क्षेपच मनावर परिणाम करतो, व त्यांतच त्याचें महत्त्व आहे, त्याच्या दृष्टीचें विशालत्व आहे. जो एवढ्याच्या खबदाडीची लांबीरुंदी अगदीं तंतोतंत मोजावयास लागला त्यानें तीच जन्मभर मोजीत बसावें. त्याच्या दृष्टीचें केंद्रहि तेंच आणि क्षेत्र हि पण तितकेंच. त्याला हा असा विस्तृत पल्ला कसा पेलणार ?

ह्या विस्तृत क्षेत्रामुळें क्षुद्र दोष राहिले असण्याचा संभव आहे. परंतु वरील विचारसरणी मनांत धरून मोठ्या विशाल दृष्टीनें त्याबद्दल क्षमा करावी. दोष कोणाचे हात नाहींत ? कोणता ग्रंथकार हा रोखठोक छातीला हात लावून सांगूं शकेल कीं, माझा ग्रंथ हा सुतराम् निर्दोष आहे. एखादा ग्रंथ चिवडावयासच बसलें तर त्याची सालडी सालडी काढावयास उशीर लागत नाहीं. विद्वत्ता काय हो! एकदां तुम्ही तिला सोलावयास लागली तर तीं बिचारी काय करणार ? खुशाल सोला तिला व आपल्या सैतानी डोळ्याचें एकदां पारणें फेडा. कोणती व कोणाची विद्या अशी रीतीनें निर्घृणपणानें सोलतां येणार नाहीं असें थोडेंच आहे ? परंतु हा सैतानी वृत्तीचा मार्ग आहे! मुख्य पाहण्याची गोष्ट ही कीं, ह्या प्रस्तुत ग्रंथांनें ज्ञानाच्या सध्यांच्या संचयांत कांहीं भर टाकिली कीं नाहीं ? जरी थोडी भर टाकिली असली तरी त्यानें आपलें कार्य केलें असेंच म्हणावें लागेल. त्याचें वाङ्मयजीवनाचें साफल्य झालें. ज्ञानाची ही गंगा आहे. ही सारखी वाहाती आहे. हिच्या प्रवाहांत आजपर्यंतच्या विद्वानांनीं आपल्या जवळच्या ज्ञानाची भर टाकिली आहे. सध्यांहि कांहीं विद्वान् टाकीत आहेत. राजवाडे ह्यांनींहि आपला हंडा भरून त्या ज्ञानगंगेंत टाकला आहे. मराठी भाषेला विशेष सबल करण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. भाषा-सरस्वतीचा जो मूळचाच ओघ अडून बसला होता, तो ह्या धातुपाठाच्या प्रकाशानें त्यांनीं मोकळा केला आहे व प्रवाहास वाट करून दिली आहे. इतर विद्वानांनीं ह्यांतील कर्दमादि जाळ्यांचे दोष काढून त्यांतील नितांत शुद्धता चाखून मराठी भाषेला व तिच्या शास्त्रीय अभ्यासाला विशेष ओज प्राप्त करून दिलें तर त्यांच्या ह्या अफाट श्रमाचें सार्थक झालें असें होऊन त्यांच्या भाषाशास्त्राच्या प्रसारासाठीं रात्रंदिवस तळमळणाऱ्या आत्म्यास निरंतरचें समाधान मिळेल. शेवटीं विनंती इतकीच कीं कांहीं मुद्रणदोष असतील तर त्याबद्दल क्षमा करावी.

मार्गशीर्ष शके १८५९ कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी

संदर्भ व टीपा

१. Work book- Roth & Boiling St. Petersberg Dictionary आणि Monier Willam's Dictionary.
राजाराम शास्त्री भागवत. वि. फा. लेक्चर्स.
३. वेस्टर गार्ड यानें तयार केलेली धातूंची यादी.
४. डॉ. मरे ह्यानें शोधलेले नऊ धातु. ॲंग्, वॅंग्, कॅम्, डॅंग्, लॅंग्, मॅंग्, वॅंग्, रॅंग्, खॅंग्.
५. सुनीति कुमार चतर्जी ऑ. डे. आफ बंगाली लँग्वेज प्रकरण.
६. A Levefre - Race & Language. Ch, Page 270.
७. कानिटकर-प्राकृत व्याकरणांतील धात्वादेश. म.सा.प. २-२.
८. डॉ. ग्रियरसन-प्राकृत धात्वादेश. बंगाल आ. सो. मेमॉयर्स व्हा. ८ नं. २ पृ. ८३०.

राजवाडे संशोधन मंडळाचें निवेदन

परमेश्वर कृपेनें कै. राजवाडे यांच्यासारख्या महान् संशोधकाचा हा दीर्घ प्रयत्न जनतेपुढें मांडला आहे. संपादकीय प्रस्तावनेंत भाषाशास्त्रीय विवेचनाचा वाचकांस परिचय होईलच. येथें फक्त धातुकोशाच्या कल्पनेचा उद्गम व विकास यांविषयीचें आवश्यक दिग्दर्शन देत आहों.

राजवाड्यांच्या पश्चात् त्यांच्या धातुकोशाच्या संपादनाचें काम *श्री. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, एम.ए.* यांनीं आपले शिरावर घेऊन अनेक कार्यांत त्यांचें मन गुंतलें असतांही तें पार पाडलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

धातुकोश प्रसिद्ध करण्याचें मंडळानें ठरवित्यावर या ग्रंथाची छापण्यास द्यावयाची प्रत राजवाड्यांच्या हयातींत तयार केली गेली नसल्यामुळें ती तयार करणें मंडळास प्राप्त झालें. ही प्रत तयार करण्याचें बिकट कार्य करण्यास लायक असे गृहस्थ *रा. पुरुषोत्तम नारायण वर्तक*, पेनशनर हेडमास्तर, प्रॅक्टिसिंग स्कूल धुळें हे मंडळास अनायासें लाभले व त्यांनीं ती प्रत अत्यंत दक्षतेनें निरलसपणें शुद्ध अशी तयार केली; त्यांचाही या ग्रंथाच्या प्रकाशनाचे कामीं मंडळास अत्यंत उपयोग झाला आहे.

मराठी धातुकोशाची कल्पना राजवाड्यांच्या मनांत केव्हां व कशी उदित झाली, या कोशाची रचना करण्यांत त्यांचा हेतु काय होता व या कल्पनेच्या अंतर्भूत नानाविध विषयांची मांडणी करण्याचा संकल्प त्यांचे मनांत कोणत्या स्वरूपाचा वसत होता इत्यादि मुद्द्यांचें दिग्दर्शन साक्षात् त्यांच्या लेखांतील उताऱ्यांवरून करतां येण्यासारखें असल्यामुळें तें आम्ही या निवेदनांत करण्याचें योजिलें आहे. या निवेदनांत प्रथम कोशरचनापरिचय या मथळ्याखालीं अवश्य तितकी राजवाड्यांच्या धातुकोशविषयक लिखाणाच्या स्वरूपाची माहिती व तिचे आधारें तयार करण्यांत आलेली या ग्रंथाची छापण्यास द्यावयाची प्रत कशी तयार केली त्याची माहिती आम्ही दिली असून नंतर वर दर्शविलेल्या मुद्द्यांविषयीचें विवेचन केलें आहे.

(१) कोशरचनापरिचय

कै. राजवाडे त्यांच्या पश्चात् राजवाडेसंशोधनमंडळ शके १८४८ (इ.स. १९२७) सालांत स्थापन करण्यांत आलें. या मंडळाचे जे अनेक हेतु ठरविण्यांत आले आहेत त्यांत चौथा हेतु कै. राजवाडे यांनीं लिहून ठेवलेला प्रचंड मराठी धातुकोश व त्यांचीं इतर पूर्णापूर्ण टांचणें

प्रसिद्ध करणें हा एक आहे. राजवाडे मंडळाच्या अन्य हेतूंपैकीं संशोधनमंदिराची उभारणी, संशोधक त्रैमासिकाचें प्रकाशन इत्यादि कार्ये मंडळानें हातीं घेऊन ती पार पाडलीं आहेत. या कार्यांची पूर्तता झाल्यानंतर वरील हेतूस अनुसरून राजवाड्यांच्या धातुकोशाची प्रसिद्धि करण्याची योजना शके १८५६ च्या मार्गशीर्ष महिन्यांत (ता. १३ जानेवारी १९३४) श्रीमंत राजे बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधि यांच्या अध्यक्षत्याखालीं जाहीर करण्यांत आली व नंतर धातुकोश ग्रंथाची छापण्यासाठीं हस्तलिखित प्रत तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें व तें कोशाच्या प्रसिद्धीस्तव नेमण्यांत आलेल्या सल्लागारमंडळाच्या देखरेखीखालीं तयार झालें. राजवाड्यांच्या धातुकोशासंबंधाचें जें लिखाण राजवाडेमंदिरांत सुरक्षित ठेवण्यांत आलें आहे त्या लिखाणाचें वास्तविक स्वरूप, छापण्यासाठीं हस्तलिखित प्रत ज्या पद्धतीस अनुसरून तयार करण्यांत आली ती पद्धत, त्याचप्रमाणें मूळच्या राजवाड्यांच्या लिखाणांत मूळांत नसलेली कोणती नवीन माहिती घालण्यांत आली व ती माहिती कोणीं घातली इत्यादि मुद्द्यांचें दिग्दर्शन आम्ही सुरुवातीसच करितों.

राजवाड्यांच्या संग्रहांत धातुकोश व नामादि शब्दकोश यांच्या रचनेस्तव त्यांनीं स्वत:चे हातानें लिहिलेल्या व इतर कांहीं गृहस्थांच्या मदतीनें लिहून घेतलेल्या निरनिराळ्या चिठ्ठ्या उपलब्ध झाल्या, त्यांच्या स्वरूपाचें प्रथम दिग्दर्शन करितों.

छापण्यासाठीं हस्तलिखित प्रत तयार करण्याचें काम राजवाडे यांनीं त्यांच्या निधनापूर्वी पंधरातीन वार सुरू करण्याचें ठरविलें होतें; परंतु तें सुरू करण्यापूर्वीच काळानें त्यांच्यावर अचानक घाला घातल्यामुळें हें काम राजवाडे सं. मंडळास हातीं घेण्याचा प्रसंग आला! राजवाड्यांच्या धातुकोशाच्या लिखाणांत 'कर' या धातूसंबंधीं त्यांनी केलेलें जें विवेचन उपलब्ध झालें आहे तशा प्रकारचें विवेचन त्यांना युक्त वाटतील त्या त्या कोशांतील अनेक धातूंविषयीं करावयाचा त्यांचा मानस असावा असें निश्चित अनुमान करण्यास हरकत नाहीं. (हें 'कर' धातूचें विवेचन कोशाचे शेवटीं परिशिष्टांत दिलें आहे). हें सर्व विवेचन त्यांच्या निधनामुळें केलें गेलें नाहीं हें उघड आहे; परंतु याशिवाय राजवाड्यांच्या धातुविषयक वाङ्मयांत एक २३ मुद्द्यांचें टिपण उपलब्ध झालें आहे. धातुकोशग्रंथास प्रस्तावना लिहिण्यास्तव या टिपणांतील मुद्दे त्यांनीं लिहून ठेवले असावे असें ते मुद्दे वाचले असतां दिसून येतें. (हें टिपण कोशाचे शेवटीं परिशिष्टांत दिलें आहे.) या दोन्हीं टिपणांतील मुद्द्यांचा विचार केला असतां या ग्रंथाच्या विस्तृतपणाची व त्यांत विवेचिल्या जाणाऱ्या मुद्द्यांच्या बहुविधत्वाची राजवाड्यांची कल्पना कोणत्या स्वरूपाची होती हें दिसून येतें. राजवाड्यांच्या हयातींत या टिपणांतील मुद्द्यांचें विवेचन त्यांचेकडून केलें गेलें असतें तर तें नि:संशय अपूर्व असेंच ठरलें असतें; परंतु त्यांच्या मृत्यूमुळें या विवेचनासही आपण आंचवलों आहों! या वर दर्शविलेल्या दोन बाबींशिवाय अन्य दृष्टीनें त्यांच्या धातुकोशाचा सांगाडा पूर्ण स्वरूपाचा होता असें निश्चित विधान करण्यास प्रत्यवाय नाहीं.

धातुकोशांत छापण्यांत आलेल्या धातूंच्या राजवाड्यांच्या हातच्या लिहिलेल्या चिठ्ठ्या या एका पाव कागदाचे आडवे चार भाग केल्यानें होणाऱ्या कागदाएवढ्या लहान आहेत.

यांवर धातुकोशांत यावयाचे धातु, त्यांची व्युत्पत्ति व त्या धातूंचें अर्थ लिहिले आहेत. हे अर्थ अ अक्षरापासून ग अक्षरापर्यंत बहुतेक मराठींत व पुढच्या अक्षरांमध्यें थोडे मराठी व बहुतेक इंग्रजी असे दिलेले आहेत. या लहान चिठ्ठ्यांवर एकाच व्युत्पत्तीचे अनेक धातु असल्यास ते एकाच चिठ्ठीवर लिहिलेले आहेत व त्या अनेक धातूंत जो मुख्य धातु तो आरंभीं लिहून बाकीचे पुढें लिहिलें आहेत. पुढील नमुने पहा.



या लहान चिठ्ठ्यांशिवाय राजवाड्यांच्या संग्रहांत जाड ड्रॉइंगच्या कागदाच्या मोठ्या चिठ्ठ्या ७॥ इंच लांब व ५॥ इंच रुंद अशा आहेत. या चिठ्ठ्यांवर लहान चिठ्ठीवरील एकेक धातु लिहिला आहे, व त्यापुढें त्याच्या व्युत्पत्तीचा धातु अगर शब्द लिहिला आहे; व या चिठ्ठ्या कोश तयार करण्याच्या दृष्टीनें वर्णनुक्रमानें लावलेल्या आहेत. अ पासून औ पर्यंतच्या चिठ्ठ्यांवर अनुक्रमाचें आंकडे घातले आहेत आणि अक्षरापासून गकारापैकीं कांहीं धातूंच्या चिठ्ठ्यांवर लहान चिठ्ठीवरील बहुतेक माहिती धातूच्या अर्थासह उतरलेली आहे. येथून पुढच्या हकाराअखेरच्या मोठ्या चिठ्ठ्यांवर मराठी धातु व त्याच्या व्युत्पत्तीचा धातु अगर शब्द एवढेंच लिहिलेलें आहे. बाकीची लहान चिठ्ठीवरील माहिती या मोठ्या चिठ्ठ्यांवर लिहिलेली नाहीं. लहान चिठ्ठीवर एकाच व्युत्पत्तीचे अनेक धातु असल्यामुळें त्यांपैकीं मुख्य धातूची मोठी चिठ्ठी लिहितांना माहितीच्या शेवटीं 'इतर रूपें' असें शब्द लिहून त्यांपुढें त्या लहान चिठ्ठीवरील इतर धातु लिहिले आहेत. पुढील नमुने पहा:—

आतळ [हस्ततल (नामधातु)
हस्ततल = हत्तल (वर्णलोप, पूर्वस्वर दीर्घ)
= आतळ]
स्पर्श करणें, चोरी करणें
(हातळ, हाताळ- इतर रूपें)

आपुथि [आ + पुथ्-१ हिंसायाम्] गांजणें
(आपुथिणें, हापुटणें, हाफुटणें, हाफटणें,
हफटणें, हफुटणें- इतर रूपें)

या इतर रूपांच्या मोठ्या चिठ्ठ्या लिहितांना त्या प्रत्येक चिठ्ठीच्या डाव्या हातच्या कोपऱ्यांत see आतळ किंवर see आपुथि अशा प्रकारचे शब्द लिहिलेले आहेत. पुढील नमुने पाहा.

हातळ- हस्ततल (नामधातु)

see आतळ

हातळ- हस्ततल (नामधातु)

see आतळ

हापुट- आ + पुथ्

see आपुथि

याप्रमाणें राजवाड्यांच्या संग्रहांत असलेल्या लहान व मोठ्या चिठ्ठ्या यांचें स्वरूप आहे. यानंतर या चिठ्ठ्यांवरून कोशाची हस्तलिखित प्रत कोणत्या पद्धतीनें तयार केली याचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों.

राजवाडे धातुकोशाच्या प्रसिद्धीचें कार्य राजवाडे मंडळानें एका सल्लागार मंडळाच्या सल्ल्यानें करण्याचें ठरविलें. या मंडळानें कोशाची हस्तलिखित प्रत कशा पद्धतीनें तयार करावयाची

या गोष्टीचा विचार करून खालील धोरण स्वीकारावें असें ठरविलें.

(१) राजवाड्यांच्या लिखाणांत ज्या ठिकाणीं व्युत्पत्तीमधील संस्कृत धातूंचे गण घातले नसतील तेथें ते गण घालण्यांत यावे.

(२) एकाच मराठी धातुशब्दाची निरनिराळीं अनेक निवर्चनबीजें देतांना तो धातुशब्द पुन्हा न लिहितां त्याखालीं २, ३, ४ इ. आंकडे घालून तीं बीजें दाखवावीं.

(३) राजवाड्यांनीं कांहीं मराठी धातूंच्या अर्थस्पष्टीकरणासाठीं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि ग्रंथांतील ओव्यांचे आंकडे दिले आहेत; तरी त्या ठिकाणीं त्या आंकड्यांवरून त्या ग्रंथांतील त्या ओंव्या संपूर्ण द्याव्या.

(४) घकारापासून पुढच्या धातूंचे अर्थ दर्शविण्याकरितां राजवाड्यांनीं बहुतेक इंग्रजी शब्द दिले आहेत, ते इंग्रजी शब्द कोशांत न छापतां त्यांचे मराठी प्रतिशब्द देण्यांत यावे, व हे प्रतिशब्द श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनीं द्यावे.

(५) अपासून गकारापर्यंतच्या धातूंच्या मोठ्या चिठ्ठ्यांत व्युत्पत्तीमधील साधनिकेचा कांहीं मजकूर श्री. कुलकर्णी यांनीं घातलेला आहे. तो { } अशा मेहेरपी कंसांत दाखविला आहे.

सल्लागारमंडळाच्या वरील सूचनांस अनुसरून कोशाची हस्तलिखित प्रत छापावयास देण्यासाठीं तयार केलेलीं आहे.

धातुकोशासाठीं तयार केलेल्या मोठ्या चिठ्ठ्यांमध्यें अशा कांहीं चिठ्ठ्या आहेत कीं, त्यांच्या लहान चिठ्ठ्या लिहिलेल्या नाहींत व त्यांवर लिहिलेले बहुतेक धातु संस्कृताप्रमाणें व्यंजनान्त लिहिलेले आहेत; आणि त्यांच्या मागे ई १, ए १, इ. धा, स, अ, ए वगैरे अक्षरें लिहिलेलीं आहेत; व त्यांपुढें यावयाची सर्व माहिती राजवाडे यांनीं साधारणपणें एक प्रकारच्या बारीक अक्षरांत लिहून ठेवलेली आहे. अशा चिठ्ठ्या अ पासून ह अखेर सर्व अक्षरांच्या चिठ्ठ्यांमध्यें मधून मधून आढळतात. ही योजना त्यांनीं नामकोशासाठीं लिहिलेल्या चिठ्ठ्यांतही आहे. ठाय, ताठ, इ. शब्दांमागें ए १ हीं अक्षरें आहेत. ही त्यांची निराळी योजना धातुकोशांत कायम ठेवावी म्हणून अशा चिठ्ठ्यांच्या धातूंची माहिती जाड्या टाइपांत छापली आहे. अशा धातूंचे नमुने पुढें दिले आहेत.

अ ए १ मर् = स्मृ ५ उपजीवने
मर, एकदा जेव जा, येथें मर म्हणजे जग असा अर्थ आहे.
मरें ना जाऊं दे.
सदा घरांत मरतो म्हणतो रहातो.

स. अ. ए. इ १ वद् = वद् १ व्यक्तायांवाचि

ई १ होकर, होकार } होकृ स्तंभने ८

एकाच धातुशब्दाचीं अनेक निर्वचनबीजें देतांना २, ३, ४ इत्यादि आंकडे दिले आहेत, त्यांचा उपयोग त्या धातूचीं इतर रूपें देतांना अगर 'अमुक धातु पहा' असें सांगतांना केला आहे. एणेंकरून एका धातुशब्दांशीं संबद्ध दुसरा धातु कोणता हें निश्चितपणें समजण्यास सोय झाली आहे. उदाहरणार्थ ओढ धातु पहा. त्याचे संबंध असे आहेत :—

ओढ १ या धातूचा संबंध ओड ३ याशीं आहे.
ओढ २ ,, ,, ,, ओड २ ,, ,,
ओढ ९ ,, ,, ,, वढ ३ ,, ,,
ओढ १० ,, ,, ,, वध ,, ,,

इ. इ. इ.

आतां वर सांगितल्याप्रमाणें राजवाडे यांच्या लहानमोठ्या चिठ्ठचांवरून कोशाची हस्तलिखित प्रत धुळें येथें लिहिली जाई. नंतर ती श्री. कृ. पां कुळकर्णी यांजकडे तपासण्यासाठीं सातारा अगर पुणें येथे पाठविण्यांत येई. त्या वेळीं ते कित्येक धातूंचीं निर्वचनबीजें कमी करीत;

यामुळें पूर्वी छापून गेलेले कांहीं धातूंच्या संबंधाचे आंकडे मेळानें राहिले नाहींत. तरी त्या ठिकाणीं असलेल्या धातूच्या व्युत्पत्तीवरून ते धातु समजून येतील. सर्व हस्तलिखित प्रत लिहून व तपासून झाल्यावर कोश छापावयास सुरुवात करावयास पाहिजे होती, परंतु तसा योग न जमल्यामुळें असे आंकडे जमले नाहींत, त्यांबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

एकाच धातुशब्दाचीं अनेक निर्वचनबीजें असतील तेथें राजवाड्यांनीं त्या प्रत्येक धातुशब्दाची मोठी चिठ्ठी निराळी लिहिली आहे, त्याचप्रमाणें कोशांतही प्रत्येक निर्वचनाबीजास निराळा आंकडा दिला आहे; परंतु पुढें पुढें विस्तारभयास्तव निर्वचनबीजें अनेक असून अर्थ एकच असेल तर तीं निर्वचन बीजें एकाच चौकटी कंसांत स्वल्पविरामानें वेगळीं दाखविली आहेत. अर्थात् जितकीं निर्वचनबीजें तितके ते धातुशब्द समजावयाचे हें उघड आहे. उदाहरणार्थ जाच, ल्यड , वच, लुट, इत्यादि धातु पाहावे.

राजवाड्यांनीं कांहीं मोठ्या चिठ्ठ्यांवर वर्णानुक्रमाचे आंकडे घातलेले आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांत वर्णानुक्रम लावण्यासंबंधानें राजवाड्यांची जी योजना दिसून आली तीच योजना शेवटपर्यंत कायम ठेविली आहे. क्ष हा कचे जोडाक्षरांत व ज्ञ हा जचे जोडाक्षरांत त्यांनीं योजलेला आहे. अनुस्वार हा त्या त्या स्वराचे मागून घेतला आहे. उदाहरण, आव, आंव; कात, कांत; ठेच, ठेंच; फुक, फुंक इ. धातु पाहावे.

लहान चिठ्ठ्यांच्या पुडक्यांतून अशा कांहीं चिठ्ठ्या आहेत कीं, त्यांच्या मोठ्या चिठ्ठ्या लिहिलेल्या नाहींत. एकदां मोठ्या चिठ्ठ्या लिहून झाल्यावर मागाहून ज्या धातूंच्या लहान चिठ्ठ्या लिहिल्या गेल्या त्या ह्या लहान चिठ्ठ्या असाव्यात असें वाटतें कारण कोशाच्या लिखाणाची तयारी करणें चाललें होतें, अशा वेळीं अशा चिठ्ठ्या मागाहून तयार होणें साहाजिक आहे. करितां अशा लहान चिठ्ठ्यांच्या मोठ्या चिठ्ठ्या तयार करून त्या मोठ्या चिठ्ठ्यांत सामील केल्या आहेत. अर्थात् त्यांचा समावेश कोशांत झाला आहे.

कित्येक धातूंवरून झालेले धातुसाधित शब्द कांहीं लहान चिठ्ठ्यांवर लिहिलेले आहेत. असे शब्द त्या धातूचीं इतर रूपें सांगितल्यावर तपासून पुढील धातूंच्या माहितींत शेवटीं 'रूपें' हा शब्द लिहून त्यापुढें दाखविले आहेत. उदाहरणार्थ- टळटळ १, २, ठळ, थु इ. धातु पाहावे. आणि पुढें फोपाट धातूपासून 'शब्द' असा शब्द लिहून त्यापुढें असे शब्द दाखविले आहेत. उदाहरणार्थ- फोपाट, बाड, बुड ५, बुळबुळ १ इ. धातु पाहावे. टच्या मागील धातूंमध्यें अशीं निराळी योजना केलेली नाहीं. कित्येक ठिकाणीं असे शब्द धातूच्या माहितींतच आले आहेत व कांहीं ठिकाणीं 'इतर रूपें' या शब्दापुढेंही आले आहेत. उदाहरणार्थ- गट, गवगव, गुंड २, घेर ४ इत्यादि व चुरचुर २, चेंदमेंद, छुमक इ. धातु पाहावे. राजवाड्यांनीं लिहिलेल्या नामादि शब्दांच्या चिठ्ठ्यांमध्यें हे शब्द आले असून त्यांच्या चिठ्ठीच्या कोपऱ्यावर 'तो धातु पहा' असे शेरे दिलेले आहेत. पुढील नमुने पहा:—

आवरण = आपारणम्

see आवर

आवांका – आ + वक्ष्

see आवांक

कित्येक धातूंच्या व्युत्पत्तीमध्यें कित्येक ठिकाणीं 'अकच्' असा शब्द आला आहे तो 'क' आहे. याचा खुलासा राजवाड्यांनीं 'भटक' धातूच्या माहितींत दिला आहे तो पाहावा.

कित्येक ठिकाणीं 'पाणिनि ३-४-७२' असे आंकडे संदर्भासाठीं राजवाड्यांनीं दिले आहेत; त्यांचा अर्थ पाणिनि अष्टाध्यायी अध्याय ३ रा, पाद ४ था व सूत्र ७२ असा आहे, असें राजवाडे यांनीं नामादिशब्दकोशांत 'नस्यविभाषा' शब्दामध्यें दिलें आहे. (भारतइतिहास सं. मं. चें वार्षिक इतिवृत्त शके १८३३ नस्यविभाषा शब्द पाहावा).

कित्येक धातूंच्या लहान चिठ्ठ्यांवर जीं इतर रूपें लिहिलीं आहेत त्यांत व्यंजनान्त धातु लिहिलेले नाहींत; पण त्या व्यंजनान्त धातूंच्या मोठ्या चिठ्ठ्या लिहिलेल्या आहेत व त्यांवर तोच व्यंजनान्त नसलेला धातु पहा असे शेरेही आहेत, म्हणून हे व्यंजनान्त धातु कोशांत दिले आहेत. उदाहरणार्थ- हायहाय १ हा धातु पहा. यांत इतर रूप फक्त एकच हयहय हें दिलें आहे पण हय्हय् ह्या व्यंजनान्त धातूची मोठी चिठ्ठी आहे व तिचे कोपऱ्यांत हायहाय धातु पहा असें लिहिलें आहे. याचप्रमाणें हपट्, हलहाल् इ. व्यंजनान्त धातूंविषयी समजावें.

धातूंच्या अर्थस्पष्टीकरणासाठी राजवाड्यांनीं दिलेल्या ज्ञानेश्वरींतील ओव्या देतांना त्या राजवाडे यांनीं संपादिलेली शके १८३१ (सन (१९०९) सालची आवृत्ति घेऊन तीवरून दिल्या आहेत. तसेंच माडगांवकर यांचे ज्ञानदेवींतील उदाहरणें देतांना त्यांनीं शोधिलेल्या इ. सन १९०७ मधील प्रतीवरून दिलीं आहेत. कित्येक ठिकाणीं राजवाडे यांनीं 'माडगांवकर पोथीं' तून ओंव्या दिल्या आहेत, परंतु सदर पोथी उपलब्ध न झाल्यामुळें त्या सबंद ओंव्या देतां आल्या नाहींत. उदा. निबोळ, निरेख धातु पाहावे. अमृतानुभवाची हातानें लिहिलेली जुनी पोथी राजवाडे यांच्या संग्रहांत आहे व ती शके १५८२ मधील आहे. तींतील त्यांनीं दिलेल्या ओंव्या पुऱ्या दिल्या आहेत. शिवकल्याणकृत अमृतानुभवाचे पुस्तकांतीलही कांहीं ओंव्या उदाहरणासाठीं दिल्या आहेत. या ओंव्या शके १८१० मध्ये कै. अण्णा मोरेश्वर कुंटे यांनीं तपासून निर्णयसागरमध्यें छापलेल्या पुस्तकावरून दिल्या आहेत.

मराठी भाषेंत एकंदर धातु किती आहेत याविषयीं राजवाड्यांच्या धातुकोशाच्या प्रसिद्धीमुळें निश्चित विधान करण्यास प्रत्यवाय राहिला नाहीं. या धातुकोशांतील धातूंची मोजदाद करून

एक धातुशब्द व त्याचें एकच बीज यांची संख्या, तसेंच एका धातुशब्दाचीं एकाहून अनेक बीजें यांची संख्या दाखविणारा तक्ता पुढें दिला आहे.

राजवाडे यांच्या धातुकोशाची हस्तलिखित प्रत लिहिण्याचें काम चालू असताना त्यांनीं लिहून ठेविलेल्या कागदांचीं आणखी दोन दप्तरें उपलब्ध झालीं. त्यांपैकीं एका दप्तरांत एकेका चतुर्थांश कागदावर एकेक संस्कृत धातु, त्याचा गण व अर्थ लिहून ठेविला आहे व त्यावर १, २, ३, ४, ५ असे एकाखालीं एक पांच आंकडे घातले असून एका (कत्र) धातूवर यांपैकीं चार प्रकारांची नांवें सार्धे १, णिच् २, सन ३, यङ् ४ अशीं दिलेलीं आहेत. यांपैकीं ५ व्या प्रकाराचें नांव त्यांनीं सांगितलेलें नाहीं. या कागदांवर १ व ५ आंकड्यापुढें बहुतेक ठिकाणीं शब्द लिहिलेले आहेत व कांहीं कागदांवर त्या शब्दांच्या माहितीच्या लहान चिठ्ठ्या चिकटविलेल्या आहेत. २, ३ ४ या आंकड्यांपुढें अगदीं क्वचित् ठिकाणीं शब्द लिहिलेले आहेत. यांपैकीं 'कृ' धातूच्या कागदावर सर्वांत जास्त माहिती आहे म्हणून त्या कागदाचा नमुना पुढें दिला आहे.



असे धातूंचे कागद सुमारें ११ शें असून क्वचित् एकेका कागदावर दोन दोन धातूही लिहिलेले आहेत व हे सर्व कागद धातूंच्या वर्णानुक्रमानें लाविलेले आहेत.

हे कागद कसे लिहिले आहेत व त्यांवरील शब्दांच्या चिठ्ठ्या कशा आहेत याचा नमुना समजावा म्हणून ईक्ष या धातूचा कागद व त्यावरील चिठ्ठ्या यांचे नमुने खालीं दिले आहेत.

ईक्ष :— १ दर्शने
१ निरीक्ष — निरेख, निरख
प्रतीक्षा - पडखा (पड आणि खा असे दोन शब्द नाहींत.)
परीक्षा - पारख
२
३
४
५ समीक्षा - चवकशी
ईक्षावीक्षा - इखीविखी

वरील शब्दांच्या चिठ्ठ्या या कागदाला चिकटविलेल्या आहेत, व या चिठ्ठ्यांवर पुढीलप्रमाणें माहिती लिहिलेली आहे.

इखीविखी
ईक्षावीक्षा = इखीविखी
हा शब्द जुन्या मराठी ग्रंथांत येतो.

पडखाणें
प्रतीक्षा = पडिखा = पडखा
प्रतीक्षस्य क्षणं = क्षणभर पडखा.
पडखा म्हणजे वाट पहा
पड आणि खा असे दोन शब्द नाहींत.
पडखा असा एक शब्द आहे
पडखाणें हें सबंद क्रियापद आहे
प्रतीक्षणं = पडिखाणें = पडखाणें.

पारखणें
परीक्षणं - पारखणें

चवकशी
समीक्षा = चवीकशा = चवकशी
समीक्षाकरणं = चवकशी करणें

निरेखणें, निरखणें
निरीक्षणं = निरेखणें, निरखणें
ईक्ष दर्शने।

वर दिलेल्या संस्कृत धातूंच्या चिठ्ठ्या व त्यांवरील शब्दांच्या माहितीच्या चिठ्ठ्या यांवरून प्रत्येक संस्कृत धातूवरून मराठीमध्ये कोणकोणते शब्द आले आहेत हें दाखविण्याचा राजवाड्यांचा हेतु असावा हें कळून येईल. मराठी भाषा जाणणाऱ्यांच्या दुर्दैवानें ही त्यांची योजना समग्र लिहून झाली नाहीं त्यास इलाज नाहीं!!

वर सांगितलेल्या दोन दप्तरांपैकीं दुसऱ्या दप्तरांत नामादि शब्दांच्या लहान व मोठ्या चिठ्ठ्या उपलब्ध झाल्या आहेत. या चिठ्ठ्याही धातूंची चिठ्ठ्यांप्रमाणें लहान चिठ्ठीवर शब्द व त्याची माहिती लिहिली आहे व मोठ्या चिठ्ठीवर फक्त तो शब्द व त्याच्या व्युत्पत्तीचा शब्द लिहिला आहे. यावरून धातुकोशाप्रमाणें नामादि शब्दांच्या व्युत्पत्तीचा कोशही छापण्याचा त्यांचा विचार असावा असें वाटतें. या त्यांच्या हेतूस अनुसरून राजवाडेसंशोधनमंडळानें नामादि शब्दकोश छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

धातुकोशांतील धातूंची गणना

धातुकोशामध्यें प्रत्येक धातूचा शब्द जाड टाइपांत छापला आहे. असे धातु अकारादि प्रत्येक वर्णाखालीं किती आले आहेत हें पुढें दिलें आहे.

वर्ण	धातुसंख्या	वर्ण	धातुसंख्या
अ	१४८	क	४०४
आ	२७३	ख	३४०
इ	१०	ग	२७९
ई	१	घ	१६१
उ	३८७	ङ	१
ऊ	२		११८५
ए	११	च	३९६
ऐ	५	छ	५८
ओ	११८	ज	१३३
औ	७	झ	२१६
	९६२		८०३

वर्ण	धातुसंख्या	वर्ण	धातुसंख्या
ट	१४५	य	९
ठ	६४	र	२२७
ड	१६६	ल	२८९
ढ	५९	व	६५५
ण	२		११८०
	४३६	श	१८१
		स	६०७
त	२६५	ह	६३५
थ	१०२		१४२३
द	१९२		
			एकूण
ध	१९०	अ ते औ	९६२
न	३३३	कवर्ग	११८५
	१०८२	चवर्ग	८०३
प	५९६	टवर्ग	४३६
फ	२६९	तवर्ग	१०८२
ब	४१२	पवर्ग	१८५४
भ	२३८	यवर्ग	११८०
म	३३९	शवर्ग	१४२३
	१८५४		८९२५

वरील धातूंपैकीं अनेक निर्वचनबीजें असलेल्या धातूंची गणना पुढीलप्रमाणें आहे :–

		एकूण धातूसंख्या	
१	निर्वचनबीज असलेले धातुशब्द	५८९३	५८९३
२	निर्वचनबीजें " "	१६२४	३२४८
३	" " "	६२९	१८८७
४	" " "	३३३	१३३२
५	" " "	१९७	९८५
६	" " "	९२	५५२
७	" " "	६०	४२०

वरील धातूंपैकीं अनेक निर्वचनबीजें असलेल्या धातूंची गणना पुढीलप्रमाणें आहे :–

			एकूण धातूसंख्या
१	निर्वचनबीज असलेले धातुशब्द	५८९३	५८९३
२	निर्वचनबीजें ,, ,,	१६२४	३२४८
३	,, ,, ,,	६२९	१८८७
४	,, ,, ,,	३३३	१३३२
५	,, ,, ,,	१९७	९८५
६	,, ,, ,,	९२	५५२
७	,, ,, ,,	६०	४२०

			एकूण धातूसंख्या
८	निर्वचबीजें असलेले धातुशब्द	३३	२६४
९	,, ,, ,,	१८	१६२
१०	,, ,,	१२	१२०
११	,, ,, ,,	३	३३
१२	,, ,, ,,	६	७२
१३	,, ,, ,,	५	६५
१४	,, ,, ,,	२	२८
१५	,, ,, ,,	४	६०
१६	,, ,, ,,	१	१६
१७	,, ,, ,,	२	३४
१८	,, ,, ,,	१	१८
२०	,, ,, ,,	३	६०
२१	,, ,, ,,	२	४२
२२	,, ,, ,,	१	२२
२३	,, ,, ,,	२	४६
२६	,, ,, ,,	१	२६
२७	,, ,, ,,	१	२७
		८९२५	१५४१२

मागील एकंदर धातुसंख्या १५४१२

एकत्र दाखल केलेले धातु– ७४८

१६१६०

(२) धातुकोशाच्या कल्पनेच्या उद्गमादि मुद्द्यांविषयींचें विवेचन

या निवेदनाच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें धातुकोशाची कल्पना राजवाड्यांच्या मनांत कशी उद्भूत झाली व तिचा विकास कसकसा होत गेला इत्यादि मुद्द्यांविषयीं त्यांच्या स्वत:च्या लेखांत आलेल्या अनेक उल्लेखांचे आधारें आम्ही हें विवेचन करितों.

भाषा, वाङ्मय, अध्यात्म, शास्त्रें कला इत्यादि सर्व क्षेत्रांत राजवाड्यांची कार्यकारणभाव पाहाण्याची विवेचकदृष्टि म्हणजेच इतिहासदृष्टि होती. ते नेहमीं म्हणत असत कीं, मी बुद्धिप्रामाण्यवादी असून माझी ऐतिहासिक पद्धति आहे; ही दृष्टि त्यांना कधींपासून आली याचें अनुमान करीत बसण्याची आवश्यकता नाहीं. 'संस्कृत भाषेचा उलगडा' या पुस्तकांत पहिल्याच परिच्छेदांत ते म्हणतात-

"संस्कृत भाषा प्रथम शिकावयाला लागलें म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्याला एक मोठा चमत्कार वाटतो. तो चमत्कार म्हणजे संस्कृतांतील द्विवचनाचा. मराठींत दोनच वचनें, एकवचन व अनेकवचन. संस्कृतांत पहावें तो आणीक तिसरें वचन म्हणजे द्विवचन आढळतें. लहानपणीं अमरकोशाबरोबर रूपावळीला प्रारंभ करतांना रामौ ह्या द्विवचनावर जेव्हां मी आलों तेव्हां अमरकोश पढविणाऱ्या शास्त्रीबोवांना प्रश्न केला कीं, रामौ हें काय आहे? बाबांनीं सांगितलें कीं, रामौ म्हणजे जेहेते दोन राम, याला द्विवचन म्हणतात. ह्यावर दुसरा प्रश्न केला कीं, तीन रामांना काय म्हणतात? बावा म्हणाले, रामा: म्हणतात. यावर पुन: प्रश्न केला कीं, चार रामांना काय म्हणतात? यावर संतापानें थोत्रींत लगाऊन बावा म्हणाले, तुझें डोंबल म्हणतात!!! एणेंप्रमाणें शंकासमाधान झाल्यावर राम: रामौचा घोष उदात्त स्वरांत पुन: सुरू झाला. तेव्हांपासून ह्या द्विवचनाचा चमत्कार माझ्या मनांत वारंवार घोळत आहे. संस्कृतांत द्विवचन काय म्हणून असावें आणि मराठींत काय म्हणून नसावें? मुळांतच संस्कृतांत द्विवचन कसें उत्पन्न झालें? संस्कृत भाषा बोलणाऱ्या प्राचीन समाजाची अशी कोणती मनोवृत्ति असावी कीं, दोन पदार्थ दाखविण्याकरितां त्यानें शब्दांचीं निराळीं रूपें बनवावीं? इत्यादि प्रश्न माझ्या मनांत कित्येक वर्षें घोळत आहेत. ती घोळणा आज कागदावर उतरतों."

अशा प्रकारची कार्यकारणाचा उलगडा शोधण्याची राजवाड्यांची इतिहासदृष्टि बालपणापासून होती. या दृष्टींतूनच राजवाड्यांच्या भाषाविषयक सर्व प्रयत्नांचा उगम झालेला आहे.

मराठींतील क्रियामात्राचा परामर्श घेणें म्हणजेच प्रस्तुतच्या धातुकोशाची कल्पना होय. राजवाड्यांच्या वर सांगितलेल्या दृष्टीच्या टप्प्यांत येणारी ती एक प्रमुख गोष्ट होती. हा प्रयत्न निव्वळ मराठी भाषेचा धातुकोश करून थांबत नव्हता. पाश्चात्य आणि पौरस्त्य भाषांतील धातुमात्राशीं तुलना करून अनेक गूढें उकलून दाखविण्याची त्यांची कल्पना होती. तिङन्तविचारांत* *दामल्यांना* सूचना करण्याच्या निमित्तानें त्यांनीं आपल्याच या प्रयत्नाचें आविष्करण पुढीलप्रमाणें केलेलें आहे.

"येथपर्यंत क्रियापदकृदन्तां संबंधानें जें कांहीं थोडेंबहुत माझ्या अल्पमतीला सुचवावेंसें

योग्य दिसलें तें सुचविलें. आतां शेवटीं एक सूचना करून हें प्रकरण संपवितों. दामल्यांच्या व्याकरणांत एक मोठे व्यंग राहिलेलें आहे. शाब्देपयोगी व द्रव्यार्थक व्याकरणांत हा दोष राहिला असता तर त्याकडे लक्ष देण्याचीहि आवश्यकता नसते. परंतु उद्घाटक व ऊहापोहक बुद्धीनें लिहिलेल्या शास्त्रीय ग्रंथांत, असला दोष अक्षम्य होय. तो दोष कोणता ? तर दामल्यांच्या व्याकरणांत मराठी भाषेचा *धातुपाठ नाहीं.* प्राय: भाषेंत असा शब्द नाहीं कीं जो सीमांत अशा कोणत्यातरी धातूला नेऊन भिडवितां येत नाहीं. यास्काचें निरुक्तत्तर या एका प्राणभूत कारणाकरितां निर्माण झालें. पाणिनीनें धातुपाठ एवढ्याचकरितां रचिला. कित्येक सौत्र धातू तर रोजच्या बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या किंवा ग्रंथांच्या भाषेंत कधींच उपयोगांत येत नसून, तेहि या भाषापृथक्कारांना नमूद करून ठेवणें हिताचें वाटलें. त्यामुळे भाषाशास्त्राला केवढा थोरला फायदा झालेला आहे ? ह्या सौत्रधातूंचा उपयोग इतर सजातीय प्राचीन व अर्वाचीन भाषांच्या पृथक्करणाला अत्यन्त होत असून, मानवी इतिहासावरहि त्यांचा प्रकाश पडतो. सारांश, भाषेच्या सीमान्त धातूंचें संशोधन व संकलन अत्यन्त उपयोगाचें आहे. माझा असा अंदाज आहे कीं, संशोधन व पृथक्करण करून, मराठी भाषेचा धातुपाठ रचला असतां पूर्ववैदिक व वैदिक भाषेवर पराकाष्ठेचा प्रकाश पडेल. मराठी भाषा कांहीं शब्द, प्रत्यय व निपात अपभ्रंशांतून घेते; कांहीं महाराष्ट्रींतून घेते; कांहीं शौरसेनींतून घेते; कांहीं संस्कृतांतून घेते; कांहीं वैदिक भाषेंतून घेते व कांहींतर पूर्ववैदिक भाषेंतूनहि घेते. इतकेंच नव्हे, तर वेदकालीन प्रांतिक किंवा प्राकृत भाषांतूनहि कांहीं शब्द, प्रत्यय व निपात मराठी भाषेंत उतरलें आहेत. तेव्हां मराठींतील धातुपाठ सिद्ध होणें अत्यन्त अगत्याचें आहे. तो सिद्ध झाला असतां, महाराष्ट्री, संस्कृत, वैदिक, पूर्ववैदिक, ग्रीक, त्याटिन, लिथूऐनियन वगैरे भाषांतील धातुपाठांशीं त्याची तुलना करण्याचें एक अजस्र साधन तयार होईल व तद्योगें करून मराठ्यांच्या पूर्वपरंपरेवर प्रकाश पडेल."

पण हा प्रश्न निव्वळ क्रियेशींच थांबावा अशी त्यांची दृष्टि नव्हती. मराठींतील सर्व शब्दसृष्टीचें शास्त्र तयार करणें, तींमधील कार्यकारणाचे धागे उकलणें, त्यांवरून अनेक सिद्धांत मांडणें, हा त्यांचा अगदी आरंभापासूनचा नित्याचा व्यवसाय होऊन बसला होता. भारतेतिहास संशोधक मंडळांतील व्युत्पत्त्या इ. भाग म्हणजे त्या व्यवसायाचें फारच अल्प आविष्करण होय. 'प्राकृतिक भाषांचा आणि वाङ्मयाचा इतिहास हा लेख एतद्विषयक त्यांची कल्पना समजून घेण्यासाठीं पूर्ण वाचला पाहिजे. त्यांतील पुढील उताराहि त्यांच्या मनांतील कार्याचा व्याप केवढा अफाट आणि सर्वस्पर्शी होता हें समजण्यास पुरेसा आहे.

"(१) भाषांचा इतिहास व (२) वाङ्मयाचा इतिहास ह्या दोन चिमुकल्या नांवांखाली खालील मोठ्मोठीं प्रकरणें तयार व्हावयाची आहेत-

"(१) कोश ऊर्फ निघंटु	(२) निरुक्त
(३) व्याकरण	(४) आदेशप्रक्रिया
(५) साहित्याचा इतिहास	(६) शास्त्रेतिहास

(७) कलेतिहास (८) बालवाङ्मयेतिहास
(९) विदग्धवाङ्मयेतिहास (१०) पारमार्थिकवाङ्मयेतिहास

हीं दहा प्रकरणें शास्त्रीय पद्धतीनें तयार करावयाचीं म्हणजे सरसकट प्रत्येकीं २७००० सत्तावीस हजार रुपये खर्च येतो. एकटा सर्वशब्दंकष असा कोश करावयाला अडीच लाख रुपये पुरे होतील असें आम्हांस वाटत नाहीं. मोल्स्वर्थला काय खर्च आला असेल याचा अंदाज करा. बाकीच्या प्रकरणांनाहि खर्च असाच लागणार. हीं सर्व प्रकरणें किंवा ह्यांतील कोणतेंही एक प्रकरण तीनशें किंवा पंधराशें रुपड्यांत करून घेण्याच्या गोष्टी बोलणें केवळ हसनीय आहे. आमच्याहि मनांत गेली दहा वर्षें ही दहा प्रकरणें सिद्ध करण्याचें उत्कटत्वानें घोळत आहे. व हजार दोन हजार रुपयांत तीं होण्यासारखीं असतीं, तर आज मित्तीस त्यांची पांच चार वर्षांखाली सिद्धि करून आम्ही मोकळे होऊन पांच चार वर्षें झालीं असतीं. परंतु हजार दोन हजारांतलें हें काम नसून अडीचतीन लाखांतलें हें प्रकरण आहे. असा अनुभव आल्यावर व्युत्पत्ति व आदेश ह्यांची थोडी बहुत सिद्धि करून ठेवण्याकडे आम्ही लक्ष दिलें व कोणीं साहाय्यक निर्माण होतो कीं काय याची प्रतीक्षा करीत बसलों."++

एवढ्यासाठींच त्यांनीं नामाचें हि व्युत्पादन करण्याचा प्रयत्न केला आहे. यथाकाल त्याची प्रसिद्धिहि होईल. 'महाराष्ट्राचा वसाहतकालीन इतिहास' या अप्रतिम लेखांत त्यांनीं इतिहासाच्या अनेक अंगांबरोबर महाराष्ट्रांतील ग्रामनामांना हात घातला आहे. तद्वारां इतर शब्दसृष्टीबरोबर शब्दांच्या या दालनाचीहि आंखणी त्यांनीं करून ठेविली होती. मराठींतील शब्दमात्र त्यांच्या अभ्यासाचा विषय होऊन राहिला होता. एवढ्यासाठींच त्यांनीं आडनांवें इत्यादिहि जमा करून ठेविलीं व त्यांवर एक दिग्दर्शक लेखहि लिहिला आहे.

मराठींतील शब्दसृष्टीची मूलतत्त्वें तपाशीत तपाशीत राजवाडे थेट पूर्ववैदिक भाषेच्या परिसीमेवर गेले. भूतकाळाची इतकी परिसीमा अद्याप कोणी गांठली नाहीं. याचें प्रत्यंतर 'संस्कृत भाषेचा उलगडा' हा प्रबंध अभ्यासल्याशिवाय कळणार नाहीं. मध्यंतरीच्या प्राकृत भाषा त्यांनीं 'पिशेल' इ. च्या प्रयत्नांचा पूर्ण फायदा घेऊन अवलोकून त्यांची योजना बसवून टाकली; व तद्वारां त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाची रचना केली. ज्ञानेश्वरींतील सर्व शब्दांचा व धातूंचा कोश देण्याची कल्पना नक्की केली. या संबंधानें ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांतील उतारा पुढे दिला आहे.

"येणेंप्रमाणें (१) वर्णेतिहास, (२) शब्दविभक्ति-प्रत्ययेतिहास (३) क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास व (४) निपातेतिहास, असे चार भाग येथपर्यंत संपले. त्यांत ज्ञानेश्वरी मराठी भाषेचा सांगाडा ज्या शिरांनीं व स्नायूंनीं व धमन्यांनी व मांसपेशींनी ताणून धरिला व आच्छादिला आहे, त्यांचा मागमूस व पूर्वस्वरूप अपभ्रंशांत, महाराष्ट्रीत व संस्कृतांत कसें होतें तें दाखविलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, ज्ञानेश्वरी मराठीपर्यंत सर्व बाबींची परंपरा अंव्याहत लागली आहे. कित्येक वैदिक बाबी संस्कृतांत गळाल्या. कित्येक बाबी महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहींशा झाल्या व कित्येक महाराष्ट्री बाबी ज्ञानेश्वरी मराठींत लुप्त

झाल्या; परंतु कोणत्या बाबी कोठे लुप्त झाल्या, हें आतां नक्की कळलें. शंकेला जागा राहिली नाहीं. वर्ण, शब्द, धातु व निपात ह्यांतलीं अशी एकहि प्रधान बाब राहिली नाहीं कीं जिचें मूळ दाखविलें गेलें नाहीं. तसेंच हेमचंद्र ज्या अपभ्रंशाचें व्याकरण देतो, त्याहून निराळ्या अपभ्रंशापासून मराठी निघाली, असें म्हणण्याकडे प्रवृत्ति होते; इतकेंच नव्हे, तर मराठी ज्या अपभ्रंशापासून निघाली तो अपभ्रंश महाराष्ट्रीहून फारसा भिन्न नसावा, असेंहि म्हणणें प्रशस्त वाटतें. गोडबोले, होर्न्ले, बीम्स वगैरे वैय्याकरणांनीं ज्या शेंकडों बाबींची परंपरा दाखविली नव्हती किंवा चुकीची दाखविली होती, ती येथें पायाशुद्ध दाखविली आहे.

७८ कलमापर्यंत संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश व मराठी रूपें जीं दिलीं त्यांवरून आदेशप्रक्रिया सिद्ध व्हावयाची आहे. परंतु प्रातिपादक व धातू महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून कोणत्या रूपानें आले, तें अद्याप विवेचिलें नाहीं. सबब आदेशप्रक्रिया येथें इतक्यांत देतां येत नाहीं. ज्ञानेश्वरींतील एकोनएक शब्द व धातू अपभ्रंशांतून किंवा महाराष्ट्रींतून किंवा संस्कृतांतून कसे आले ते, दाखविल्यावर, मग आदेशप्रक्रियेचे सामान्य व विशेष नियम देणें सोईचें होईल. ह्या खटाटोपाला पांचचारशें अष्टपत्री पृष्ठें लागावीं, असा अदमास आहे. करितां, आदेशप्रकरणाचें विवेचन एखाद्या स्वतंत्र पुस्तकांतच करणें भाग आहे. होर्न्ले, बीम्स, भांडारकर, स्टेन कोनौ व ग्रीयरसन यांनीं आदेश प्रकरणावर जें कांहीं लिहिलें आहे त्याचा विचार तेथें केला जाईल. (ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण पृ. १५३, १५४)"

धातुकोशाच्या पूर्वतयारीचें प्रतिबिंब ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांतील वरील उताऱ्यांतहि आहे. ज्ञानेश्वरीच्या व्याकरणानंतर दामल्यांना सूचना देण्याच्या निमित्तानें सुबन्त व तिङन्त विचार त्यांनीं मांडले. पूर्ववैदिक भाषेच्या सीमेवरून मराठींतील धातुकोशापर्यंतचा सर्व प्रदेश राजवाड्यांच्या चौफेर आणि शास्त्रशुद्ध दृष्टिक्षेपांत येऊन गेला.

धातुकोशाच्या पाठीमागें अशा तऱ्हेनें अभ्यासाचीं मोठींच साधनें त्यांनीं निर्माण करून ठेवलेलीं आहेत. तीं अभ्यासिल्याशिवाय त्यांच्या कोशाचें मर्म उलगडणार नाहीं. उदाहरण, व्युत्पत्तिविषयक विचार कळण्याला त्यांचा पुढील उतारा पहावा लागेल; (इतिहास आणि ऐतिहासिक मासिक-ऐतिहासिक विविध विषय खंड पहिला- पृ. ३५१ ते ३५७).

"आमच्या म्हणण्याप्रमाणें लेख्य इतिहास एकंदर दोन. (१) महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास व (२) महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास. पैकीं महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास विचारार्थ प्रथम घेऊं. महाराष्ट्री भाषेला प्राकृत म्हटलें म्हणजे तिजपासून निघालेल्या अपभ्रंशांना आम्ही प्राकृतिक म्हणतों. प्राकृतिक भाषा म्हणजेच नागर मराठी भाषा आणि महाराष्ट्रातील इतर प्रांतिक व जातिकें मराठी भाषा ह्या सर्व भाषांचा इतिहास म्हणजे मराठी प्राकृतिक भाषेचा इतिहास. भाषेचा इतिहास म्हणजे भाषेचे जे शब्द, प्रत्यय, आगम, स्वर, आघात वगैरे अवयव, त्यांचा इतिहास. इतिहास म्हणजे परंपरा व त्या परंपरेचे नियम. पूर्व भाषेपासून पश्चात्कभाषेचे हे अवयव कसे निघाले हें सांगणें म्हणजे त्यांचा इतिहास देणें. हें सर्व एकदोन वाक्यांत सांगतां आलें खरें, परंतु हें सर्व कागदावर बठवावयाला काय मेहनत लागते ते आतां पाहूं. एक सर्वज्ञ मराठीभाषाशास्त्रज्ञ आहे अशी कल्पना करा. त्याला

मराठी भाषेच्या वर्तमान, मध्य व प्राचीन अवस्थांचा साक्षात्कार परिपूर्ण झाला अशीहि कल्पना करा. अशा शास्त्रज्ञाच्या मनांत स्वत:चा साक्षात्कार इतरांच्या अनुभवास यावा एतदर्थ उद्योग करण्याचें जर आलें तर तो खालील मार्ग स्वीकारील. प्रथम वर्तमान व भूत नागर, प्रांतिक व जातिक मराठी भाषांतील लेखी व तोंडी अखिल शब्द व प्रत्यय तो जमा करील; आणि नंतर, अपभ्रंश, महाराष्ट्री, जुनी महाराष्ट्री, संस्कृत, वैदिक व पूर्ववैदिक इत्यादि भाषांतील शब्दांशीं व प्रत्ययांशीं त्यांचा संबंध कसा व कोणत्या नियमांनीं झाला तें दाखवून देईल. हीं दोन्ही कृत्यें करतांना त्याला इतर विद्वानांचें साहाय्य त्या त्या भाषांतील शब्द व प्रत्यय टिपण्याकरितां अवश्य घ्यावें लागेल. कारण एका सर्वज्ञ तज्ज्ञाच्याहि हातून हें सर्व प्राय: शारीरिक व बऱ्याच मानसिक श्रमाचें काम संभवनीय कालावधींत होणार नाहीं. अर्धशिक्षितांच्या हातून हें श्रमाचें काम पेलणारहि नाहीं व रेटणारहि नाहीं. काम फार दगदगीचें आहे; तें चोख झालें पाहिजे. चोखपणा उच्च शिक्षणाशिवाय व शास्त्रीय अभ्यासाच्या संवयीशिवाय येत नाही. साहाय्यकांची योग्यता या दर्जाची पाहिजे. कामाचा विस्तारहि अवाढव्य आहे. मराठींतील शब्दसमुद्र अफाट आहे. आमचा अंदाज आहे कीं, मोल्स्वर्थच्या कोशांत वर्तमान व भूत मराठी भाषेंतील शब्दसमुद्राचा सुमारें निम्मा भाग आला असेल नसेल. सबब अखिल शब्दसमुद्र ओलांडण्याकरितां साहाय्यकांना वर्तमान व भूत मराठी लेखी व तोंडी वाङ्मय डोळ्यांत तेल घालून धुंडाळलें पाहिजे आणि नवीन शब्द किंवा प्रत्यय किंवा स्वर आढळला कीं, साक्षेपानें टिपून ठेविला पाहिजे. कोश रचण्याची मेहनत ज्यांनीं केली आहे, त्यांना या श्रमाची कल्पना होईल. साहाय्यकांचें हें काम चालू असतां शास्त्रज्ञाचें सांपडलेल्या शब्दांची पूर्वभाषेंत परंपरा ठरविण्याचें नाजूक काम चालतच असतें. हें काम सर्वांत अवघड. केवढाहि व्युत्पन्न झाला तरी भेटल्या शब्दाची व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास चुटकीसरसा त्याला देतां येईल असा अर्थ नाहीं. ऐतिहासिक व्युत्पत्तीची गती भूतावरून वर्तमानावर अनुलोम असते. यास्काच्या निरुक्तांतील काल्पनिक व्युत्पत्तीप्रमाणें वर्तमानावरून भूतावर, अशी असेल, अशीहि असेल व अशी देखील असेल, अशा प्रकारची धरसोडीची प्रतिलोम, अनिश्चित व अकिंचित्कर नसते. धरसोडीची प्रतिलोम व्युत्पत्ति यास्काचार्यांनी गाफीलपणें केली, अशी असमंजस कल्पना करण्याचें धार्ष्ट्य मात्र करणें युक्त नाहीं. यास्काच्या कालीं वेदभाषा ही इतकी जुनी झाली होती कीं, तत्कालीन सामान्य वैदिकांना तिचा अर्थ कळतनासा झाला होता. वेदपूर्वभाषा ऊर्फ पूर्ववैदिक भाषा तर इतकी प्राचीनतम झाली होती कीं, यास्काचार्यांच्या कालीं तिचा मागमूसहि राहिला नव्हता. तेव्हां वैदिक शब्दाची अनुलोम व निश्चित व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास देण्याला यास्काचार्यांना साधनच नव्हतें. अशा कचाट्यांत व्युत्पत्ति करण्याचें काम यास्काला करावयाचें असल्यामुळें एकाच शब्दाच्या दहा दहा प्रतिलोम व्युत्पत्त्या करून असमाहित समाधान मानून स्वस्थ बसणें त्याला अपरिहार्य झालें. किंवा असाहि विकल्प करतां येईल कीं, ज्या पूर्ववैदिक भाषेपासून वैदिक भाषा निघाली तींतून वैदिक शब्दांची व्युत्पत्ति लावण्याचें सार्धे व सरळ कृत्य यास्काला इतिहासपद्धतीच्या अज्ञानास्तव माहित नव्हतें. कांहींही असो, मराठी व्युत्पत्तिकाराला ही यास्कीय दुरवस्था ग्राह्य नाहीं. कारण, मऱ्हाठीच्या पूर्वीच्या अपभ्रंश

व महाराष्ट्री या दोन भाषा मराठी व्युत्पत्तिकाराला ऊर्फ शब्देतिहासकाराला ऊर्फ भाषेतिहासकाराला साहाय्य करण्यास अद्यापहि अवशिष्ट आहेत. शिवाय संस्कृत व वैदिक या सख्ख्या किंवा चुलत भाषाहि उपलब्ध आहेत. सबब प्रतिलोम अनिश्चित व्युत्पत्ति करण्याचें संकट मराठी भाषेच्या व्युत्पत्तिकारावर कोसळण्याचा संभवसुद्धां नाहीं. सुदैवानें या बाबतींत यास्कापेक्षां मराठी भाषेच्या इतिहासकाराचा रस्ता सरळ आहे. यद्यपि अशी सुस्थिती ह्या एका बाबी संबंधानें असली तत्रापि दुसऱ्या एका बाबींत मराठी निरुक्तकाराचा रस्ता अडचणींच्या घोर व निबिड अरण्यांतून जातो. पूर्ववैदिक वाङ्मय बिलकुल नसल्यामुळें यास्काला ग्रंथवाचनाचे व वैदिक शब्दांचें पूर्ववैदिक पूर्वशब्द धुंडण्याचे श्रम नव्हते. मराठी निरुक्तकाराला महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक ह्या तीन चार भाषांतील अफाट वाङ्मयाच्या निबिड अरण्यांतील कोणत्या महाराष्ट्री, संस्कृत किंवा वैदिक झुडुपापासून आपल्या जवळील कोणत्या मराठी धलप्या कातलेल्या आहेत याचा बिनचूक पत्ता लावावयाचा असतो. भलती धलपी भलत्याच झाडाची असावी, किंवा एकच धलपी अनेक झाडांची असावी किंवा अनेक धलप्या एकच झाडाच्या असाव्यात अशी त्रिविध शंका मराठी निरुक्तकाराला गांगरवून सोडते. यास्काप्रमाणें असेंहि असेल, तसेंहि असेल, असें धरसोडीचें उत्तर देऊन भागत नाहीं. उत्तर निश्चित हवें असतें; कारण तें शक्य आहे हें माहीत असतें. उदाहरणार्थ, दहा पांच मराठी शब्द घेतों म्हणजे आम्ही काय म्हणतों तें सहृदयांच्या प्रतीतीस येईल.

(१) मराठी पाणीं शब्द – जलार्थक पाणीं शब्द संस्कृत पानीयं शब्दाचा अपभ्रंश सर्वमान्य आहे. परंतु तरवारीचें पाणीं या प्रयोगांतील पाणीं शब्द कोणत्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा ? किंवा लक्षणेनें चकाकी वरून तरवारीच्या चकाकीला पाणीं शब्द लावला तर नसेल ? असा विकल्प आला. लक्षणेनें वाटेल तें गाढव वाटेल त्या घोड्यापासून निघूं शकेल म्हणून निरुक्तींत हा लक्षणेचा रस्ता प्रामाणिक धरीत नाहींत. सबब चकाकी-अर्थक पाणीं शब्दाचीं व्युत्पत्ति निराळी असावी असा तर्क. धातुपाठांत 'पू' शोधने असा धातू आहे. तरवारीला पाणी देणें म्हणजे तरवार अग्नीनें शुद्ध करणें. पू-पावनीयं = पाअणीअँ = पाणीं. जलार्थक पाणी शब्द 'पा' धातूपासून निघाला आहे व उज्ज्वलनार्थक पाणी शब्द पू धातूपासून निघाला आहे, हा निर्णय. दोन्ही शब्द अगदीं निराळे आहेत व शास्त्रीय कोशांत ते निराळे आहेत असें सांगितलें पाहिजे.

(२) फार :– हा शब्द स्फार शब्दापासून व्युत्पादितात. परंतु फारकरून या अव्ययांतील फार शब्द कसा व्युत्पादावयाचा ? करून याचें फार हें कर्म करतां येत नाहीं. सबब 'फारकरून' हें अव्यय म्हणून एक शब्द समजणें रास्त आहे. संस्कृतांत प्रायस्कृत्वा असें अव्यय आहे. प्रायस्कृत्वा = फारकरून. प्रायस्कृत्वा स न आयास्यति = फारकरून तो येणार नाहीं. तात्पर्य मराठींत दोन 'फार' आहेत. स्फारापासून निघालेला एक व प्रायःपासून निघालेला दुसरा.

(३) भीक – भिक्षापासून भीक सर्वमान्य आहे. परंतु, मी त्याला भीक घालीत नाहीं. या वाक्यातील पर्वा-अर्थक भीक शब्द कोठून आला ? येथें लक्षणेला फारच ताणावी लागेल तेव्हां भिक्षेपासून पर्वेपर्यंत उडी जाईल. संस्कृतांत भयार्थक भीषा शब्द आहे. भीषा=भीख=भीक.

मी त्याला भीक घालीत नाहीं म्हणजे मी त्याला भीत नाहीं. भीक म्हणजे भय, पर्वा इत्यादि. दोन्ही शब्द निराळे, उच्चार मात्र एक. कोशांत निराळे दाखविणें प्राप्त आहे.

(४) भरणें – भृ पासून भरणें सर्वमान्य आहे, परंतु मला रागें भरला, या वाक्यांतील भरला शब्द कसा काढावयाचा? रागें भरला म्हणजे कठोर शब्द बोलिला. रागावणें हा शब्द रागें भरणें या शब्दप्रयोगाहून निराळा. रागें भरणें या प्रयोगांत बोलण्याची क्रिया दर्शविलेली असते. ती रागावणें या शब्दांत नियत नसते. समाधान:– संस्कृतांत भृ भर्त्सने असा धातू आहे. त्यापासून कठोर शब्दार्थक भरणें. क्रोधेन मां परिभृणाति = क्रोधानें मला रागें भरतो. रागें तृतीया. भर्त्सनार्थक भरणें शब्द पूर्णार्थक भरणें शब्दाहून निराळा.

(५) बोलणे – माणूस बोलतो, या वाक्यांतील बोलणें शब्द संस्कृत वल्ह धातूपासून निघाला आहे हें सर्वमान्य. परंतु धंदा बोलतो, या वाक्यांतील बोलणें धातू कोणत्या संस्कृत धातूचा अपभ्रंश असावा? धंदा बोलतो म्हणजे धंदा भरभराटीस येतो असा अर्थ आहे. समाधान – संस्कृतांत पुल् वृद्धौ असा धातू आहे. पोलति = वोल्इ = बोले. भाषणार्थक बोल निराळा व वृध्यर्थक बोल निराळा.

(६) काढणें – कृष्पासून काढ सर्वमान्य. परंतु थांब, त्याचें काढतों, तुझें काढतों, या वाक्यांतील काढ कसा निष्पादावयाचा? येथें काढणें म्हणजे मार देणें असा अर्थ आहे. समाधान – क्रथ् मारणें असा संस्कृत धातू आहे व त्याचें कर्म षष्ठ्यन्त असतें. तस्य क्राथयामि = त्याचें काढतों. कर्षणार्थक काढ निराळा व मारणार्थक काढ निराळा. क्राथय् = काढ.

(७) पाडणें – पातय् पासून पाड सर्वमान्य. परंतु फळ्या पाडणें, फाकी पाडणें, तुकडे पाडणें, यांतील 'पाड' कसा निष्पन्न झाला? येथें पाडणें म्हणजे कापणें असा अर्थ आहे. समाधान – संस्कृत पाटय्पासून हा पाड निघाला आहे. फलकान् पाटयति = फळ्या पाडतो.

(८) चोरणें – चुर् पासून चोर सर्वमान्य. परंतु आंग चोरणें, चोरून जाणें या वाक्यांतील चोर कोठला? येथें चोरणें म्हणजे छपून लपून जाणें असा अर्थ आहे. समाधान :– संस्कृतांत त्सर छद्मगतौ असा धातू आहे. त्सरणं चोरणें. अंगत्सरणं = आंग चोरणें. त्स = च.

(९) जा :– संस्कृत 'या' धातूपासून मराठी जा सर्वमान्य. परंतु, येत नाहीं जा!, मर जा! या वाक्यांतील 'जा' कोठला? समाधान:– संस्कृत द्यै न्यक्करणे धातू आहे. त्याचें आशीर्लिङ्ग्याचें द्वितीयपुरुषीं एकवचनीं रूप द्याया: हौतें. द्याया:, नैष्यामि = जाजा! येत नाहीं. एथें जाणें या क्रियापदाचा अर्थ तिरस्कार असा आहे. गमनार्थक जा निराळा व तिरस्कारार्थ जा निराळा. द्य = ज्ज.

(१०) दगड – दृषद् =दखड = दगड अशी परंपरा अश्मार्थक दगह शब्दाची सर्वमान्य, परंतु अरे दगडा, तूं मूर्ख आहेस. एथें दगड शब्द कसा व्युपादावयाचा? कां लक्षणेनें काम भागवावयाचें? समाधान:- संस्कृतात असा प्रयोग असे– रे दग्ध! मूर्खोऽसि = रे दगडा, मूर्ख आहेस. दग्ध = दगढ = दगड = डगड! दग्ध म्हणजे निंद्य. निंद्यार्थक दगड निराळा व अश्मार्थक दगड निराळा.

(११) दुहाचार्य – हा शब्द प्रतिलोम गतीने व्युत्पादूं गेलें असतां अनेक तर्क करतां येतील. परंतु ते सर्व अनैतिहासिक व अनिश्चित होतील. मूळ संस्कृतांत जेव्हां ह्या मराठी शब्दाचा पूर्वशब्द आपातत: याचनांत भेटेल तेव्हांच ह्या शब्दाची व्युत्पत्ति निश्चित ठरविणें शक्य आहे. संस्कृतांत दोग्धृ म्हणून शब्द आहे त्याचा अर्थ भाडोत्री कवी असा आहे. भाडोत्री म्हणजे भिकार कवींत जो श्रेष्ठ त्याला दोग्ध्राचार्य म्हणत. दोग्ध्राचार्य = दोह्राचार्य = दुहाचार्य. दुहाचार्य या शब्दाचा मराठींत अर्थ ढोंगी वगैरे आहे. कानडी दोड्ड (मोठा) पासून दुह व्युत्पादण्यांत स्वारस्य नाहीं.

अशीं आणीक हजारों उदाहरणें घेतां येतील. सांगण्याचे तात्पर्य इतकेंच कीं, मराठी निरुक्ती यास्कीय निरुक्तांसारखी स्याद्वादी नाहीं. अद्वैतवादी आहे. खेरीज, निरुक्तीचें हें कृत्य हुकमी नाहीं. वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, अर्धमागधी वगैरे ग्रंथ वाचतां वाचतां पूर्वभाषांतील शब्दांची पश्चात्कभाषांतील म्हणजे मराठींतील शब्दांशीं सांगड घालून द्यावयाची असते. म्हणजे ही सांगड घालतांना प्रथम (१) जुन्या व नव्या मराठींतील एकोनएक शब्दांची ओळख निरुक्तकाराला पाहिजे. व (२) नंतर पूर्वभाषांतील शब्द भेटला असतां त्याची गांठ मराठींतील योग्य शब्दाशीं घालून देण्याची हातोटी साधली पाहिजे. ही हातोटी केवळ अनुभवानें येणारी आहे. हजारों चुक्या कराव्या, शेकडोंदा भलत्या पूर्वशब्दांचीं भलत्याच मराठी शब्दांशीं लग्नें लावून द्यावू व नंतर खरीं वधूवरें सांपडली असतां खोटीं लग्नें निर्लज्जपणें मोडून टाकावीं, असें टक्केटोणपे खातां खातां शब्दशात्राचें जोसपण अंगी बाणत असतें, एरव्ही नाहीं. यद्यपि जोसपण आंगीं बाणलें तत्रापि मराठींतील वाटेल त्या शब्दाचें महाराष्ट्री किंवा संस्कृत गणगोत कोणीही जोशी ताटकन व बिनचूक सांगूं शकत नाहीं. पूर्वभाषांतील ग्रंथ वाचीत असताना स्मृति, उपस्थिति व कल्पकता या त्रयीची ज्या मानानें कृपा होईल त्या मानानें मराठी शब्दांच्या संस्कृत गणगोताचें टिपण करून ठेवावयाचें असतें. अशीं टिपणें ज्यानें दोनचार तपें केलीं त्याला निरुक्ताचार्यांच्या पदवीवर न्यायानें हक्क सांगतां येतो. एवंगुणविशिष्ट निरुक्तकार व पूर्वप्रोक्तगुणविशिष्ट पांचचार विद्वान् साहाय्यक जेव्हां शब्दमृगांची पारध दहापांच वर्षे करतील, तेव्हां मराठी भाषेच्या इतिहासाचीं प्राथमिक दोन उपकरणें तयार होतील. पहिलें अंग शब्दकोश व दुसरें अंग व्युत्पत्ति. हीं दोन उपकरणें तयार झाल्यावर नंतर भाषेच्या इतिहासाची गोष्ट काढावयाची."

आतापर्यंतच्या विवेचनावरून राजवाड्यांची कोशविषयक दृष्टि व उत्पत्ति यासंबंधीं अल्प कल्पना दिली आहे. राजवाड्यांच्या भाषाविषयक सर्व लिखाणाच्या नीट अवलोकनाशिवाय कोशाचा अभ्यास करतां येणार नाहीं. म्हणून राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाच्या संस्कृत भाषांतरांत आरंभीं देऊन ठेवलेली पुढील सूचना येथेंहि लागू पडते. ती सूचना अशी:–

"लक्ष्यताम्

[६] हें भाषांतर अभ्यासितांना (१) ज्ञानेश्वरी व्याकरण (२) सुबंतविचार (३) तिङंतविचार व (४) मराठी भाषेवरील माझे सर्व लेख, टिपणें व व्युत्पत्त्या यांशीं अभ्यासकाचा परिचय असणें अवश्य आहे. अन्यथा हें भाषांतर नीट समजणार नाहीं व

८५ ओंव्यांवर ज्या निर्वचक टीपा दिल्या आहेत त्यांतील विशेष कळण्यास अडचण पडेल."

वर लिहिल्याप्रमाणें राजवाड्यांच्या पूर्वीच्या लिखाणाचा पूर्ण परिचय करून घेईल त्याला ह्या कोशाचें दालन सदैव उघडें राहील. त्याला नवीन अभ्यासाची उमेद याईल. व मग.

राजवाड्यांच्या धातुकोशांतील सर्व धातूंच्या रूपांचा संग्रह करणें.

त्यानंतर तिङन्तप्रक्रिया तयार करणें.

भारतीय भाषांवर कोशाचा काय प्रकाश पडतो हें पाहणें.

आदेशप्रक्रिया बसविणें.

जुन्या ग्रंथांच्या अभ्यासाला याची मदत काय होते हें पाहणें.

पाणिनीच्या धातुपाठाचा विस्तार यांत कसकसा होत गेला हें तपासणें.

वैदिक वाङमूलाचा यांत कोठें कोठें छडा लागतो हें अभ्यासणें.

अशा शेंकडों बाबी त्याच्या डोळ्यांपुढें उभ्या राहतील; व त्याला प्रस्तुत लेखकाप्रमाणें प्रतीति येईल कीं, राजवाड्यांचे हे सर्व ग्रंथ व हा कोश अभ्यासित्याशिवाय या क्षेत्रांत जो जो म्हणून लिहूं लागेल तो तो पदोपदीं विपत्तींत पडल्याखेरीज राहणार नाही. हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि भारतीय भाषालेखकाला, अभ्यासकाला अगर संशोधकाला हा राजवाड्यांचा ग्रंथ व तत्पूर्व लिखाण अभ्यासावेंच लागेल. या योग्यतेमुळेंच इतिहासांत त्यांना 'आचार्य' ही थोर पदवी मिळालेली आहे. भाषाक्षेत्रांत पाणिनीची योग्यता त्यांच्या ठिकाणीं होती हें अभ्यासूच्या लक्षांत येईल.

वस्तुत: त्यांना कोणत्याहि पदवीची अपेक्षा नव्हती. या बाबतींत ते पूर्ण निस्पृह होते. विकार आणि विचारप्रदर्शनाच्या प्रत्येक बाबींचे संशोधन व्हावें एवढीच त्यांस तळमळ लागून राहिलीं होती. मुख्यत: सर्व प्रवृत्तीचें मूळ जी मातृभाषा तिची दैना पाहून त्यांस फार वाईट वाटे! ते तिङन्तविचारांत लिहितात. (राजवाडे लेखसंग्रह भाग २ रा. पृ. ३१-३२)

"पाणिनी सारखा वैय्याकरणसूर्य ह्या भाग्यशाली देशांत आज तीन हजार वर्षें उगवला असतां संस्कतोद्भव भाषांच्या व्याकरणाची अशी दुर्दशा असावी ही शोचनीय गोष्ट होय. लाख्याताचे नियम येणेंप्रमाणें बसवितां येतील:—

(१) मराठींतील सर्व धातूंची याद करणें.
(२) त्यांचे गण पाडणें.
(३) ल मुळींच न लागणारे धातू
(४) ल लागतांना अन्ययाला विकार न होणारे धातू सर्व
(५) ल लागतांना इ घेणारे धातु सर्व
(६) ल लागतांना इ विकल्पानें घेणारे धातु सर्व
(७) ल लागतांना आ घेणारे धातु सर्व
(८) ल लागतांना आ विकल्पानें घेणारे धातु सर्व
(९) ल लागतांना इन्न, इन्ह घेणारे धातू

(१०) ल लागतांना स्वरूपान्तर करणारे धातू
(११) ल लागतांना स्वरांचे लोप
(१२) ल लागतांना व्यंजनांचे लोप
(१३) कर्तरि ल
(१४) कर्मणि ल
(१५) कर्तरि लेल
(१६) कांहीं धातूंना असा मोघम शब्द बिलकूल टाळावा- खालील धातूंना असे शब्द योजावे.

हे नियम बसवावयाचे म्हणजे सर्व धातूंच्या लाख्याती रूपांची एक संपूर्ण याद केली पाहिजे. ही याद पांचपन्नास शिष्टाशिष्ट लोकांचे उच्चार ऐकून करावी. केवळ स्वत:च्याच उच्चारावर विसंबू नये. तसेंच प्रांतिक भाषांत ह्या लाख्यातार्ची रूपें कशीं आहेत तें पाहावें.

(१७) खानदेशांत ल चा न उच्चार करितात, दिला-दिना, केला-केना.
(१८) ज्ञानेश्वरी मराठींत लाख्यातार्ची रूपें व प्रयोग कसे केले आहेत तें पाहावें व त्याचे नियम बसवावे. त्याशिवाय वर्तमान मराठी भाषेच्या व्याकरणाचें शास्त्र सिद्ध होणार नाहीं. पाणिनीच्या पुढें जुनी वैदिक भाषा होती म्हणून लौकिक संस्कृताचें व्याकरणशास्त्र त्याला रचतां आलें.
(१९) धातूचे सामान्य प्रत्यय तिन्ही पुरुषीं, तिन्ही लिंगीं व दोन्हीं वचनीं द्यावे.
(२०) त्या प्रत्ययांना प्रत्येक आख्यातीं कोणते आदेश होतात ते सांगावे."

निव्वळ खेद प्रदर्शित न करतां धातूंसंबंधीं या उताऱ्यांत राजवाड्यांनीं बहुमोल सूचना केल्या आहेत. धातुकोशाच्या अभ्यासूनें त्या दिशेनें प्रयत्न करावयाचा आहे. शेवटी सुवन्त विचारांतली बहुमोल सूचना देऊं. (सुवन्तविचार कलम ३३ पृ. ८८)

एका काळच्या ह्या शास्त्रीय भूमींत सध्यां शास्त्राचा अत्यंत लोप झालेला आहे. प्राय: ह्या देशांतील यच्चयावत् लोकांची स्थिति आफ्रिकेंतील नीग्रो लोकांच्या स्थितीच्या जवळजवळ आलेली आहे. ज्यांना ग्राज्युएट म्हणून म्हणतात त्यांच्याजवळहि शास्त्र नाहीं व ज्यांना शास्त्री म्हणून म्हणतात त्यांच्याजवळहि शास्त्र नाहीं. एक पाश्चात्य सटरफटर पुस्तकें घोंकून खर्डेघाश्या गुलाम बनलेला आहे व दुसरा पौर्वात्य ग्रंथ घोकून मद्दड झालेला आहे. अशा ह्या दुहेरी कंगाल समाजाला सुधारण्याचें म्हणजे शास्त्रीय स्थितीला नेण्याचें बिकट कृत्य, कोणाचेंहि साहाय्य मिळण्याची आशा न करतां, पार पाडावयाचें आहे. सबब, राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन वगैरे कोणतेंहि कृत्य ह्या देशांत ज्या कोणाला करण्याची उमेद आली असेल, त्यानें अंगीकारलेल्या कृत्याच्या विस्ताराचा अंदाज घ्यावा, त्यांत व्यंगें व दोष कोठें आहेत त्याची विचक्षणा करावी, व ते दोष, व्यंगें काढण्यास स्वत:च लागावें, इतर कोणाची वाट पाहूं नये. कारण ममतेनें मदतीला धांवून येण्याच कोणीच नाहीं. स्वजनहि नाहींत व परजन जर नाहींतच नाहींत. अशी एकंदर फार हलाखीची स्थिति आहे. आणि ही स्थिति कांहीं